


His hopes, his aspirations, his confidence in you to secure his future is dependent on what we do today.

WALCHAND GROUP INDUSTRIES have been building and planning: creating more jobs, providing greater scope for technical advancement, raising the standard of living and building an atmosphere for a free and unfettered life so essential for the young to flower, develop, aspire and become leaders of tomorrow.

WALCHAND GROUP INDUSTRIES comprise a unity of diverse industries each working in unision to help others grow, creating opportunities for the young man of tomorrow to study, work and achieve fulfilment of his dreams to make a bigger, better India.

**WALCHAND GROUP INDUSTRIES**

*The Premier Construction Company Ltd. · The Hindustan Construction Company Ltd.*
*Walchandnagar Industries Ltd. · The Ravalgaon Sugar Farm Ltd.*
*The Indian Hume Pipe Company Ltd. · The Hindustan Spun Pipes Ltd.*
*Cooper Engineering Ltd. · The Acme Manufacturing Company Ltd. · Acrow India Ltd.*
*The Premier Automobiles Ltd. · Bombay Cycle & Motor Agency Ltd.*
*Premier Auto Electric Ltd.*

maa.WG-402A

Printed by : V. N. Patwardhan at ' Sadhana Press ' 430-31 Shanwar Peth, Poona 2.
Published by : Prof. R. T. Akkole at " Baramati College, " Baramati ( Poona ).

# BARAMATI COLLEGE

## MISCELLANY

अनेकान्त
एज्युकेशन सोसायटी, पुणें
...सिद्धिरनेकान्तात्...
बारामती कॉलेज, बारामती.

March 1964

Editor
**R. T. AKKOLE**

स्वच्छ, स्थिर व झगझगीत प्रकाशासाठी—

हत्ती छाप
घासलेट वापरा



शिवलाल प्रेमचंद लेंगरेकर

डिस्ट्रिब्यूटर्सः—एसो केमिकल्स

एसो फंगीसाईड–४०६ द्राक्षपिकांच्या सर्व रोगावरील औषध

एजंटः–एसो स्टॅन्डर्ड इस्टर्न इन्कॉर्पोरेटेड

बारामती–फलटण–भिगवण

1963 to 67
5
60

*Editorial Board*

PRIN. A. A. PATIL, M. A., M. Ed.
Chairman

PROF. R. T. AKKOLE, M. A.
Chief Editor

PROF. R. R. TIWARI, M. A.

PROF. S. R. NAWATHYE, M. SC.

PROF. R. M. DOSHI, M. A., B. T

SHRI ASHOK KOTHADIYA
Students Representative

# अनुक्रमणिका


| | | |
|---|---|---|
| महाविद्यालयाची दैनंदिनी | ... | ३ |
| संपादकीय | ... | ५ |
| भारत सरकारची शिष्यवृत्ति | ... | १० |
| **मराठी विभाग** | | |
| इंदापूरचा राघव स्वामी मठ | ... | १७ |
| रडार व त्याचे कार्य | ... | २० |
| वनस्पति सृष्टीतील काव्य संकेत | .... | २३ |
| स्वावलंबी शिक्षण योजना | ... | २६ |
| हद्दपारचा मुकुटमणि | .... | ३३ |
| पाषाणांतला झरा | ... | ३६ |
| समाधान | ... | ३८ |
| ताई | ... | ४१ |
| बाळ गेला दूर देशा | ... | ४५ |
| प्रे. जॉन केनेडी | ... | ४७ |
| आश्विनी | .... | ४९ |
| प्रेमकवि तांबे | ... | ५२ |
| मी मॅट्रिक नापास होतो | ... | ५६ |
| अखेरचे बोल | ... | ५८ |
| **हिंदी विभाग** | | |
| उमडकर आंखोसे चुपचाप | ... | ६१ |
| ओ भैया मोरे | .... | ६५ |
| पगली | ... | ७१ |
| वह कौन थी | .... | ७४ |
| शक्कर की कमी | ... | ७७ |
| एक विराट प्रश्न | ... | ७९ |
| एक इषारा | ... | ८० |
| आराम हराम है | ... | ८१ |
| **English-Section** | | |
| Tennyson–a study | .. | 82 |
| Swami Vivekanand | ... | 84 |
| Jewels from John Kennedy | .. | 86 |
| The Child of an Actress | .. | 87 |
| Hats off to the Kumou Loyal | | 88 |
| Sweet & Low, Sweet & Low | .. | 89 |
| A Pick-Pocket | .. | 90 |
| विविध विभाग अहवाल | ... | ९१ |



प्रकाशक : आर. टी. अक्कोळे, बारामती कॉलेज, बारामती.

मुद्रक : गो. य. हिरवे, साथीदार प्रिन्टर्स, ४६१/१ सदाशिव पेठ, टिळकरोड, पुणे २.


# महाविद्यालयाची दैनंदिनी

## एक दृष्टिक्षेप १९६३–६४

**जून—**

दि. २० : बारामती महाविद्यालयाचे दुसरे वर्ष सुरू झाले.

दि. २३ : महाविद्यालयाचा 'स्थापना दिन' साजरा करण्यात आला. बारामती नगरपालिकेचे अध्यक्ष श्री. धों. आ. सातव हे अध्यक्ष होते.

दि. २५ : प्राचार्य अ. आ. पाटील यांचे नव्या शैक्षणिक वर्षाचे उद्घाटनाचे भाषण क्षाले.

**जुलै—**

दि. १ : प्रयोगशाळांची नियमितपणे सुरुवात.

दि. १५ : विद्यार्थी सल्लागार मंडळाच्या (Students Council) वार्षिक निवडणुका झाल्या.

दि. २२ : छात्रसेना पथकाचे (N. C. C) उद्घाटन ९।६२ व्या बटॅलियन्सचे कमांडर मे. रानडे यांच्या हस्ते झाले.

दि. २४ : पुणे विद्यापीठाच्या १९६३ च्या प्री. डिग्रीच्या परीक्षेत प्रथम वर्ग मिळविणाऱ्या विद्यार्थी–विद्यार्थिनींचा सत्कार पुणे महानगरपालिकेचे माजी महापौर गुरुवर्य बा. ग. जगताप यांच्या अध्यक्षतेखाली करण्यात आला.

दि. २९ : पुणे विभागाचे कमिशनर श्री. उस्मानसाहेब यांचे 'अर्थ नियोजन' या विषयावर भाषण झाले.

**ऑगष्ट—**

दि. १ : पुणे विद्यापीठाचे कुलगुरु म. म. दत्तो वामन पोतदार यांच्या अध्यक्षतेखाली लोकमान्य टिळकांची पुण्यतिथि साजरी करण्यात आली. पुणे विद्यापीठाचे कार्यवाह श्री. व. ह. गोळे हेहि या प्रसंगी उपस्थित होते.

दि. ३ : पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष श्री. शंकरराव उरसळ यांच्या शुभहस्ते 'बुक बँके'चे उद्घाटन करण्यात आले.

दि. १० : महाराष्ट्र राज्याचे त्यावेळचे उपकृषि मंत्री ना. शंकरराव पाटील यांनी महाविद्यालयांतील नियोजन मंडळाचे उद्घाटन केले.

दि. १५ : स्वातंत्र्यदिनानिमित्त छात्रसेना पथकाकडून ध्वजवंदन. प्रांत ऑफीसर श्री. एस. बी. जाधव यांचे कॅडेट्सना उद्देशून भाषण, प्राचार्यांकडून शपथग्रहण.

दि. १६ : प्रा. भालबा केळकर यांच्या हस्तें 'विज्ञानमंडळाचे उद्घाटन. विज्ञानाचें महत्त्व' या विषयावर त्यांचे भाषण.

दि. १७ : ते २२ तिमाही परिक्षा.

दि. २१ : श्री. बी. आर. पाटील, विशेष अधिकारी शिक्षण खातें महाराष्ट्र राज्य यांचे प्राध्यापकासाठी 'ग्रामशिक्षण' या विषयावर भाषण झाले.

**सप्टेंबर—**

दि. ३ : मराठी वाङ्मय मंडळाच्या वतीने प्रा. तिवारी यांच्या अध्यक्षतेखालीं विद्यार्थी विद्यार्थिनींचा स्वरचित काव्यवाचनाचा कार्यक्रम झाला.

दि. ५ शिक्षक दिनानिमित्त "राष्ट्र रचनेंत शिक्षकाचे स्थान" या विषयावर प्रा. अ. आ. पाटील यांच्या अध्यक्षतेखाली परिसंवाद घेण्यांत आला हा परिसंवाद विकास अधिकाऱ्यांच्या विनंतीस अनुसरून बारामती महाविद्यालयातर्फे एम्. ई. एस्. हायस्कूलच्या सभागृहांत झाला.

दि. १२ : प्रा. अक्कोळे यांच्या अध्यक्षतेखाली वक्तृत्व विकास मंडळातर्फे वादविवादाचा कार्यक्रम झाला.

दि. २५ : मेजर सावंत यांचे लष्कर भरतीसंबंधी

विद्यार्थ्यांना उद्देशून मार्गदर्शनपर भाषण झाले.

दि. २८ : महाराष्ट्र राज्याचे त्यावेळचे अर्थमंत्री व सध्याचे उद्योगमंत्री ना. स. गो. बर्वे यांनी विजयादशनीच्या शुभमुहूर्तावर महाविद्यालयास भेट दिली.

**ऑक्टोबर—**

दि. २ : प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली म. गांधी जयंति साजरी करण्यांत आली. श्री. ए. बी. शहा, आर. आर. शहा, गांधी प्रा. लोंढे, प्रा. तिवारी व प्रा. आर. एम. दोशी यांची भाषणे झाली.

दि. ६ : प्राचार्यांच्या अध्यक्षतेखाली 'प्रश्न विचारा' हा कार्यक्रम झाला, विद्यार्थ्यांनी विविध प्रश्न विचारले प्राध्यापक व प्राचार्यांनी उत्तरे दिली.

दि. ७ ते ११ : सहामाही परीक्षा.

दि. २० : राष्ट्रीय ऐक्यदिनानिमित्त एन्. सी. सी. रायफल कंपनीची परेड होऊन प्राचार्यांच्या हस्तें ध्वजारोहण झाले.

दि. : बारामती येथे झालेल्या तालुका क्रीड महोत्सवांत–थ्रोबॉलमध्यें आमचा संघ विजयी ठरला.

**नोव्हेंबर—**

दि. १२ : श्रीमती कस्तुरबाई वालचंद दोशी यांनी महाविद्यालयास भेट दिली.

दि. १४ : प्राचार्यांच्या अध्यक्षतेखालीं पंतप्रधान पं. जवाहरलाल नेहरु यांची जयंती साजरी करण्यांत आली. श्री. ए. यू. दोशी, कु. गौर, कु. लंके, श्री. गांधी, प्रा. तिवारी, प्रा. दोशी, प्रा. गोधा व प्रा. अक्कोळे यांची भाषणें झाली.

दि. १६ : प्राचार्य दामले, वाडिया कॉलेज, पुणें यांच्या अध्यक्षतेखाली पुणें विद्यापीठाचे कमिशन आले.

बारामती येथे झालेल्या पुणे जिल्हा क्रीडा महोत्सवांत थ्रोबॉलमध्यें आमचा संघ विजयी ठरला.

दि. २३ : अमेरिकेचे प्रेसिडेंट केनेडी यांच्या दुःखद निधनानिमित्त शोकसभा घेण्यांत आली.

दि. २५ : महाराष्ट्र राज्याचे मुख्यमंत्री ना. मा. सां. कन्नमवार यांच्यां दुःखद निधनामित्त शोक सभा घेण्यांत आली.

**डिसेंबर—**

१ : महाबळेश्वर व प्रतापगड येथे महाविद्यालयाची सहल गेली.

दि. ५ : पुणे विद्यापीठाच्या आंतर महाविद्यालयीन सामन्यांत नाशिक येथे आमचा संघ उपविजयी ठरला.

दि. २१, २२ पुणे विद्यापीठाच्या आंतर महाविद्यालयीन स्पर्धांत अलिबाग येथें झालेल्या नाशिक विभागांत थ्रो बॉल, व बेस बॉलमध्ये आमचे संघ विजयी ठरले व रिंग टेनिसमध्यें आमचा संघ उपविजयी ठरला.

दि. २४ : आमच्या महाविद्यालयाचे वार्षिक स्नेहसंमेलन सुप्रसिद्ध शिक्षणतज्ञ व साहित्यिक श्री. विठ्ठलराव घाटे यांच्या अध्यक्षतेखाली झाले.

दि. २९ : सोलापूर येथे झालेल्या महाराष्ट्र राज्य क्रीडामहोत्सवात थ्रो बॉलमध्ये आमचा संघ उपविजयी ठरला.

**जानेवारी—**

दि. २६ : प्रजासत्ताक दिनानिमित्त सकाळी ८ वाजता झेंडावंदन झाले. आमच्या विद्यार्थी विद्यार्थिनींनी त्या दिवशीं निघालेल्या 'फ्लोट 'मध्ये व रात्री शहरात झालेल्या करमणुकीच्या कार्यक्रमात भाग घेतला. आमच्या 'फ्लोट 'ला दुसऱ्या क्रमांकाचे बक्षीस मिळाले.

**फेब्रुवारी—**

दि. २ ते ६ पर्यंत पूर्वपरीक्षा ( Preliminary )

दि. २९ : आमच्या महाविद्यालयातील ९|६२ महाराष्ट्र एन्. सी. सी. रायफल कंपनीने पुणे जिल्ह्याचे ग्रामीण विभागाचे डी. एस्. पी. श्री. एस्. एस्. भोसले यांच्या अध्यक्षतेखाली आपला पहिला कंपनी दिवस साजरा केला.

——





# संपादकीय

आमच्या बारामती महाविद्यालयाचे हे दुसरे वर्ष आहे. दुसऱ्या वर्षाचे हे 'वार्षिक नियतकालिक' वाचकांच्या हाती देतांना आम्हाला मोठा आनंद वाटत आहे. २३ जून १९६२ रोजी महाराष्ट्र राज्याचे त्या वेळचे मुख्यमंत्री आणि आजचे भारत सरकारचे संरक्षणमंत्री ना. यशवंतराव चव्हाण यांच्या शुभहस्ते गतवर्षी अनेकान्त एज्युकेशन सोसायटीच्या 'बारामती कॉलेज ऑफ आर्टस्, सायन्स ॲंड कॉमर्स ' या आमच्या संस्थेचे उद्घाटन झाले. दोन वर्षांच्या या अल्पावधींतच आमच्या कॉलेजने आपल्या कर्तबगारीने आणि त्यातून मिळविलेल्या यशाने बारामती व तिच्या परिसरातील जनतेच्या मनात आपले वैशिष्ट्यपूर्ण स्थान प्रस्थापित केले आहे. कोणतीहि संस्था मग ती शैक्षणिक असो, औद्योगिक असो, निर्माण होते ती जनतेच्याच गरजेतून. बारामती कॉलेज हें जनतेच्याच गरजेतून निर्माण झाले आहे. ग्रामीण भागातील जनतेच्या मनातील उच्च शिक्षणाची आकांक्षाच या कॉलेजच्या रूपाने मूर्तिमान झाली आहे. बारामती, दौंड, इंदापूर आणि पुरंदर या पुणे जिल्ह्याच्या पूर्व भागातील विद्यार्थ्यांची महाविद्यालयीन शिक्षणाची गरज आमचे हे महाविद्यालय पूर्ण करीत आहे.

**ग्रामीण भागातील महाविद्यालये—**

सर्व प्रकारच्या आवश्यक साधनांनी समृद्ध असलेल्या मोठ्या शहरात शिक्षण देणाऱ्या संस्थांपेक्षा जेथे आपल्या देशातील ८० टक्के लोक राहतात अशा मागासलेल्या ग्रामीण भागात शिक्षणप्रसाराचे कार्य करणाऱ्या संस्थाच आज देशाची खरी शैक्षणिक गरज भागवूं शकतील. ही गोष्ट खरी आहे की अशा संस्थात शिक्षणाची सर्व साधने सहजासहजी शहरातल्या संस्थाप्रमाणे उपलब्ध होत नाहीत. एवढेच नव्हे तर विद्यार्थ्यांच्या जेवण्या राहण्याची सोय करणेसुद्धा अशक्य होऊन बसते. पण या सर्व अडचणीवर मात करून ग्रामीण महाविद्यालयांनी हे सिद्ध केले आहे की ग्रामीण भागातील विद्यार्थीसुद्धा शहरी विद्यार्थ्यांशी बुद्धिमत्तेच्या बाबतीत सहज स्पर्धा करूं शकतात. आमच्या महाविद्यालयाचा गतवर्षाचा वार्षिक निकाल या दृष्टीने मननीय आहे. खेड्यापाड्यातून मोठ्या शहरात शिक्षणासाठी गेलेले विद्यार्थी त्या 'अद्भुत ' परिस्थितीशीं समरस होऊं शकत नाहीत. तेथे त्यांच्याकडे आपुलकीने पाहणाराहि कोणी नसतो. कित्येक विद्यार्थी शिक्षण बाजूला ठेवून केवळ चैन करूं लागतात आणि शेवटी स्वतःप्रमाणेच आपल्या पालकांनाहि निराश करतात. ही आपत्ति टाळण्यासाठी ग्रामीण भागातील शैक्षणिक संस्थाच अधिक उपयुक्त ठरूं शकतील.

**अनेकान्त एज्युकेशन सोसायटी ( पुणें )**

आमचे बारामती कॉलेज हे 'अनेकान्त एज्युकेशन सोसायटी ' ( पुणें ) कडून चालविले जाते. हैद्राबाद राज्याचे माजी शिक्षण मंत्री व एक थोर समाजसेवक श्री. फुलचंद रामचंद गांधी हे या सोसायटीचे शिल्पकार आहेत. त्यांच्याच प्रेरणेने व कार्यप्रवणतेने या संस्थेची निर्मिति झाली. ते सोसायटीचे अध्यक्ष असून श्री. लालचंद हिराचंद व श्रीमती कस्तुरबाई वालचंद हे सोसायटीच्या संचालक मंडळाचे प्रमुख सदस्य आहेत. त्यांच्या व संचालक मंडळांतील इतर सदस्यांच्या सक्रिय सहकार्याने आमची संस्था समाजाची भरीव सेवा करूं शकेल असा आम्हाला विश्वास वाटतो.

पुढील वर्षी याच सोसायटीतर्फे जयसिंगपूर ( कोल्हापूर ) येथें आर्टस्, सायन्स व कॉमर्स कॉलेज काढण्यासाठी सोसायटीने शिवाजी विद्यापीठाकडे अर्ज केला होता आणि विद्यापीठाने तशी परवानगी दिली आहे हें कळविण्यास आम्हास आनंद वाटतो. आपल्या

शाखोपशाखांनी समृद्ध होऊन अनेकान्त ए. सोसायटी समाजाचे बौद्धिक नेतृत्व अनेकान्तात्मक मार्गाने निश्चितपणे करूं शकेल अशी आमची खात्री आहे.

### बारामतीकरांचे सहकार्य

या संस्थेची बारामती येथे एक स्थानिक समिति असून सल्लागार समितिहि आहे. सल्लागार समितींत बारामतींच्या परिसरांतील साखर कारखान्याचे व निरनिराळ्या शैक्षणिक संस्थांचे प्रतिनिधि आहेत.

अ. ए. सोसायटीचे व स्थानिक समितीचे सेक्रेटरी डॉ. व. रा. कोठारी व स्थानिक समितीचे कोषाध्यक्ष श्री. मो. फु. शहा हे कॉलेजच्या प्रगतीसाठी अविरत प्रयत्न करतात. माजी नगरध्यक्ष श्री. धों. आ. सातव, सध्याचे नगराध्यक्ष श्री. विठ्ठलराव, सोनवणे यांनी आपापल्या कारकीर्दीत कॉलेजच्या प्रत्येक कार्यांत फार मोठी मदत केली आहे. मामलेदार श्री. पाटील यांनीहि कॉलेजचे स्वतंत्र वसतिगृह व्हावे यासाठी प्रयत्न चालविला आहे. स्थानिक समितीचे अध्यक्ष श्री. जंबुकुमार शहा, अ. ए. सोसासटीचे कोषाध्यक्ष श्री. माणिकचंद तुळजाराम शहा व खुशालचंद छाजेड, अण्णासाहेब भोंगळे, शंकरराव दाते, भालचंद्रराव तावरे, शशिकांत शहा, अण्णासाहेब शेंबेकर इत्यादि कार्यकर्त्यांचा कॉलेजच्या कार्यांत नेहमींच पुढाकार असतो. माळेगांव सहकारी साखर कारखाना, बारामती नगरपालिका, मर्चेंट्स् असोशिएशन, ॲग्रिकल्चरल प्रोडयूसर्स मार्केट कमिटी, पुणें जिल्हा परिषद इत्यादि संस्थांकडून कॉलेजला सक्रिय मदत मिळत आहे. या सर्वांचे आम्ही आभारी आहोंत.

### बारामती महाविद्यालयाच्या परिसरात—आमचे प्राचार्य

आमच्या कॉलेजचे गतवर्षाचे प्राचार्य शा. दा. वणकुंद्रे सेवानिवृत्त झाले आणि नवे प्राचार्य अ. आ. पाटील यांनी मे १९६३ पासूनच बारामती महाविद्यालयाची जबाबदारी आपल्याकडे घेतली. ते मुंबई विद्यापीठाचे एम्. ए. एम्. एड्. आहेत. आजपर्यंतच्या आपल्या शिक्षण क्षेत्रांतील कर्तबगारीने त्यांनी पुरोगामी दृष्टीचे शिक्षण तज्ज्ञ म्हणून मोठा लौकिक मिळविला आहे. विद्यार्थ्यांच्या व कामगारांच्या राजकीय लढ्यांचे नेतृत्व त्यांनी केले आहे. इतकेच नव्हे तर स्वातंत्र्याच्या लढ्यांत प्रत्यक्ष तुरुंगवासहि भोगला आहे. म्हणूनच जीवन आणि शिक्षण यांचा मेळ बसविण्याचा त्यांचा नित्य प्रयत्न असतो.

सातारा येथील कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेल्या ' रयत शिक्षण संस्थेचे ते आजीव सदस्य होते. त्या संस्थेच्या छत्रपति शिवाजी कॉलेजांत इतिहास विषयाचे प्रोफेसर होते. गेली चार वर्षे ते पुणे विद्यापीठाच्या कार्यकारी मंडळाचे सभासद होते आणि पुढील चार वर्षांसाठी पुनश्च ते त्या मंडळावर बहुमताने विद्यापीठाच्या विधिमंडळातून निवडून आले आहेत. आपल्या व्यासंगी वक्तृत्वाने त्यानी पुणे विद्यापीठाच्या कोर्टाच्या व कार्यकारी मंडळाच्या सभा त्यांनीं गाजविल्या आहेत. शिवाजी विद्यापीठाच्या सल्लागार मंडळावर महाराष्ट्र सरकारने त्यांची नेमणूक केली होती आणि सध्या ते त्या विद्यापीठाच्या इतिहास अभ्यास मंडळाचे सभासद आहेत. पुणे विद्यापीठाच्या बहिःशाल व्याख्यानमालेंत त्यांनी फारच लोकप्रियता संपादन केली आहे. त्यांच्या वस्तुनिष्ठ आणि तार्किक विचारसरणीमुळे ते कधी भावनेच्या आहारी जाऊं शकत नाहीत. शिक्षणासंबंधी स्वतंत्र आणि मौलिक अशी त्यांची विचार धारा आहे. ' यः क्रियावान् स पंडितः ' हे त्यांचे आवडते सूत्र आहे. विद्या क्रियाशील व्हावी यासाठी त्यांचा प्रयत्न असतो. प्रथमपासूनच बहुजन समाजात कार्य केल्यामुळें व कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या सहवासांत राहिल्यामुळे शिक्षणात श्रमाची प्रतिष्ठा राहावी, गरीब आणि होतकरू विद्यार्थ्यांची शिक्षणाची सोय कॉलेजने स्वतः झीज सोसून करावी इकडे त्यांची खास दृष्टि आहे.

बारामती कॉलेजचे प्राचार्यपद घेतांना त्यांनी अनेक मोहांचा त्याग केला. ग्रामीण विभागात आपले कार्यक्षेत्र निवडण्यांत आपण शिक्षणाच्या द्वारे लोकसेवा साधावी हाच त्यांचा हेतु आहे. 'मनांत जिद्द असेल तर आपण माळरानाचे नंदनवन बनवूं ' असे ते म्हणतात. आणि गेल्या



त्यांचा त्यासाठी अखंड प्रयत्न सुरूं आहे. विविध क्षेत्रातील नामांकित व्यक्तींचा त्यांनी आमच्या कॉलेजशी परिचय घडविला, ग्रंथालय समृद्ध केले, स्वावलंबी शिक्षण योजना सुरू केली, बुक बँकेची निर्मिति केली, विद्यार्थ्यांना शिष्यवृत्ति मिळवून देण्यासाठी स्वतः जातीने प्रयत्न केले. लोकसंपर्क वाढविला. कॉलेजसंबंधी निवेदन छापून खेडोपाडी आवाहन केले. कॉलेजचा विकास सर्व बाजूंनी व्हावा अशी चौफेर दृष्टि त्यांनी बाळगिली आहे आणि त्यासाठी त्याचा सतत प्रयत्न सुरू आहे.

खरोखरच आमच्या प्राचार्यांचे व्यक्तित्व आमच्या कॉलेजपेक्षाहि मोठे आहे. त्यांच्यामुळेंच दिवसेदिवस कॉलेजलाहि महत्ता प्राप्त होत चालली आहे. असे आम्हास निःसंकोचपणें म्हणावेसे वाटते.

### प्राध्यापक वर्ग

गतवर्षी आमच्या महाविद्यालयातील प्राध्यापकांची संख्या ११ होती. चालू वर्षी त्यांची संख्या २० आहे. आमच्या जुन्या सहकार्यांपैकी संस्कृतच्या प्राध्यापिका कु. गोदावरी शहाणे, भूगोलाचे प्राध्यापक दा. सी. देसाई, इंग्रजीचे प्राध्यापक बी. जी. जोशी आणि वनस्पतिशास्त्राचे प्राध्यापक पी. एम्. वारद हे अन्यत्र गेले. चालू वर्षी इंग्रजी विभागात प्रा. एल्. पी. दाते, आर. एम्. दोषी, व सौ. वत्सलाबाई पाटील, संस्कृत विभागात प्रा. एन्. जी. लोंढे, भूगोल विभागात प्रा. पी. एस्. शेवाळे, वनस्पति–प्राणिशास्त्र विभागात प्रा. पी. आर. दोशी व प्रा. ए. के. फाटक, रसायनशास्त्र विभागात कु. नलिनी शहा आणि पदार्थविज्ञान विभागात श्री. एम्. के. पाटील, व पी. टी. डायरेक्टर श्री. डी. एम्. झोडगे हे नवे सहकारी आम्हास लाभले. कॉमर्सचे प्रा. जे. के. गोधा यांनी आपल्या इतर तीन सहकाऱ्यासमवेत लिहिलेले ' Comercial organisation ' हे पुस्तक नुकतेच प्रसिद्ध झाले आहे. मराठीचे प्रा. रा. ति. अक्कोळे यांनी आपला पी. एचडी. चा प्रबंध नुकताच पूर्ण करून पुणे विद्यापीठास परीक्षेसाठी सादर केला आहे.

### गतवर्षाचा निकाल

आमच्या कॉलेजात गतवर्षी प्री. डिग्री आर्टस्, सायन्स व कॉमर्स असे तीन वर्ग होते. त्या तीनहि वर्गांचा विद्यापीठाचा निकाल उत्कृष्ट लागला. आमचे तीन विद्यार्थी प्रथम वर्गात आले. कु. वसुधा लंके ( पी. डी. सायन्स ) श्री. अशोक शहाणे (पी. डी. सायन्स) व कु. विजया पाटील ( पी. डी. आर्टस् ) या तिघांचेहि आम्ही कॉलेजच्या वतीने हार्दिक अभिनंदन करीत आहोत. गतपर्षाचा निकाल पुढीलप्रमाणे आहे.

| वर्ग | नोंदणी | गैरहजर | बसले | पहिला वर्ग | दुसरा वर्ग | पास | एकूण | शेंकडा प्रमाण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|
| पदवीपूर्व आर्टस् | ५१ | — | ५१ | १ | २० | १२ | ३३ | ६४.७ |
| पदवीपूर्व सायन्स | ३८ | ४ | ३४ | २ | ९ | १४ | २५ | ७८.५ |
| पदवीपूर्व कॉमर्स | २१ | ३ | १८ | — | ९ | ६ | १५ | ८३.३ |
| | ११० | ७ | १०३ | ३ | ३८ | ३२ | ७३ | ७०.८ |

टक्केवारीचा विचार केल्यास १९६३ च्या पुणे विद्यापीठाच्या प्री डिग्रीच्या परीक्षेत आमच्या कॉलेजचा क्रमांक दुसरा लागला ही विशेष आनंदाची गोष्ट आहे.

### चालू वर्षाचे सिंहावलोकन--

आमच्या कॉलेजचे हे वर्ष कितीतरी विविध नव्या नव्या उपक्रमांनी समृद्ध असें गेले. यावर्षी कॉलेजांत एकूण २१२ विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. त्यांत शहर भागातील १०२ विद्यार्थी असून ग्रामीण भागांतील विद्यार्थी ११० आहेत. बी. ए., बी. एस्सी., बी. कॉम् पदवीच्या पहिल्या भागाचे वर्ग उघडण्यांत आले आहेत.

वसतिगृहासाठी स्वतंत्र सोयीची इमारत नसल्याने फक्त ११ विद्यार्थ्यांची सोय कॉलेजने वसतिगृहात केली आहे. सरकारने जरी बाराशे रुपयाखाली उत्पन्न असणाऱ्या विद्यार्थ्यांची फी स्वतः देण्याचे ठरविले असले तरी कित्येक विद्यार्थ्यांना राहण्यांजेवण्याचा खर्च झेपत नाहीं. अशा सुस्वभावी आणि होतकरू विद्यार्थ्यांसाठी ‘ स्वावलंबी शिक्षण योजना ’ आमच्या कॉलेजांत आमच्या प्राचार्यांनी सुरूं केली आहे. विद्यार्थ्यांना झेपतील अशी कामे अशा मुलांना देऊन त्या मोबदल्यांत त्यांना राहण्या व जेवण्याचा खर्च कॉलेजकडून दिला जातो. चालूं वर्षी या योजनेंत चार विद्यार्थी शिक्षण घेत आहेत. गरीब विद्यार्थ्यांना अभ्यासाची पुस्तके वर्षभर वापरण्यासाठी कॉलेजच्या ‘ बुक बँकेतून ’ दिली जातात. चालूं वर्षी ही ‘ बुक बँक ’ उघडण्यांत आली. तिचा फायदा अनेक विद्यार्थ्यांनी घेतला. विद्यार्थ्यांना निरानिराळ्या स्कॉलरशिप्स् मिळवून देण्याच्या कामीं चालूं वर्षीं प्राचार्यांनी तत्परतेने लक्ष घातल्यामुळें आमच्या कॉलेजांत ‘ शिष्यवृत्तीचे मानकरी ’ बरेच निघाले. श्री. बी. पी. चावरे व श्री. पी. एन. बालगुडे या दोन विद्यार्थ्यांना ‘ गवर्नमेंट ओपन मेरिट स्कॉलरशिप्स् ( प्रत्येकी मासिक ३० रु. प्रमाणें चार वर्षें मिळेल ) मिळाल्या. बी. पी. चावरे पी. एन. बालगुडे आर. ए. दंडवते या तीन विद्यार्थ्यांना हिंदी स्कॉलरशिप्स् प्रत्येकी मासिक ५० रु. १० महिने पर्यंत मिळाल्या. इतर जुन्या व नामवंत कॉलेजशी तुलना केली असतां आमच्या कॉलेजात वरील शिष्यवृत्ति मिळविणारे विद्यार्थी अधिक आहेत हे नमूद करण्यास आम्हाला अभिमान वाटतो. वरील शिष्यवृत्त्याशिवाय ‘ गवर्नमेंट मेरिट फ्रीस्टुडंट्शिप् ’ गवर्नमेंट लोन स्कॉलरशिप, राजकीय पीडितांच्या पाल्यासाठी मिळणारी स्कॉलरशिप् आमच्या कॉलेजांतील कित्येक विद्यार्थ्यांना प्राप्त झाल्या आहेत. त्या सर्वांची यादी अन्यत्र याच अंकांत छापली आहे.

चालूं वर्षाचे आमचे स्नेहसंमेलन सुप्रसिद्ध शिक्षणतज्ज्ञ व साहित्यिक श्री. वि. द. घाटे यांच्या अध्यक्षतेखाली २४ डिसेंबर १९६३ रोजीं आनंदांत पार पडले. आमच्या कॉलेजांत चालूं वर्षीं ‘ स्टुडंट्स् कौन्सिल ’ निर्माण करण्यांत आले. त्यात निवडून आलेल्या विद्यार्थ्यांनीच प्राध्यापकांच्या सल्ल्याने कॉलेजमधील क्रीडाविभागादि सर्व विभागांचे संचालन केले. आमच्या कॉलेजच्या क्रीडाविभागाने चालू वर्षीं विशेष प्रगति केली आणि नाशिक विभागीय सामन्यांत कॉलेजला भूषणावह असें यश प्राप्त करून दिले. बेसबॉल व थ्रो बॉल संघांतील मुलींनी नाशिक विभागांत चँपियनशिप मिळविली हें खरोखरच अभिनंदनीय आहे. सोलापूर येथें झालेल्या महाराष्ट्र राज्य क्रीडा महोत्सवांत सदरहू संघांनी अखेरचा विजय मिळविला आणि रौप्य पदके मिळविली. विद्यापीठीय शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना चालूं वर्षापासून भारत सरकारने लष्करी शिक्षण आवश्यक केले आहे. आमच्या कॉलेजने प्रा. तिवारी यांना सांताक्रुझला लष्करी प्रशिक्षणासाठी पाठविले होते. ते शिक्षण घेऊन आले आणि आमच्या कॉलेजांत ९।६२ महाराष्ट्र एन्. सी. सी. रायफल कंपनी चालूं झाली.

चालूं वर्षी या नात्या निमित्ताने पुढील नामवंत व थोर व्यक्तींनी आमच्या कॉलेजला भेटी दिल्या आणि विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले. पुणे महानगरपालिकेचे महापौर गुरूवर्य बा. ग. जगताप, पुणे विभागाचे कमिशनर श्री. उस्मानसाहेब, पुणे विद्यापीठाचे कुलगुरु म. म. दत्तो वामन पोतदार, पुणे विद्यापीठाचे कार्यवाह श्री. व. ह. गोळे; पुणे जिल्हा परिषदेचे अध्यक्ष श्री. शंकरराव उरसळ, महाराष्ट्र राज्याचे माजी उपकृषिमंत्री ना. शंकरराव पाटील, प्रा. भालबा केळकर, महाराष्ट्र राज्य शिक्षण खात्याचे विशेष अधिकारी श्री. बी. आर. पाटील, मेजर सावंत, महाराष्ट्र राज्याचे उद्योगमंत्री ना. स. गो. बर्वे, श्रीमती कस्तुरबाई वालचंद दोशी प्राचार्य दामले (वाडिया कॉलेज, पुणे), श्री. विठ्ठलराव घाटे, पुणे जिल्ह्याचे ग्रामीण विभागाचे डी. एस्. पी. श्री. एस्. एस्. भोसले. वरील सर्व महानुभावांचे आम्ही आभारी आहोत.





आमचे प्राचार्य



श्री. अ. आ. पाटील

पुढील वर्षासाठी एस्. वाय्., बी. ए., बी. एस्. सी., बी. कॉम्. आणि टी. डी. चा अभ्यासक्रम आमच्या कॉलेजात शिकविण्यासाठी पुणे विद्यापीठाकडे परवानगी मागितली होती. त्यासाठी वाडिया कॉलेज ( पुणे )चे प्राचार्य प्र. रा. दामले यांच्या अध्यक्षतेखाली चौकशीमंडळ येऊन गेले आणि त्याप्रमाणे आम्हाला नवे वर्ग काढण्यासाठी परवानगी मिळाली आहे.


आभार

प्रस्तुत अंक तयार करतांना अनेकांचे अनेक प्रकारे साहाय्य झाले आहे. प्राचार्य अ. आ. पाटील यांनी केलेल्या बहुमोल मार्गदर्शनाबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत. आमचे सहकारी संपादक प्रा. तिवारी, प्रा. र. मा. दोशी व प्रा. नवाथे यांनी सर्वतोपरी मदत केली आहे. विशेषतः प्रा. मा. र. दोशी यांनी या अंकासाठी जाहिराती मिळविण्याचे काम अतिशय परिश्रम घेऊन केले. या अंकाचे लेखक, कवि व जाहिरातदार यांचे आम्ही आभारी आहोत. साथीदार प्रिंटर्सने अंकाचे काम सुबक व वेळेवर करून दिल्याबद्दल आम्ही त्यांचे आभारी आहोत.


—रा. ति. अकोळे

---


मुंबईकर कापड दुकान

मद्रास बिन्नी कापडाचे प्रमुख विक्रेते

मेन रोड - बारामती.

# भारत सरकारची परत फेडीची शिष्यवृत्ति

( अ ) उद्देश

शिष्यवृत्त्या आणि विद्यावेतने यांचा बरेच विद्यार्थी फायदा घेत असले तरीही अजून भारतांत पुष्कळ हुशार व होतकरू विद्यार्थी पैशाच्या अडचणीमुळे महाविद्यालयीन शिक्षणाचा लाभ घेऊं शकत नाहीत. अशा लायक विद्यार्थ्यांना परत फेडीच्या अटीने कर्जावू शिष्यवृत्त्या देण्याची योजना मध्यवर्ति शिक्षण मंत्रालयाने आखली आहे. त्यामुळे गुणी व हुशार विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण घेता यावे व त्यांना आवड असल्यास शिक्षणाच्या पेशाकडे आकर्षित करावे असा या योजनचा दुहेरी उद्देश आहे.

( ब ) व्याप्ति—

ही परतफेडीच्या अटीची कर्जावू शिष्यवृत्ति फक्त भारतीय नागरिकांसच मिळेल. त्यासाठी तो खालील-पैकी कोणतीहि एक परीक्षा उत्तीर्ण झालेला असला पाहिजे. खाली दिलेल्या परीक्षेपैकी कोणत्याहि परी-क्षेत तो पास झाल्यावर त्याला पुढील आर्टस्, सायन्स, वाणिज्य, तांत्रिक अथवा तत्सम व्यवसायांतील शिक्षण-क्रम पूर्ण करण्याची अट मान्य करून ती पुरी करावी लागेल.

पहिल्या पदवी अभ्यासक्रमाला प्रवेश मिळविण्यासाठी विद्यार्थी खालीलपैकी कोणतीहि एक परिक्षा उत्तीर्ण झालेला पाहिजे. या परीक्षेतील गुणच फक्त शिष्यवृत्ति देतांना विचारांत घेतले जातील.

( १ ) **एस्. एस्. सी. / एच्. एस्. सी।** एस्. एल्. सी. । मॅट्रिक्युलेशन अथवा तत्सम शालांत परीक्षा.

( २ ) सीनियर केंब्रिज परीक्षा.

( ३ ) युनिव्हर्सिटी प्रवेश परीक्षा.

( ४ ) **एफ्. वाय्., बी. एस्. सी.** / बी. एस्सी विभाग प्रथम । अथवा ( **इंजिनियरिंग अथवा मेडि-कल कॉलेज प्रवेशासाठी आवश्यक** परीक्षा )

( ५ ) इंटर अथवा

( ६ ) महाविद्यालयीन शिक्षणासाठी आवश्यक असणारी कोणतीहि सरकारमान्य परीक्षा.

( ७ ) बी. ए. / बी. एस्सी. / या पदव्यांचा अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी किंवा तत्सम व्यवसाय किंवा तांत्रिक शिक्षणातील प्रथम पदवीचा किंवा डिप्लोमाचा अभ्यासक्रम पूर्ण करण्यासाठी ही शिष्यवृत्ती मिळेल.

( ८ ) एम्. ए. / एम्. एस्सी. / एम्. कॉम्. या सारख्या पदव्यांचा किंवा तत्सम डिप्लोमाचा अभ्यास-क्रम पुरा करणारालाहि शिष्यवृत्ति धारण करता येईल.

( क ) परतफेडीच्या कर्जाऊ शिष्यवृत्तीसाठी पात्र-तेच्या अटी :—

( १ ) शिष्यवृत्ति भारतीय नागरिकालाच धारण करता येईल.

( २ ) तो विद्यार्थी हा ' ब ' विभागात सांगितल्या-प्रमाणे शालान्त परीक्षा **प्रथम श्रेणीत** उत्तीर्ण झालेला असावा अथवा त्याला **६०% गुण त्या परीक्षेत** मिळालेले असले पाहिजेत. त्याच्या पालकाचे/वडिलांचे वार्षिक उत्पन्न **६००० रुपयापेक्षा अधिक असता कामा नये.**

( ३ ) खालीलपैकी शिष्यवृत्ति धारण करणारा विद्यार्थी वरील कर्जाऊ शिष्यवृत्तीसाठी पात्र ठरत नाही.

( अ ) राष्ट्रीय शिष्यवृत्ति योजनेतून मिळणारी शिष्यवृत्ति.

( ब ) मेरिट स्कॉलरशिप योजनेतून शालान्त परीक्षे-नंतरच्या उच्च शिक्षणाला मिळणारी शिष्यवृत्ति.

( सी ) मध्यवर्ति सरकारची, राज्यसरकारची, विद्या-पीठाची अथवा खाजगी फंडातून मिळणारी शिष्यवृत्ति जर कर्जावू शिष्यवृत्ती इतकी अथवा जास्त रकमेची असेल तर धारण करणारास कर्जावू शिष्यवृत्ति मिळ-णार नाहीं.

( डी ) पूर्ण वेळ काम करणारे नोकरींतील विद्यार्थी अथवा

( ड ) काम करून शिकणाऱ्यासाठी चालविलेल्या रात्रींच्या कॉलेजात शिकणाऱ्या किंवा पोष्टाच्याद्वारे शिक्षण घेणारे पात्र ठरत नाहींत.

( क ) प्रत्येक वर्षी विद्यार्थ्याला त्याच्या अभ्यास-क्रमानुसार ७२० रुपयापासून १७५० रुपयापर्यंतची शिष्यवृत्ति मिळेल.

| | |
|---|---|
| ( १ ) प्री–डिग्री / प्री. प्रोफेशनल / इंटर / बी. ए./ बी. एस्सी / बी.–कॉम्. | ७२० |
| ( २ ) इंजिनियरिंग / तांत्रिक शिक्षण शाखा व्यवसाय यातील डिप्लोमासाठी | ७२० |
| ( ३ ) इंजिनियरींग, मेडिकल, तांत्रिक शिक्षण यातील पदवीसाठी. | ९७० |
| (४) एम्. ए. / एम्. एस्सी. / एम्.–कॉम्. | ९०० |

( a ) शिष्यवृत्तीची रक्कम मजूर करतांना विद्यार्थी शहरांतील किंवा ग्रामीण भागांतील कॉलेजातील आहे याचा विचार केला जातो.

( b ) विद्यार्थ्याला वरील शिष्यवृत्ति घेताना कॉलेजकडून मिळणारी फीतील सवलतहि चालू ठेवतां येईल.

( c ) जर विद्यार्थ्याला अन्य कोणाकडून आर्थिक मदत मिळत असेल तर तितकी रक्कम कमी करून राहणाऱ्या रकमे इतकी कर्जावू शिष्यवृत्ति मंजूर केली जाईल.

( इ ) ( १ ) शिष्यवृत्त्या देताना फक्त गुणानु-क्रमानेच पात्र विद्यार्थ्यांचा विचार केला जाईल. त्यावेळीं

( ब ) विभागांत सांगितलेल्या परिक्षा फलांचाच विचार केला जाईल.

( २ ) शिष्यवृत्त्या मिळणाऱ्यांची नांवें प्रमुख वृत्तपत्रांतून राज्य सरकार जाहीर करील.

( ३ ) त्यानंतर शिष्यवृत्ति मिळणाऱ्या विद्यार्थ्यांनी महाविद्यालयांत दाखल झाल्याची तारीख, शिक्षणक्रमाचे नांव, वसतिगृहांत प्रविष्ट किंवा इतर आवश्यक माहिती महाविद्यालयाच्या प्रमुखामार्फत पूर्णपणे राज्यसरकारला कळविली पाहिजे.

( उ ) करारनामा :

शिष्यवृत्ति धारण करणाऱ्यानें सरकारला करारनामा लिहून दिला पाहिजे.

( ऊ ) कर्जावू शिष्यवृत्ति ही कांहीहि तारण न घेतां दिली जाते.

( ए ) विद्यार्थ्याला दरवर्षी पास झाल्यास ती शिष्यवृत्ति चालू राहिल. ती कोर्स पूर्ण होईतोंपर्यंत चालू राहिल. वर्तणूक आणि नियमितपणा याचाहि विचार केला जाईल. तो विद्यार्थी नापास झाल्यास त्या-वर्षापुरती त्याची शिष्यवृत्ति रद्द होईल परंतु त्याने तीच परीक्षा पुन्हा ६०% गुण मिळवून उत्तीर्ण केली तर शिष्यवृत्ति चालू करण्यांत येईल.

संस्थेच्या प्रमुखांची शिफारस प्रत्येक वर्षी असल्या-शिवाय शिष्यवृत्ति चालू राहणार नाहीं.

( ऐ ) शिष्यवृत्तीची रक्कम संस्थेच्या प्रमुखामार्फत हप्त्याहप्त्याने विद्यार्थ्याला मिळेल.

( ओ ) **परत फेड**

( १ ) विद्यार्थी शिक्षणक्रम पुरा करून ज्यावेळीं पैसे मिळवूं लागेल त्या तारखेपासून एकवर्षाने परत फेड करू लागेल.

(२) मासिक हप्त्याने त्याने ती रक्कम परत फेडावयाची आहे. मासिक उत्पन्न जर ३०० रुपयापेक्षां कमी असेल तर त्याच्या दहावा हिस्सा हप्ता दरमहा भरावा लागेल.

जर तेंच उत्पन्न ३०० पासून ५०० पर्यंत असेल तर आठवा हिस्सा आणि ५०० पेक्षां अधिक असेल तर सहावा हिस्सा आणि अधिक रकमेचा हप्ता भरावयाचा असला तरी त्याला तो भरतां येईल.

तो विद्यार्थी जर शिक्षणाच्या व्यवसायांत पडला तर त्याला कर्जमाफ होईल अथवा फक्त मूळ कर्जाचा

दहावा हिस्साच शिक्षक या नात्याने सरकारमान्य ठिकाणीं केलेल्या नोकरीबद्दल दरवर्षी माफ केला जाईल.

( ४ ) विद्यार्थ्यांने व्यवसायाला लागल्यानंतर ते कर्जाचे हप्ते ट्रेझरी, अथवा रिझर्व बँकेच्या शाखेत भरून त्याच्या चलनाची प्रत राज्य सरकारला पाठवावी.

( ५ ) तो विद्यार्थी मृत्यु पावला अथवा कांहीं कारणानें पंगु होऊन धनार्जन करण्यास अपात्र ठरला व तसे त्याने अपात्रतेचे डॉक्टरचे सर्टिफिकेट दिल्यास त्याला ते कर्ज माफ केले जाईल.

( औ ) ही परतफेडीची कर्जावू **शिष्यवृत्ति व्याज रहित आहे.** प्रत्येक विद्यार्थ्याला 'लोन स्कॉलरशिप बुक' दिले जाईल. त्यात त्याला दिलेल्या व परत फेडलेल्या रकमेचा उल्लेख राहील.

ही स्कॉलरशिप राज्य सरकार दरवर्षी 'मे' च्या पहिल्या आठवड्यांत प्रमुख वृत्तपत्रांतून जाहीर करील. त्याचप्रमाणें त्याची माहिती सर्व विद्यापीठाना पाठविली जाईल.

**शिष्यवृत्ति मिळविण्यासाठी लागणाऱ्या गोष्टी :**

शिष्यवृत्तीच्या अर्जाबरोबर खालील गोष्टी आवश्यक आहेत.

( १ ) अर्जाची सरकारी ( सूचि ब ) प्रमाणे एक प्रत.

( २ ) पासपोर्ट आकाराचा अर्जदाराचा फोटो त्याच्या स्वतःच्या सहीसहित अर्जावरील सांगितलेल्या जागी चिकटविणे.

( ३ ) एस्. एस्. सी. अथवा तत्सम परीक्षेतील गुणाची खरी नक्कल प्रत.

( ४ ) इतर परीक्षेंतील अथवा डिप्लोमा परीक्षेतील मार्क्सची खरी नक्कल.

( ५ ) पूर्वी दाखल झालेल्या शाळेंतील प्रमुखांचे अर्जदार तेथील विद्यार्थी असल्यासंबंधींचे प्रशस्तिपत्र.

( ६ ) पालक । वडील यांचे उत्पन्नाच्या संबंधींचे सूचि 'क' प्रमाणे प्रतिज्ञापत्र.

वरील सर्व गोष्टी पूर्ण करून अर्ज भरावा.

---



## श्री. अप्पासाहेब भोंगळे



श्री. अप्पासाहेब भोंगळे हे बारामतीतील एक प्रगतिशील व सुशिक्षित बागायतदार आहेत. ते एक निष्ठावान काँग्रेस कार्यकर्ते असून सार्वजनिक संस्थांचे पदाधिकारी आहेत. मालेगाव व सणसर येथील सहकारी साखर कारखान्यांचे ते डायरेक्टर आहेत. आधुनिक शेतीतंत्राचा व अवजारांचा उपयोग केल्यामुळे त्यांनी या भागात शेतीच्या धंद्यात फार मोठे यश संपादन केले आहे.

१९६२-६३ च्या अखिल भारतीय ऊसपीक स्पर्धेत भाग घेऊन त्यांनी त्यात प्रथम क्रमांक मिळविला. एकरी १३८·३३ टन उत्पादन उच्चांक गाठल्याबद्दल भारत सरकारने त्यांना २५०० रुपयांचे पहिले पारितोषिक व सुवर्णपदक देऊन नुकताच गौरव केला. त्यांनी यापूर्वीहि अशी दोनदा बक्षिसें मिळविली आहेत.



## पुणे विद्यापीठाच्या १९६३ च्या प्री-डिग्रीच्या परीक्षेत प्रथम वर्गात आलेले आमचे विद्यार्थी



श्री. रमेश शहाणे,
पी. डी. सायन्स



कु. वसुधा लंके,
पी. डी. सायन्स

卐



कु. विजया पाटील,
पी. डी. आर्टस्

आंतरमहाविद्यालयीन रिंगटेनिस ( दुहेरी ) उपविजयी



कु. कोकिळा शहा व कु. पुष्पा यादव

रिंगटेनिस ( एकेरी ) उपविजयी



कु. पुष्पा यादव

## १९६३-६४ शैक्षणिक वर्षामध्ये स्कॉलरशिपस् मिळविणारे आमचे विद्यार्थी-विद्यार्थिनी

( १ ) गव्हर्नमेंट ओपन मेरिट स्कॉलरशिपः—

( १ ) श्री. बी. पी. चावरे पी. डी. सायन्स रु. ३००

( २ ) श्री. पी. एन्. बालगुडे पी. डी. सायन्स रु. ३००

( २ ) हिंदी स्कॉलरशिपः—

( १ ) श्री. बी. पी. चावरे पी. डी. सायन्स रु. ५००.

( २ ) श्री. एस्. बी. लडकत पी. डी. सायन्स रु. ५००.

( ३ ) श्री. आर. ए. दंडवते पी. डी. सायन्स रु. ५००.

( ३ ) गव्हर्नमेंट मेरिट-फ्री स्टुडंटशिपः—

( १ ) श्री. सी. एस्. कलंत्रे एफ्. वाय्. बी. एस्सी. ( बी. ) रु. १२७-५०.

( २ ) श्री. आर. बी. बोराटे एफ्. वाय्. बी. एस्सी. ( ए. ) १२७-५०.

( ३ ) कु. पुष्पलता एस्. रोंघे एफ्. वाय्. बी. ए. रु. २१५.

( ४ ) श्री. बी. पी. चावरे पी. डी. सायन्स रु. १२२-५०.

( ५ ) कु. सुनंदा जी. पुरंदरे पी. डी. आर्टस् रु. १०७-५०.

( ६ ) कु. भारती एस्. शाह पी. डी. कॉम्. रु. १०७-५०.

( ४ ) गव्हर्नमेंट लोन् स्कॉलरशिपः—

( १ ) श्री. एन्. आर. मोरवाडी पी. डी. सायन्स रु. ३५०.

( २ ) श्री. एस्. बी. लडकत पी. डी. सायन्स रु. ४००.

( ३ ) श्री. एस्. एन्. बोडके पी. डी. सायन्स रु. ५००.

( ४ ) श्री. पी. एन्. बालगुडे पी. डी. सायन्स रु. १२०

( ५ ) श्री. बी. एन्. जगताप पी. डी. सायन्स रु. ५००

( ६ ) सुनंदा जी. पुरंदरे पी. डी. आर्टस्. रु. ५००

( ७ ) श्री. आर. जे. भामे पी. डी. सायन्स रु. ६००

( ८ ) कु. पुष्पा जगन्नाथ जवळेकर पी. डी. आर्टस रु. ५००

( ९ ) ए. डी. महाजन पी. डी. सायन्स रु. ५००

( ५ ) राजकीय पीडितांच्या पाल्यासाठी स्कॉलरशिप.

( १ ) श्री. व्हि. डी. बाचल एफ्. वाय्. बी. कॉम रु. ४०० + *

( २ ) श्री. ए. यू. इंगुळे एफ्. वाय्. बी. कॉम रु. ४०० + *

* प्रत्येकाला १०० रु. पुस्तकासाठी.

बारामती शहरांत

* नाविन्यपूर्ण *

अलंकार

सर्व प्रकारच्या फॅन्सी कापडांचे माहेरघर

चिट, पपलिन, शर्टिंग, पट्टा, हरक, मांजरपाट, टॉवेल क्लॉथ.

नॉयलान, पॅरेगॉन, टेरोलिन, डेकरान, वॉश वेअर, रेऑन व अद्यावत फॅन्सी तयार कपड्यांचा भरपूर स्टॉक

आमच्या भव्य शो रुमला भेट देऊन खात्री करा

या व पहा

मालाची लेखी गॅरंटी

हेड ऑफीस : नवरंग रेडिमेड, सातारा.

—प्रो. लावंघरे ॲण्ड सन्स





माझा मऱ्हाटाचि बोलु कवतिके । परि अमृतातेहि पैजासी जिंके
ऐसी अक्षरे रसिके मेळवीन ।।



महाराष्ट्राचा एकमेव सहृदय कादंबरीकार

## हरिभाऊ आपटे

जन्म ८ मार्च १८६४ मृत्यू ३ मार्च १९१९

महाराष्ट्रामधील थोर कादंबरीकार हरि नारायण आपटे यांचा जन्म शताब्दि उत्सव मार्च महिन्यांत ठिकठिकाणी साजरा झाला. ललित वाङ्मयाच्याद्वारे प्रतिभावान् साहित्यिक स्थितिशील समाजाला गतिशील कसा बनवितो हे हरिभाऊंनीच दाखवून दिले. समाजाच्या कल्याणाची असीम आसक्ति, दुःखी जीवांविषयी अपार सहृदयता यांतून त्यांचे साहित्य निर्माण झाले. त्यांचे साहित्य सामाजिकतेतून निर्माण झाले आणि समाजासाठीच होते. म्हणूनच या द्रष्ट्या प्रतिभावंताच्या स्मृतीचा सन्मान महाराष्ट्राने श्रद्धेने केला. हरिभाऊंना आम्ही आदरपूर्वक श्रद्धांजलि वाहतो.

हरिभाऊंच्या प्रमुख कादंबऱ्या—

**सामाजिक** : पण लक्षांत कोण घेतो ?, मी, यशवंतराव खरे.

**ऐतिहासिक** : उषःकाल, केवळ स्वराज्यासाठी, गड आला पण सिंह गेला, वज्राघात.

## आकाशाच्या हृदयी

आकाशाच्या हृदयीं चंद्रकोर सलते
उरते केवळ अतृप्त वडवानला तृष्णा
घडले असतेची दाहक संभावता
अदय किले, विरहे आकाश खचले

कशास धवळीला मार्ग माझा
होवून रोमांचित पौर्णिमा
माघामधल्या उत्तररात्रीं
मार्गावर माझ्या तम निवळीला ?

कुऽहू कुऽहू कुजित, फुलवित केशर,
मलयानिल होवून उन्मत्त,
घापत....स्वेदोद्गम मुलकितं
संगीन उटी लज्जा गालावर गुलाब उधळीत
उत्सुक, बावरा नुपुर छंद...
ओघळणारी धवलमेखला
वाळ्याचे ..रतिगंध...धुंद
शरदांतील मेघापरी वितळून जाई
स्मृति हृदयाला जाळीत राही

चाहुल तुझी सळसळत्या पत्रांतुनी
मला जाणवे, परी दुर्लभ दर्शन तुझे
चक्रवाक मी न, न सरे रात्र काजळी
......मग भाग्य कोठले
तव अधरोष्ठीं दंतक्षते व्हेसुवियस
जगविण्याचे ?

आकाशाच्या हृदयी विरति
असफल स्वप्ने चंद्रकलेपरि

मान वा न मान ओघळतील तव
अश्रु होवून प्रेमाची विफल कहाणी
थिजतील माझ्या समाधीवर
भयाग मधु एकाकी रात्री

—प्रा. रसिकलाल दोशी





स्नेहसंमेलनाचे अध्यक्षासह प्राचार्य आणि प्राध्यापक



खुर्चीवर : प्रा. दाते, प्रा. तिवारी, प्रा. पाटील, प्रा. गोधा, श्री. फुलचंद गांधी, श्री. बि. द. घाटे, प्राचार्य पाटील, प्रा. अक्कोळे, प्रा. शेवाळे, प्रा. चाफेकर, प्रा. नवाथे
उभे : श्री. पाटील, श्री. झोडगे, सौ. वत्सला पाटील, प्रा. दोशी, प्रा. दोशी, प्रा. लोंढे, प्रा. फाटक, श्री. उदगांवकर

## स्टुडंट्स कौन्सील १९६३–६४



रांग १—प्रा. शेवाळे, प्रा. पाटील, प्रा. अक्कोळे, प्राचार्य पाटील, प्रा. गोधा, प्रा. चाफेकर, श्री. झोडगे
रांग २—कु. वासंती शहा, श्री. कोठाडिया, श्री. डोंबाळे, श्री. गाडेकर, श्री. वायसे, श्री. प्रभुणे, श्री. भोसले, कु. लंके
रांग ३—श्री. हेंद्रे, श्री. बडवे, श्री. कुंचूर, श्री. मेहता

### इंदापूरचा
# राघव-स्वामी मठ

**श्रीकृष्ण गोसावी,**
प्रथम वर्ष साहित्य.

एखाद्या गोष्टीकडे स्थूल नजरेने पाहिले असता आंतरिक सौंदर्याची साक्ष पटणे संभवनीय असत नाही. आंतरिक सौंदर्याबरोबरच वस्तूच्या ठिकाणी असलेली गुप्त प्रतिष्ठा जाणवून घेण्यासाठी विवेक चक्षूंची अत्यंत जरूरी असते. महाराष्ट्राचा बराचसा भाग संताची धर्मभूमि आणि देशभक्तांची कर्मभूमि असा आहे. महाराष्ट्राच्या या पठारावरील धूळ संताच्या आणि थोर पुरुषांच्या चरणांनी चिन्हांकित झालेली आहे. इंदापूर ही संताच्या सहवासानें पवित्र झालेली भूमि आहे. पुणे जिल्ह्यांतील इंदापूर हे एक प्रमुख तालुक्याचे ठिकाण आहे. तसे पाहिले तर पुणे जिल्ह्यांतील इंदापूर, दौंड, शिरूर हे तालुके अर्थात पुणे जिल्ह्याचा बराचसा पूर्व भाग दुष्काळी म्हणून गणला जातो म्हणून हा भाग आर्थिकदृष्ट्या मागासलेला आहे; परंतु संस्कृतीचे मूल्यमापन आर्थिक संपन्नतेवरून करणे उचित नसून सांस्कृतिक परंपरेच्या संपन्नतेवर करणे योग्य आहे.

**इंदापूरचे परिसर**

इंदापूर, पुणे, सुपे व चाकण हे छत्रपतींच्या भोसले घराण्याला जहागीर म्हणून देण्यांत आलेली गांवे होत. इंदापूर पुणे जिल्ह्याच्या अग्नेय बाजूस असून त्याच्या उत्तरेकडून भीमा व दक्षिणेकडून निरा या दोन नद्या वाहत येतात. या नद्यांच्या संगम अग्नेय दिशेस झाला असून त्या नद्यांच्या संगमावर नृसिंहाचे पवित्र क्षेत्र 'निरा नृसिंहपूर' वसलेले आहे. जवळच सोलापूर जिल्ह्यांतील टेंभुर्णी हे गांव असून तेथे पेशवे यांचे सरदार माणकेश्वर यांचा वाडा आहे. इंदापूरच्या दक्षिण दिशेने अकलुजला रस्ता जातो. अकलूज हे माळशिरस तालुक्यांतील गाव असून व्यापारीदृष्ट्या या भागांतील प्रसिद्ध भाग आहे. येथे पूर्वी दक्षिणेत असतांना आपली छावणी औरंगजेबाने बांधली होती.

**इंदापूर आणि चैतन्य संप्रदाय**

खुद्द इंदापूर हे आज जरी आर्थिक दृष्ट्या संपन्न नसले तरी या गावात उज्वल परंपरा निर्माण झाल्या. ज्या परंपरांनी आपल्या आयुष्याची इतिकर्तव्यता ईशचिंतन आणि कर्तव्यपालन करण्यात मानली. या इंदापुरात राघवस्वामींचा मठ आहे. याशिवाय चैतन्य संप्रदायातील सज्जन घराण्यातील राघवचैतन्यांचे समाधीचा देखील व्यंकटेश विजय ग्रंथ अध्याय १२ मधील ओवी ५६ व ५७ मध्ये उल्लेख आहे.

" ज्याचेनी झाला ज्ञानबोध ।
ऐक गुरुमालिका अगाध ।
सज्जन घराणे चैतन्य सांप्रदायिक पै ॥ ५६ ॥
मूळ पुरुष राघवचैतन्य ।
जो ज्ञानियामाजि चुडारत्न ।
इंदापुरी समाधिस्थ होऊन अखंडवास्ति केली असे ॥५७॥

याशिवाय इंदापूर गावात आत्ताउल्ला बाबा व चाँदखान बुवा हे थोर संतपुरुष होऊन गेले. त्यांचे दर्गे इंदापुरी आहेत. याशिवाय इंदापूरला भार्गवराम तलाव आणि श्री मोरोपंत पिंगळे यांचा वाडा आहे.

राघवस्वामी हे समर्थ परंपरेतील संत गणले जातात. त्यांचा मठ इंदापूरला असून समाधि त्याच गांवच्या व्यंकटेश मंदिरात आहे.

**समर्थ पंचायतन**

समर्थ पंचायतनात खालीलप्रमाणे चार व्यक्ति होत्या.

( १ ) जयरामस्वामी वडगावकर ( २ ) रंगनाथ स्वामी निगडीकर ( ३ ) केशवस्वामी भागानगरकर ( ४ ) आनंदमूर्ति ब्रह्मनाळकर ह्या त्या चार थोर व्यक्ति होत.

(१) जयराम स्वामींचा काळ शके १५२१ ते १५९४
(२) रंगनाथ स्वामींचा काळ शके १५३४ ते १६०९
(३) केशव स्वामींचा काळ शके १५३० ते १६०४
(४) आनंदमूर्ति ब्रह्मनाळकर शके १५५० ते १६१८

ह्याप्रमाणे समर्थ पंचायतनांतील चार थोर व्यक्ति गणल्या गेल्या.

**इंदापूरच्या राघवस्वामी मठाची परंपरा**

वरीलपैकी जयराम स्वामींचे जन्म ठिकाण इंदापूर हे होय. ते स्वतः ब्रह्मचारी होते व पुढे त्यांनी वडगाव गावी ( सातारा जिल्ह्यातील ) समाधि घेतली. त्यांच्या वरदानाने सातारा जिल्ह्यातील कुडाळ ग्रामी पाटिलास पुत्रसंतान झाले होते. त्याच्या पहिल्या मुलाचे नांव राघू असे ठेवण्यात आले. त्या राघवास विवाहित बनून इंदापूरचे मठात व्यवस्था पाहाण्यास सांगितले. श्री. राघव स्वामींची थोर परंपरा पुढे याच गांवात निर्माण झाली ती खालीलप्रमाणे होय.

राघवस्वामी
|
आनंदमूर्ति
|
केशवचैतन्य
|
आप्पाजी
|
आबाजी
|
बाबाजी ( शके १७९०-१८८२ )
|
नरहर    नारायण
|
जगन्नाथ ( चालू मठाधिपती )

समर्थांनी आपल्या समकालीन महाराष्ट्राला जागृत करून शारीरिक दृष्ट्या संपन्न करण्यासाठी मारुती मंदिरांची स्थापना ठिकठिकाणी केली. तसेच मठांची स्थापना देखील त्यानी आपल्या अध्यात्म कार्यार्थ केली. त्यापैकी इंदापूरचा एक मठ होय. आज जयराम स्वामींची समाधि वडगांवला जरी असली तरी त्यांना सद्गुरूचे ठिकाणी मानणाऱ्या राघवस्वामींची परंपरा आज चालू आहे. आजाहि जयराम स्वामींचे नामाचा उद्घोष या मठांत होत असतो.

" जयराम माझा गुरुमाय बाप ।
जयराम माझा आत्मस्वरूप ।
जयराम ज्यांच्या मुखाशी आला
भाग्योदय तयाचा उदयासी आला । "

अशी ही थोर परंपरा आहे. याच घराण्यांत आप्पा स्वामी म्हणून संत होऊन गेले. ते पंढरपूरची वारी करीत असत. परंतु वृद्धापकाळांत रुग्ण शय्येवर पडले असता त्यांना पंढरीस जाणे शारीरिक आजारामुळे अशक्य झाले. तेव्हां त्यांना दर्शनाची अर्थात पंढरीचे विठ्ठलाची सारखी ओढ लागून राहिली होती.

" बारे पांडुरंगा केव्हा भेट देशी ।
झालो मी परदेशी तुजविण ! "

भक्ताच्या तळमळीच्या हाकेला ओ देऊन रात्री स्वप्नांत दृष्टान्त दिला कीं आम्ही दोघे अर्थात–विठ्ठल रखुमाई मठाचे पाठीमागील आमराईत असलेल्या तांबुल बावडी विहिरीत आलेलो आहोत. त्यामूर्ती दुसरे दिवशी मठांत आणण्यांत आल्या. अजूनहि त्यामूर्ती मठांत असून त्यांची पूजाअर्चा सेवा सांप्रत मठाधिपति करीत असतात.

ही थोर परंपरा परमभगवद्भक्त परंपरा म्हणून गणली जाते. " आपणासारिखे करिती तात्काळ" या वचनाप्रमाणे ते स्वतः भगवंताचे ठिकाणी तन्मय झालेच येवढेच नव्हे तर अन्य समाजाला देखील त्यांनी या मार्गाचे वेड लावले. श्री बाबाजी महाराजासारखे थोर निष्ठावन्त भगवद्भक्त याच घराण्यात निर्माण झाले.

नामघेता उठाउठी, होय संसाराची तुटी
ऐका लाभ बांधा गाठी विठ्ठलपायी पडेल मिठी ।



श्री नारायण महाराज हे कथा उत्तम सांगत असत. त्यांचे वडील बंधू नरहर बुवा तबला व पेटीचे वाद्य-काम उत्तम करीत असत. ते इंदूरचे श्री. नानासाहेब पानसे यांच्याकडे शिकावयास–वरील कला हस्तगत करण्यासाठी १२ वर्षे राहिले. श्री नारायण महाराजांचे शिक्षण अवघ्या ४ थ्या इयत्तेपर्यंतच झाले होते. त्यांनी संस्कृताचे अधिक अध्ययन पंढरपूरला राहून १२ वर्षे पर्यंत वयाच्या १६ वर्षापासून केले. ते कथा सांगू लागले म्हणजे देहभान विसरून जात " वत्सलाहरण " सारखे आख्यान ८ दिवसपर्यंत चाले. हल्ली या मठाचे मठाधिपति श्री. जगन्नाथ म्हणून आहेत.

या मठात श्रीरामसुत कवींनी लिहिलेला तत्कालिन हस्तलिखित ग्रंथ सापडला असून त्या ग्रंथाचे प्रकाशन पुणे विद्यापीठातर्फे लवकरच केले जाणार आहे या ग्रंथात इंदापूरच्या राघवस्वामींच्या परंपरेविषयी अधिक माहिती आहे. या ग्रंथाचे लवकरच होणाऱ्या प्रकाशनामुळे काळाच्या अनंत उदरात दडलेली इंदापूरनगरीची माहिती प्रकाशात येणार आहे.

या ग्रंथात मुक्तेश्वरी महाभारताची खालील ओव्यातून स्तुति केली आहे.

"केवळ नवरसाची खाणी ।
मधुर तरी अमृताहुनि ।।
अनुभविता मोक्षदायिनि ।
टिका पावनी महाभारताची ।।
ऐसा ग्रंथ पै निगुति ।
न भुतो न भविष्यति ।।
तया कर्तया पुरुषाप्रति ।
नमन निश्चिति पै माझे ।।"

बारामती येथे माफक दरांत

राहण्याची, जेवणाची व फराळाची उत्तम व्यवस्था

कृष्ण भवन

लॉजिंग, बोर्डिंग ॲण्ड रेस्टॉरंट

बारामती.

प्रो. यु. के. भट

# रडार व त्याचे कार्य

प्रा. श. रा. नवाथे,
एम्. एस्सी.

ऊंच आकाशात भ्रमण करणाऱ्या विमानास मार्गदर्शन करणे, त्याला धुक्यातून मार्ग दाखविणे, विमानाचे अंतर व दिशा शोधून काढणे यासाठी "रडार" या साधनाचा उपयोग होतो. रडार हे Radio Detections Ranging याचे संक्षिप्त रूप होय. ह्याचा अर्थ 'विद्युत्‌चुंबकीय तरंगाच्या सहाय्याने पदार्थाचे अस्तित्व व अंतर शोधून काढणे' असा होतो.

रडारचा शोध लागण्यापूर्वी रात्रीच्या वेळी किंवा ढगांच्यावर असलेले विमान शोधून काढण्यासाठी ध्वनीचा उपयोग करीत. परंतु पुढे विमानाचा वेग जसजसा वाढू लागला तसतशी ही पद्धत निरुपयोगी होऊ लागली. ध्वनीचा वेग दर सेकंदाला फक्त ११०० फूट आहे व जेवढ्या वेगात ध्वनि आपल्याकडे येई तेवढ्या वेळात ते विमान बरेच पुढे गेलेले असे. त्यामुळे अधिक संशोधन करून ज्यायोगे विमानाची नक्की जागा सापडू शकेल अशा साधनाचा म्हणजेच रडारचा शोध लावणे भाग पडले.

रडारचे कार्य प्रतिध्वनीच्या तत्त्वावर आधारलेले आहे परंतु ते ध्वनिलहरीच्या साह्याने न होता, रेडिओ किंवा दूरचित्रवाणीप्रमाणे विद्युत्‌चुंबकीय तरंगाच्या साह्याने होते. रडारमध्ये एक प्रक्षेपक (Transmitter) व एक ग्राहक (Receiver) असतो. एका आकाशीयाच्या (Aerial) सहाय्याने अतिशय तीव्र असा विद्युत्‌चुंबकीय तरंग (Pulse) च्या रूपाने वातावरणात सोडतात. त्याचे जेव्हा एखाद्या पदार्थामुळे परावर्तन होते तेव्हा तो परत येतो व ग्राहकाच्या सहाय्याने तो ओळखला जातो. पुष्कळदा रडारमध्ये अशीहि सोय केलेली असते की रडारवर काम करणाऱ्या मनुष्याला त्या पदार्थांची प्रतिमाहि दिसते.

विद्युत्‌चुंबकीय तरंग सतत न सोडता pulse च्या रूपाने सोडण्याचे कारण असे की अशाप्रकारे सोडलेले तरंग हे सतत जाणाऱ्या तरंगापेक्षा तीव्र असतात. तसेच यामुळे थोडेच तरंग पदार्थावर आदळतात व त्यांची तीव्रता कमी होऊन ते परत येतात. परंतु जर हेच तरंग सतत सोडले तर परावर्तन पावून परत आलेले तरंग ओळखता येत नाहीत. त्याचप्रमाणे प्रक्षेपकातून जे तरंग सोडतात ते लघुतरंग (Short waves) असतात. याचे कारण असे की जर बाहेर सोडलेल्या तरंगाचे परावर्तन व्हायचे असेल तर त्या तरंगांची लांबी पदार्थापेक्षा कमी असली पाहिजे. नाहीतर ते तरंग त्या पदार्थावर न पडता पुढे जाण्याचीच शक्यता असते. त्यामुळे तरंगांची लांबी जितकी कमी तितकेच परावर्तन अधिक तीव्र व पदार्थाची जागा अधिक निश्चित ! तथापि हा लघुतरंगाचा एक तोटाहि आहे. हे तरंग वातावरणातील आर्द्रतेमुळे शोषून घेतले जाण्याचा संभव असतो व त्यामुळे त्यांच्या कार्यक्षेत्राला मर्यादा पडते व त्यामुळे लांबच्या पदार्थांसाठी मध्यम तरंगाचा (Medium waves) उपयोग करावा लागतो.

विद्युत्‌चुंबकीय तरंग सोडल्यापासून ते परत येईपर्यंतचा काल मोजतात. नंतर या तरंगाच्या वेगाला वेळेच्या निम्म्याने गुणतात म्हणजे पदार्थाचे अंतर मिळते विद्युत्‌चुंबकीय तरंगाचा वेग प्रकाशाइतकाच म्हणजे दर सेकंदाला ३०×१०¹⁰ सें. मी. (१,८६,००० मैल) आहे. त्यामुळे जरी एखादे अतिशय वेगवान विमान घेतले तरी ते परावर्तित तरंग परत येईपर्यंत फारसे पुढे जात नाही. व त्यामुळे अशा वेगवान विमानांचे अंतरहि निश्चित समजू शकते.

रडार यंत्राचा महत्त्वाचा भाग म्हणजे कॅथोड किरणांची नळी होय. या नळीत ऋणकणांचा (Electrons) प्रवाह ऋणटोकाकडून (Cathode) दुसऱ्या टोकाकडे (Aanode) वाहात असतो. या नळीच्या पुढील बाजूस एक काचेची तबकडी बसविलेली असते व तिच्या आंतील भागाला एका विशिष्ट रसायनाचा (Fluorescent) लेप दिलेला असतो. जेव्हा नळीतील ऋणकण या तबकडीवर आदळतात तेथे हिरवा प्रकाश दिसूं लागतो. व त्यामुळे ऋणकणांची हालचाल या तबकडीच्या साहाय्याने दिसू शकते. प्रथम या तबकडीवर ऋणकणांची एक सरळ रेषा दिसते. पण जेव्हा विद्युतचुंबकीय तरंगाचा एक pulse वातावरणांत सोडला जातो तेव्हा ही रेषा एकदम मध्येच वर उचलली जाऊन एक उसळी (Blip) मारते व पुन्हा सरळ होते. जेव्हा हा तरंग विमानासारख्या एखाद्या अडथळ्यापासून परत येतो तेव्हा तबकडीवरील ही रेषा पुन्हा एक उसळी मारते. या दोन उसळ्यापैकी पहिली उसळी बाहेर पडलेल्या तरंगाची नोंद असते व दुसरी उसळी परत आलेल्या तरंगाची नोंद असते. व या दोहोंतील वेळ विमानाच्या अंतराचे माप असते. या वेळेवरून तिचे मैलात रूपातर करतात. आजकाल यांत सुधारणा होऊन विशिष्ट प्रकारच्या तबकडीवर एकदम अंतरच मिळते.

विमानाची उंची काढण्यासाठी रडारमध्ये कमी जास्त उंचीवर दोन आकाशीय बसवितात. विमानापासून परत आलेले तरंग एकदा खालच्या आंकाशीयावरून व एकदा वरच्या आकाशीयावरून घेतात. त्या दोहोंच्या तीव्रतेत फरक असतो. त्यांच्या तीव्रतेच्या प्रमाणावरून विमानाची उंची ठरविता येते. त्यासाठी परत आलेल्या तरंगाचे प्रमाण व त्यापासून मिळणारी उंची यांचा एक तक्ताच केलेला असतो. व त्यामुळे विमानाची उंची ताबडतोब काढता येते.

विद्युत्‌चुंबकीय तरंगांच्या Pulses चा झोत सर्वत्र न सोडता जर त्यांचा बारीकसा प्रवाह एकाच दिशेने सोडला तर त्यामध्ये सुटसुटीतपणा येतो. परंतु अशा वेळी त्या तरंगाच्या मार्गात येणारी विमाने कमी असतात. त्यामुळे हा तरंगप्रवाह चारी दिशांना फिरेल अशी व्यवस्था करून रडारचे कार्यक्षेत्र वाढविले जाते. याचबरोबर कॅथोडकिरणाच्या नळीतहि सुधारणा करण्यात आली. त्यामुळे तबकडीवरील रेषा एका टोकापासून दुसऱ्या टोकापर्यंत न जाता तबकडीच्या मध्यापासून, रडारमधून सोडलेल्या तरंगाचा प्रवाह जिकडे जातो तिकडेच जाते. त्याचप्रमाणे जेव्हा परावर्तित तरंग परत येतात तेव्हा ही रेषा उसळी मारत नाही तर तबकडीवर फक्त एक ठिपका दिसतो. हा ठिपका म्हणजेच विमानाचे स्थान होय. या ठिपक्याचे तबकडीच्या मध्यापासूनचे अंतर हे विमानाच्या अंतराचे माप होय. तसेच या तबकडीचे एकंदर ३६० अंशाचे समान भाग केलेले असतात व त्यामुळे विमानाची दिशाहि समजते. शिवाय निरनिराळ्या पदार्थांची (उदा. इमारती, पूल, वगैरे) परावर्तनाची शक्ति निरनिराळी असल्याने त्या सर्वांचेच आपल्याला तबकडीवर छायाचित्र मिळते. अशाप्रकारे या प्रकारच्या रडारमध्ये आपल्याला विमानाची उंची, अंतर व दिशा याबरोबरच आजूबाजूच्या प्रदेशाचे चित्रहि मिळते. त्यामुळे अशा प्रकारच्या रडारला (Plan Position Indicator (P. P. I.) म्हणतात.

रडारचा शोध बऱ्याच वर्षांपूर्वी लागला असला तरी दुसऱ्या महायुद्धापर्यंत त्यांत काही विशेष सुधारणा झाली नाही. परंतु दुसऱ्या महायुद्धात रडारमध्ये अचूकपणा आणला गेला व त्यामुळे शत्रूची विमाने किंवा युद्धसाहित्य यांचा अचूक वेध घेता येऊं लागला व त्यामुळे ती प्रत्यक्ष दिसण्याच्या अगोदरच त्यांचा नाश करता येणे शक्य झाले. अशा प्रकारच्या रडारचा उपयोग इंग्लंडने जर्मन $V_2$ विमाने शोधून काढण्यासाठी केला होता. विमानाची आकाशातील नक्की जागा ठरविण्यास ज्याप्रमाणे रडारचा उपयोग क्षाला, त्याचप्रमाणे विमान आपले म्हणजे मित्रांचे किंवा शत्रूंचे आहे हेहि ओळखणे रडारमुळे शक्य झाले. त्यासाठी ब्रिटिशांनी I. F. F. (Identification as friend or foe) हे रडारयंत्र बनविले आणि अशाच प्रकारच्या I. F. F. रडार यंत्राचा उपयोग दुसऱ्या महायुद्धात

दोस्त राष्ट्रांनीं केला होता. अशाप्रकारे आकाशातील विमान ओळखता यावे म्हणून मित्रांच्या विमानावरहि रडार यंत्रे बसविली. ज्यावेळी अशी रडार बसविलेली विमाने जमिनीवरील रडार यंत्राच्या कक्षेत येतात तेव्हा ती एक प्रकारच्या विशिष्ट भाषेत (Code language) त्यास सहकार्य (Response) देतात. परंतु विमानाचे सहकार्य मिळाले नाही तर ते विमान शत्रूचे होय असे समजले जाते. जी गोष्ट विमानांची तीच जहाजांची त्यामुळे जहाजे ओळखण्यासहि I. F. F. रडारचा उपयोग होऊ लागला.

P. P. I. रडारमध्ये आसपासच्या प्रदेशाचे छायाचित्र मिळते. त्यामुळे त्याचा उपयोग शत्रूच्या विमानावर हल्ला करण्यासहि होतो. जमिनीवरील रडारवर काम करणारा मार्गदर्शक मित्र विमानास हल्ला करण्यासाठी अचूक मार्गदर्शन करूं शकतो. परंतु महायुद्धात जर्मनांनी दोस्तांवरील दिवसाचा हवाई हल्ला बंद केला व रात्री हल्ला करण्यास सुरवात केली. तेव्हा ब्रिटिशांनी नवीन प्रकारचे A. I. रडार यंत्र बनविले व ते लढाऊ विमानांत बसविले. ह्या रडारचे क्षेत्र १ ते २ मैलपर्यंत असू शकते. मार्गदर्शक आपले विमान शत्रूच्या विमानापासून १–२ मैलपर्यंत नेऊन सोडून द्यायचा. नंतर विमानांतील A. I. रडार आपले कार्य सुरू करी. त्यामुळे त्या रडारवर शत्रूविमानाची नक्की जागा मिळून त्यावर हल्ला करणे सुलभ होई.

रडारचा उपयोग युद्धकाळाप्रमाणे शांततेच्या काळातहि होतो. P. P. I. चा उपयोग विमानाना अंधारांत व धुक्यात सुरक्षितपणे उतरण्यास होतो. त्याचप्रमाणे याचे सहाय्याने बोटींना धुक्यातून व अंधारांतून मार्गक्रमण करण्यास होतो. आजकाल हवामानशास्त्रातहि याचे सहाय्याने संभाव्य पाऊस व वादळ यांचा अंदाज बांधता येऊ लागला आहे. व विशिष्ट अशा रडारच्या सहाय्याने पृथ्वी व चंद्र यातील अचूक अंतरहि काढले आहे.

———

ए. के. फखरुद्दीन

डीलर्स • पाईप्स् • फिटिंग्ज

• मशिनरी • ऑइल इंजिन्स व स्पेअर पार्टस

• हार्डवेअर आणि पेंट

• इलेक्ट्रिक मोटर्स आणि त्याला लागणारे सामान

बारामती

जि. पुणे



वनस्पति सृष्टीतील—

# काव्यसंकेत

प्रा. प्र. रा. दोशी,
एम्. एस्सी.

प्राचीन काळची एक कल्पना आहे की घराच्या उत्तरेस वटवृक्ष, दक्षिणेस औदुंबर, पूर्वेस पिंपळ, पश्चिमेस पळस इत्यादि झाडे असणे उत्तम. हे चारहि वृक्ष पवित्र मानले गेले आहेत. प्राचीनकाळी निरनिराळ्या वनस्पतीबद्दल विविध कल्पना केल्या गेल्या आहेत. त्यांनीसुद्धा झाडांचे महत्त्व ओळखले होते. ते तर म्हणत एक वृक्षारोपण केल्याने दहा पुत्राना जन्म दिल्याचे पुण्य मिळते.

दशकूपसमा वापी, दशवापी समोह्रद :।
दशह्रदसम, पुत्रो दशपुत्रो समोद्रुम :॥

भावना व्यक्त करीत असतांना कवीला संकेत, रूपक, दृष्टान्त यांचा आश्रय घ्यावा लागतो. आकर्षण निर्माण होण्यासाठीं तशी आवश्यकता भासते. त्यामुळेच काव्य सुंदर बनते. या सर्वांचा, मुख्यतः संकेतांचा, कवि आपल्या वेगवेगळ्या मनोवृत्तींना अनुसरून उपयोग करतात. झाडे व त्याचबरोबर फुले यांचा त्याने मुक्त हस्ताने उपयोग केला आहे, अनेक संकेत निर्माण केले आहेत. त्यांचा अविष्कार वेगवेगळा आहे. धरती–आकाश, सरिता–सागर, रजनी–शशी, उषा–दिनकर शमा–परवाना इत्यादि बरोबरच कमल–भ्रमरासारखे प्रेमाचे संकेत केलेले आहेत.

संस्कृत वाङ्मयांत तर वृक्षांची फार रम्य व मनोरंजक वर्णने आहेत, बहारदार कल्पना मांडल्या आहेत. गरोदर स्त्रीच्या स्पर्शानें प्रियंगु वृक्ष बहरतो म्हणे! अशोक वृक्षाला तरुण स्त्रीचा पादाघात प्रिय असतो. ऋतुराजाच्या आगमनानन्तर एकाद्या सुन्दर रमणीने मद्याने चूळ भरून ती अशोक वृक्षावर टाकली कीं त्याला बहर येतो! ‘केतकीला रस ठाऊकाच नाही’ असे एखाद्या कवीला वाटत असले तरी केवडा हा कलावन्त असला पाहिजे. कारण त्याला तरुणींचे नृत्य फार आवडते. त्या धुंदीतच सरळ उभे रहाणेसुद्धां कठीण होत असावे. म्हणूनच कोलमडून पडता पडता कसबसा सावरून वेडवाकडा असा उभा असतो. आम्रवृक्ष हासुद्धा थोडासा रंगेलच असला पाहिजे. त्याला तरुण स्त्रीचा मधुर फुंकर गोड वाटतो. एकंदरीत ही झाडेंसुद्धां भारी शृंगारिक आणि कलेचे भोक्ते म्हणावयाची? मोठे मोठे संगीतरत्न गात असतांना, मधुर संगीत चालू असताना, झाडेंसुद्धां डोलावयाची, गाणाऱ्यावर फुलांचा वर्षाव करावयाची असे म्हणतात.

झाडांची ही रसिकता पाहून कवींनाही त्यांच्यापासून स्फूर्ति घ्यावीशी वाटते. त्यांना फुलांबद्दल तर फार आकर्षण. रे. टिळक म्हणतात—

‘प्रेमा, सात्त्विक, पवित्र जितुके त्याचे सूचक फूल,
मधुर, मधुरतर, असे न कोठे फुलावाचुनी शील!
फुला! शारदा निजवीणेचा सूर लावुनी म्हणते
“गा, गा, कविंनो!” कवी करीती तुझी प्रतिक्षा नुसते
...इकडे बघतो फुले पुढे मी, तिकडे काव्ये गातो’

मध्ययुगीन कृष्णभक्त आपल्या प्रार्थनेत म्हणतो, “हे गोविंदा! मला कीर्ति अगर श्रीमंती यांची हांव नाही. मी तुझ्याकडे राज्य मागणार नाही. अद्भुत अशा शक्तीची याचना करत नाही. खरोखरच तू माझ्यावर प्रसन्न झाला असशील तर माझी एवढीच इच्छा पूर्ण कर––पुढील जन्मी म्हणून माझा होऊ दे.”

नुसत्या फुलातच नाही तर निरनिराळ्या वनस्पतीत साहित्यिकांना सौंदर्य आढळून येते. ब्रह्मदेवसुद्धा त्यांच्याकडे रसिकतेने पहातो. म्हणून तर त्याने स्त्री निर्माण करताना इतर गोष्टीबरोबर वेलींचा वळणदारपणा, त्यांच्या अंकुराची आलिंगनवृत्ति, तृणांचा कंप, कमलदेठाचा नाजुकपणा, पुष्पांची प्रफुल्लता, पर्णांची तरलता एकत्र केली आहे.

वनस्पतींची वर्णने करताना साहजिकच त्यांना निरनिराळी गुणावगुणे जोडली गेली आहेत. साहित्यिकांना पारिजातक हे कोमलतेचे निदर्शक वाटते तर गुलाबाचे फूल सौंदर्याचे. कवि गुलाबाबद्दल लिहितो.

‘ कोषातून फुटून बाहिर पडे ताजी टपोरी कळी
हृद्रक्तापरी लालबुंद फुलली एकेक ही पाकळी
भोंवे मादक गंधवादळ चढे वाऱ्यास वेडी नशा
कां देवा क्षणभंगुरत्व दिधले रूपासही या अशा ? ’

त्याला सदाफुलीमध्ये दिखाऊपणा, सूर्यफुलामध्ये गर्विष्टपणा व झेंडूच्या फुलामध्ये हलकेपणा आढळतो. पण जाईचे फूल मनाची शुद्धता दाखविते.—

‘ नाजुक देठावर सांवरली निर्मल इवली दले
नितळ शुभ्रतेतून कोवळा गंध भंवति दरवळे
बालभाव भाबडा ओततो प्रसन्नता अंतरी
एक चिमुकले फूल जुईचे किमया इतुकी करी ! ’

अननस सर्वगुणसंपन्न समजले जाते. उंबराचे फूल दुर्मिळतेचे. तेरडा मर्यादितपणाचे, व हिरडा उपासमारीचे लक्षण आहे. गव्हाच्या ताटाची श्रीमंती, बटाट्यासारखे औदार्य, भोपळ्यासारखा विस्तार असावा, पण आळूचा उथळपणा असू नये असे म्हणतात. कठीण प्रसंगीही आनंदी स्वभाव ठेवणारे शेवंतीचे झाड कोणालाहि आवडेल. म्हणून तर कवि म्हणतो—

‘ श्रावणशिखा पिऊन उमलल्या
सोनउन्हाच्या सोनपाकळ्या
सळसळते चैतन्य अनावर
गंध चढवितो धुंदि मनावर
दिपवी डोळे यौवन कांति
सुमसम्राज्ञी तूं शेवंती ! ’

बाहवाच्या ( Cassia ) फुलांचे वर्णन फक्त सरोजिनी नायडू यांच्याच शब्दांत करता येईल--

‘ Golden lamps for a fairy shrine,
Golden pitchers for fairy wine. ’

फुलांची जी वर्णने केली आहेत ती फक्त फुलेच नजरेसमोर ठेऊन केली नाहीत; निसर्गातील सुंदर वस्तूंशी त्यांची तुलना केली आहे. अशा तुलना करतांना फुले आणि इतर नैसर्गिक गोष्टी यांच्यामधील काल्पनिक मैत्री अगर प्रेम दाखविण्यात आले. सूर्य हा प्रियकर आणि नीलकमल ही त्याची प्रेयसी. रात्रीच्या विरहामुळे ती रडून दमलेली असते. तिच्या गालावरील दंवबिंदूरूपी अश्रू पुसण्यासाटी पहाटे सूर्य घाई करत असतो. कमल-भ्रमर यांच्यामधील प्रेमाचा संकेत विदितच आहे.

“ कमल अत्यंत निर्मल पाण्यात जन्मले !

कमनीय अशा रमणीय मुखाशी स्पर्धा करणारी कोमलता लाभली त्याला.

“ भगवान विष्णूने ते आपल्या करी बागविले.

“ त्याच्या सुगंधामुळे पृथ्वीपतिलाही वेड लावले.

“ कविश्रेष्ठांनी आपली अलौकिक प्रतिभा कमलाची वर्णने करण्यात खर्च केली.

“ मदनाने आपले अश्व होण्याचा मान त्याला दिला

“ तरी--

“ तरी यापैकी एकाहि मोहास लुब्ध न होता कमल सर्वदा सर्वकाल काळ्याकुट्ट भ्रमरासच आपला स्नेह समर्पित आले आहे !

“ भ्रमरहि कमळाकडे इतका आकर्षित व्हावा की सोनचाफ्याकडे त्याचे दुर्लक्ष व्हावे ? ”

‘ कनक आपली त्यजुन कठीणता मृदुशीतल झाले
रूप सुमाचे धरुनी तरुवर रहिवासा आले
दलादलातुन गंध दरवळे मत्त कस्तुरीचा
सोन्यालाही सुगंध लाभे बदली जनवाचा
सुवर्णहृदयी भरला नाही परंतु मकरंद
सुवर्णचंपक करू शकेना भ्रमराने धुंद ! ’

चंद्राचाहि कांहीं फुलांबरोबर मुख्यत: गंधराज आणि चंदनी यांच्या बरोबर, विशेष संबंध जोडला आहे. कदंब आणि मोगरा यांची ढगांशी असणारी मैत्री हा काही काव्यांचा मध्यबिंदू झाला आहे.

पक्षी व प्राणी यांची फुलांबरोबरची संगति मनोवेधक आहे. कमळे असलेल्या तलवांत स्नान करणे हा हत्तींचा परमोच आनंदाचा प्रसंग ! मानस सरोवराकडे जातांना राजहंस चोंचीमध्ये नुकत्याच उमललेल्या लिलीचे फूल घेऊन जातात. हरिणाचे पाडस आपल्या







अध्यक्षासह स्नेहसंमेलन समित्यांचे सभासद



स्नेहसंमेलन : करमणुकीच्या कार्यक्रमांत भाग घेणारे कलाकार

इवल्याशा डोळ्यांनी कुंदकळ्याकडे टक लावून पहात असते. आंब्याला मोहर आला कीं कोकिळांचे कूजन चालू होते. फुलांनी मोहरलेले कदंबाचे झाड पाहिले कीं मोर आनंदाने नाचू लागतात. उर्दू आणि पार्शियन कवींनीं बुलबुल आणि गुलाब, मधमाशी आणि नरगीस यांच्यामधील प्रेमगुंजन रंगविलेले आहे. उदाहरण म्हणून गालीबच्या कांहीं ओळी उधृत करतां येतील—

Who says that the bulbul's lament
goes in vain ?
Draw the curtain and behold the rose
A million hearts have gone to pieces.

इतके सर्व वर्णन करीत असतांना कवीचे आंतरिक मानवी प्रेम उफाळून येते. मानवी भावना, सुखदुःखे त्याला फुलांमध्ये दिसूं लागतात. मानवी प्रवृत्ति, विशेषतः स्त्रियांचे सौंदर्य फुलांच्या सौंदर्यांतून दाखवूं लागतो. तो आपल्या प्रियेला म्हणतो

इंदीवरेण नयनं मुखमंबुजेन कुन्देन दन्तम्
अंगानि चम्पक दले सविधाय वेधः

—विधात्याने नीलोत्पलाने तुझे नयन सजविले, कुंदकळ्यांनी तुझे दात बनविले, कमलपुष्पाने तुझे मुख निर्मिले व तुझे अंग चम्पकदलांनी निर्माण केले.

कवि भटकत भटकत एका उद्यानांत जातो. त्याला पाहून फुलझाडांवरील काय प्रतिक्रिया घडतात?

The dahlias bend their heads
and ask a question
As does a child with
a head full of curls
The gladiola
is arrogant with beauty
The daisy
beams its smile of simplicity
The rose, with maidenly modesty
Unfolds herself from her many folds.

कवीच्या जगामध्ये फुले लाजतात आणि निःश्वास सोडतात, हंसतात आणि अश्रूहि ढाळतात; प्रफुल्लतेने स्वागत करतात आणि प्रेमळ निरोपहि देतात. केतकीचे आगमन होईल म्हणून कामिनी आपले 'घर' सुंगधाने दरवळून सोडते. फुलें फक्त एकमेकांशीच समरस होत नाहीत तर त्यांना मानवी भावनासुद्धा ओळखता येतात. मीर म्हणतो—

I said : " Oh, how youthful is the
blossom ! "
A bud heard my remark—and smiled !

त्यामुळेच काही झाडांना व फुलांना प्रेमाचे प्रतीक समजले जाते. वृंदावनामध्ये कदंबाने आपला सुगंध अमाप उधळला, आणि म्हणूनच कृष्णाला तो प्रिय झाला. पावसाळ्यात कदंब बहरतो जेव्हा गोपी आनंदोत्सवात मशगूल असावयाच्या. हे फूल म्हणजे प्रेम आणि आनंदोत्सव यांचा संगम ! बाभूळ हे गुप्तप्रेमाचे प्रतीक आहे ! अन् प्राजक्त—

'हे देठ पोवळ्याचे अनुरागरंग प्याले
सहवास माधुरीचे स्मित पाकळ्यात आले
सरता वसंत न्हाती वर्षेत आज डोळे
विरहात प्रीत राखी प्राजक्त फूल भोळे'

मोगऱ्याबद्दल कवि लिहितो—

शुभ्र पाकळ्या कांतिव कोरिव
सुंदरतेला सजवी मार्दव
सांज उमलवी कळी टपोरी
मधुगंधाच्या भरती लहरी
बघता बघता रात्र दाटली
उबदार काळोख मखमली—
मादकता परिपूर्ण करी ती
फुले मोगरा अर्ध्या राती !

इतक्या सर्व गडबडीत बकुळाकडे कोणीच पहात नाही. उदास मनाने तो बाजूस उभा असतो. कोणाचे तरी तिकडे लक्ष जाते आणि म्हणतो—

ना रंग लाभला तुला नेत्रदीपक
ना रूपाचे तव कुणी करी कौतुक
सुकताहि परंतु सुवास तव राहिला
प्रिय बकुळ फुला ! मी जीव तुला वाहिला !

शेवटी कवि स्वतःबद्दल विचार करू लागतो. आंग्लकवि बेन जॉन्सनला वाटते शेकडो वर्षे जगून लाकडाचा ओंडका म्हणून पडण्यापेक्षा—

A lily of a day
Is fairer far in May,
Although it fall and die at night
It was the plant and flower of light.

———

आमच्या महाविद्यालयातील

# स्वावलंबी शिक्षण योजना

• आमच्या महाविद्यालयात चालू वर्षी स्वावलंबी शिक्षण योजना चालू करण्यांत आली. त्या योजनेचा प्रमुख उद्देश श्रमाची प्रतिष्ठा वाढविणे हा आहे. या योजनेत चालू वर्षी समाविष्ट झालेल्या चार विद्यार्थ्यांनी आपले मनोगत येथे व्यक्त करण्याचा प्रयत्न केला आहे.

—संपादक

## १. मीच माझ्या भाग्याचा शिल्पकार

माणिक घोगरे,
प्रथम वर्ष वाणिज्य.

कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्वावलंबी शिक्षणाचे तत्त्व महाराष्ट्रात चालू केले. त्यातून अनेकांनी स्फूर्ति घेतली. आमच्या कॉलेजचे प्राचार्य ए. ए. पाटील हे रयत शिक्षण संस्थेचे आजीव सदस्य होते. ते येथे आल्यावर त्यांच्यामुळेच ही योजना सुरू झाली आणि संस्थेला भूषणावह होईल असे कार्य संस्था करू शकली.

मी या योजनेत का आलो याचा विचार करता माझ्या घरची परिस्थिति गरीबीची आहे हे जरी खरे असले तरी केवळ या कारणामुळे या योजनेत आलो असे नाही. मी एक ग्रामीण भागातील विद्यार्थी आहे. आणि माझ्या मते ग्रामीण भागात पाहिजे त्या प्रमाणात शिक्षणाचे महत्त्व पटलेले नाही. कारण माझे ज्यावेळी प्राथमिक शिक्षण झाले आणि पुढचे शिक्षण घेण्याची इच्छा असताना व ऐपत असताना वडिलानी केलेला विरोध पाहून आता काय करावे असा प्रश्न आला. पण " Will will find a way " याप्रमाणे मार्ग सापडला. आणि माझे दुय्यम शिक्षण घेण्यास अकलूजला गेलो. कारण अकलूज येथील पाटील व काही हितचिंतक गोरगरीबांच्या मुलांना सुटीच्या दिवसात बाजाराच्या दिवशी काही कामे देऊन त्यांना शिक्षणाच्या खर्चास हस्तेपरहस्ते मदत करण्याचे कार्य करतात. आणि तेथे खऱ्या अर्थाने मला मार्ग सापडला. पुढे उच्च शिक्षण घेण्याचा प्रश्न आला त्यावेळी मला कसलीच काळजी नव्हती. माझ्या कॉलेजचे १ वर्ष मी पंढरपूर कॉलेजात स्वतः श्रम करूनच पूर्ण केले. नंतर बारामती येथे बँकेत नोकरी करण्यासाठी आलो असताना मला बारामती कॉलेजमध्ये ही योजना सुरू केल्याचे कळले. मी नोकरीकडे दुर्लक्ष केले आणि या योजनेत नाव दिले. कारण स्वतःच्या कष्टावर शिक्षण घेण्यात जी चव आहे ती इतरत्र कोठेहि मिळणार नाही

या योजनेचा फायद्याचा विचार करताना आम्हा बालकांना अभ्यासाच्या धामधुमीत आणि कामाच्या सहवासात या योजनेचे मोजमाप करणे कठीण पडते. परंतु 'कष्ट कष्ट' मंत्र जपत असणाऱ्या मातापित्यांना कोणी विचारले तर ते फार मोठ्या अभिमानाने सांगतात की, 'माझा मुलगा कॉलेजमध्ये शिकत आहे' आणि विचारणाऱ्याला त्याचे आश्चर्य वाटते. कारण त्यांचे कोणी तरी कॉलेजचे शिक्षण घेत असते व खर्चाचा आकडा त्यांच्या डोळ्यापुढे थैमान घालतो व ते विचार करू लागतात की, एवढा खर्च हे लोक कसे भागवतात. कधी असे लोक आम्हाला शिक्षण बंद ठेवण्याचाहि उपदेश करतात. कारण त्यांना माहित नसते की हा मुलगा कॉलेजमध्ये काही काम करीत असेल. या श्रमयोजनेमुळे आम्ही आमच्या पालकांना एका उच्च स्थानावर पोहचविण्याचे कार्य उरकतो. कारण या ठिकाणी आमचे पालक आता गरीब रहात नाहीत तर ते एका श्रीमंताच्या बरोबरीला आलेले दिसतात. आणि या श्रमयोजनेमधून शिक्षण घेऊन झाल्यावर त्याचा फायदा देशाला आणि जनतेला झाल्याशिवाय राहाणार नाही.

मी योजनेत आल्यावर आम्हाला सर्व विद्यार्थ्यांप्रमाणेच समानतेची वागणूक मिळाली. आणि तशी ती मिळण्याचा प्रयत्न सर्वांकडून व्हावा अशी सूचना प्रि. पाटील यांनी आपल्या पहिल्याच भाषणात केली होती. आणि त्याप्रमाणे आम्ही इतर विद्यार्थ्यांप्रमाणे हक्कदार आहोत असे आढळून आले.

आमच्याकडून करून घेण्यात आलेल्या कामात आम्हाला मुद्दामहून त्रास न होईल याची दक्षता या योजनेचे प्रमुखांनी व काम ज्या ज्या विभागात होते त्या त्या विभागाच्या प्रमुखांनी घेतली. आमच्याकडून वेळोवेळी योग्य मार्गदर्शन करून प्रत्यक्ष कामात भाग घेऊन व मनमिळाऊपणाने काम करून घेतले.

या योजनेमुळे आम्हाला एक प्रकारचा कणखरपणा आला आणि कोठेहि गेलो तरी आम्हाला कांही कमी पडणार नाही याचाहि अनुभव आला. कारण कांही विद्यार्थ्यांनी आम्ही या योजनेत आहोत या तुच्छ भावनेने एका सार्वजनिक कार्यक्रमाला त्यांनी आम्हाला कमी प्रतीचे समजून बेंचवरून उठण्याची आज्ञा केली. पण या योजनेने दिलेल्या शिकवणुकीच्या जोरावर त्याच तोऱ्यांत आम्ही उत्तर दिले.

या योजनेत आल्यामुळे आमचा राहण्याचा, पुस्तकाचा व जेवणाचा खर्च भरून निघाला आणि आमच्या शिक्षणातील अडचणीचा मार्ग मोकळा झाला.

आज अमेरिकेसारख्या देशातसुद्धा विद्यार्थी काम करून शिक्षण घेतात. आपला देश अजून मागासलेला आहे. बहुतेक जनता गरीब आहे. आणि त्यांच्या मुलांच्या शिक्षणाचा प्रश्न सुटल्याशिवाय देशाची प्रगति होणे कठीण आहे. अशा योजनेमधून काम करून घेणाऱ्या मुलांचे कौतुक करून अशा योजनेला जनतेने हातभार लावला पाहिजे. आणि विद्यार्थ्यांनी योजनेला साथ दिलीच पाहिजे. अशा योजनेत काम करून शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांना कमी प्रतीचे समजण्याचे कांहीच कारण नाही. अजूनहि कित्येक पालकांना शिक्षण खर्च पेलत नाही. अनेकान्त एज्युकेशन सोसायटीसारख्या संस्था " श्रमयोजना " काढून लोकांना सहकार्य करण्याचे कार्य अत्यंत जिव्हाळ्याने करीत असलेले दिसून येते. त्या संस्थेमधील लोकांचा उत्साह व कार्य करण्याचा प्रयत्न पाहून आम्हाला सुद्धा आमच्या आयुष्यांत कांहीं तरी करता येईल असे वाटू लागले. मीच माझ्या भाग्याचा शिल्पकार अशी भावना आमच्यात निर्माण झाली. जनतेने अशा संस्थाकडे डोळसरीतीने पाहिल्यास त्यांचे हित साधल्या शिवाय राहणार नाही.

———

Sathe Biscuits, Cocoa & Chocolates

पो. बॉ. ७४ फो. नं. ९५

मेसर्स शहा मगनलाल भोगीलाल
दुकान, बारामती

किराणा होलसेल आणि पेंढीचे व्यापारी

साठे बिस्किटस् व डालमिया बिस्किटस्

## २. पैशासाठी शिक्षणाचे पवित्र कार्य अडूं नये

—श्रीकांत निवृत्ति बोडके,
पदवीपूर्व विज्ञान.

मी एस्. एस्. सी पास झाल्यानंतर माझ्या मनांत विचाराचे वादळ निर्माण झाले. आर्थिक परिस्थिति हलाखीची असतांना महाविद्यालयीन शिक्षण घेणे म्हणजे एकादे दिव्य करण्यासारखी गोष्ट आहे याची पूर्ण जाणीव होती. परन्तु बारामती महाविद्यालयाची जाहिरात वर्तमानपत्रांत वाचून कै. कर्मवीर भाऊरावांनी आणलेल्या ' स्वावलंबी शिक्षणाच्या दीपा 'च्या प्रकाशाने मी माझ्या खडतर जीवनाची वाटचाल पूर्ण करूं शकेन अशी आशा माझ्या मनांत चमकली. म्हणून मी या योजनेत आलो.

घरची आर्थिक परिस्थिति हलाखीची आहे. कै. कर्मवीर भाऊरावांविषयी वाटणारा आदरच या ठिकाणी मार्गदर्शक झालेला आहे.

महाविद्यालयीन शिक्षण घेण्याची स्थिति नसतांनाहि मनात असलेली ज्ञानलालसा पुरविण्याचा फायदा झाला आहे.

प्रत्येक प्राध्यापकाला श्रमयोजनेतील मुलाबद्दल जिव्हाळा वाटतो. वेळप्रसंगी रागावले तरी त्यांचा राग हा आईच्या रागासारखा क्षणिक असतो. पण श्रीमंत मुले आणि समाज यांचा जो आम्हाकडे पाहण्याचा विशिष्ट दृष्टिकोन असतो, तेच प्रारंभी मनाला जरा खटकले.

माझी गैरसोय अशी कोणतीच झाली नाही. कारण माझी गैरसोय एवढीच होती की कामाची वेळ आणि प्रॅक्टिकलची वेळ यांचे जमणार कसे, परन्तु माननीय प्राचार्यसाहेब आणि श्रमयोजना व्यवस्थापक यांनी सहानुभूतीने तो प्रश्न सोडविला आहे. आणि दुसरे विशेष म्हणजे माझ्या सहकारी मित्रांनी देखील तक्रार केली नाही.

पैसा हा सर्प जिव्हेप्रमाणे चंचल असतो. त्या क्षुल्लक कारणाने शिक्षणासारख्या पवित्र कार्यात आडकाठी येऊ नये. म्हणून आमच्या योजनेचा फायदा माझ्या जाती आणि देश बांधवांना होईल. मनुष्याने स्वतःच्या पायावर उभा राहायला शिकले पाहिजे. कारण आपण आईवडिलांच्या जीवावर मौज करीत राहिलो तर आपली प्रगति होणार नाही. आईवडिल म्हणजे पाऊल वाटेवरील सावली प्रमाणे असतात. सावलीत वाढणाऱ्या झाडाची जशी वाढ होत नाही त्याप्रमाणे मुलाचे होते. त्यासाठी त्याला स्वावलंबी बनविण्यासाठी आमची खास मदत होईल ! या योजनेतून शिकणारा मुलगा शिक्षण पूर्ण झाल्यानंतर जगाच्या प्रांगणांत पाऊल टाकील आणि तो, हवेचा भरलेला चेंडू कसाहि टाकला तरी परत वरती येतो, त्याचप्रमाणे जीवनात येणाऱ्या अडचणींना न जुमानता आपली यशस्वी जीवन वाटचाल करू शकेल.

———

**डेक्कन जनरल स्टोअर्स**

**कटलरी, स्टेशनरी व जनरल मर्चंट**

**गांधी चौक, बारामती.**

प्रोप्रा.:—ताहेर के. पाठरिया.



## ३. आम्ही गरीब असलो तरी—

म. प्र. खुपेकर,
पदवीपूर्व साहित्य

अकरावीचा निकाल लागला आणि मी पास झाल्याची वार्ता ऐकून अतिशय आनंद झाला. पुढे शिकण्याची उत्कट इच्छा होती. परंतु पैशाचा प्रश्न दत्त म्हणून उभा राहिला. मनात विचार आला की रु. १२०० च्या आत उत्पन्न असल्यामुळे फी माफ होईल परंतु इतर पैशाचे काय ? कॉलेज ( बारामती ) पासून माझे गाव ८७ मैल असल्याने जाण्यायेण्याचा कठिण प्रश्न होता. अशा वेळी पणदरे येथील एक शिक्षणाची अतिशय आवड असणारे आणि त्याच्यासाठी वाटेल तो त्याग करावयास तयार असणारे त्यागमूर्ति श्री. खंडेराव वामनराव जगताप उर्फ खंडेरावरावदादा यांनी श्री. प्रिन्सिपॉलसाहेबांची गाठ घेतली आणि माझ्या परिस्थितिविषयी त्यांना इत्थंभूत माहिती सांगितली आणि नंतर मी फॉर्म भरण्यासाठी आलो असतांना कॉलेजमध्ये काम करून शिक्षण घेण्याची योजना ( श्रमयोजना ) अस्तित्वात येणार होती. त्या योजनेमध्ये आपणहि सामील व्हावयाचे असे ठरविले. प्रवेश फी भरण्यासाठी जवळ पैसे नसल्याने श्री. दादांनी प्रिन्सिपॉलसाहेबांना सांगितले आणि त्यांनी केलेल्या महत्प्रयासामुळे प्रवेश मिळविला. घरचा परिस्थिति अत्यंत गरीबीची. अशा अवघड परिस्थितीत श्री. दादांचे मार्गदर्शन उत्तमप्रकारे झाले. सध्याची वाढती महागाई आणि इतर कांही गोष्टींची प्रतिकूलता नसल्यामुळे या योजनेचा अवश्य लाभ घेण्याचे ठरविले.

सर्व दृष्टींनी विचार केला असता या श्रमयोजनेचा अतिशय फायदा झाला. सर्वात मोठा फायदा म्हणजे महागडे समजले जाणारे शिक्षण—अर्थात ही लोकांची कल्पना चूक आहे—अल्प खर्चात घेणे सोपे झाले. या योजनेनुसार कॉलेजच्या होस्टेलमध्ये जेवणाची उत्तम व्यवस्था झाली. त्याचप्रमाणे प्रत्येक प्राध्यापकाची ओळख झाल्यामुळे निरनिराळ्या विषयांच्या अभ्यासात वेळोवेळी मार्गदर्शन देखील झाले. यावेळी कोणत्याहि प्राध्यापकाने आम्हाला हीनपणे लेखले नाही. इतर सर्व मुलाप्रमाणे आम्ही, अशी उदात्त समजूत त्यांची होती. सुरुवातीला कॉलेज विद्यार्थ्यांचा आमच्याबद्दल वेगळाच गैरसमज झालेला होता. परंतु त्यांना या श्रमयोजनेचे महत्त्व पटल्यामुळें त्यांच्या मनांत देखील आमच्याविषयी आदर उत्पन्न झाला व सर्वजण एक आहोत अशी भावना निर्माण झाली. अर्थात कांही विद्यार्थी वेगळ्याच तऱ्हेने वागत असत परंतु आम्ही त्यांना दाखवून दिले की आम्ही गरीब असलो तरी आमची ध्येये आणि आकांक्षा अतिशय उच्च आहे.

या योजनेमुळे समाजातील गरीब परिस्थितीच्या विद्यार्थ्यांना उच्च शिक्षण उपलब्ध होते. शिक्षणाबरोबर श्रम करावे लागत असल्यामुळे सुसंस्कृत मनाबरोबर शरीराची घडण होते. अगदीच गरीबांना शिक्षणाचा लाभ या योजनेमुळे मिळू शकतो. त्यामुळे गरीब असून देखील त्याला आपला विकास साधता येतो. अशा या योजनेचे श्रेय भारतरत्न कर्मवीर भाऊराव पाटील यांना आहे. आणि त्यांच्याच मार्गाने अनुकरण करून बारामती कॉलेजमध्ये ही योजना निर्माण झाली आहे ही अतिशय महत्त्वाची आणि अभिमानाची गोष्ट आहे.

———

# ४. स्वावलंबनांतून जीवनोद्धार

**शांताराम संभाजी रणपिसे,**
पदवीपूर्व साहित्य

एस्. एस्. सी. पास झालो परंतु पुढे काय करावे हा गहन प्रश्न माझ्यापुढे दत्त म्हणून उभा होता. ॲग्रिकल्चर कॉलेजला जाण्याचे माझ्या मनांत होते परंतु " दात नसलेल्याने चण्याची अपेक्षा करावी " असेच माझे ध्येय होते. याबाबतीत घरच्या लोकांचा मला विरोध नव्हता, परंतु शिक्षण, पूर्ण होईल की नाही ही मोठी काळजी होती. पुण्याला शिक्षण घेणे हे अत्यंत खर्चाचे आहे, असे अनेकांनी मला सांगितले होते. त्यामुळे काय करावे हे मला सुचेना, अशा विचारमग्न स्थितीत एके दिवशी मी ज्या शाळेतून प्राथमिक शिक्षण संपवून बाहेर पडलो त्या शाळेंत मनाला सहज विरंगुळा म्हणुन गेलो. तेथील माझ्या भल्यासाठी तत्पर असलेला एका प्राथमिक शिक्षकाकडून त्याच गावांत भारतरत्न कर्मवीर भाऊराव पाटील यांनी स्थापन केलेल्या रयत शिक्षण संस्थेचे श्री सिद्धेश्वर हायस्कूल वेताळे " या विद्यालयांतील एका शिक्षकाची ओळख झाली. त्यांनी स्वतः रयत शिक्षण संस्थेत शिक्षण घेतलेले असल्यामुळे भारत रत्न कर्मवीर भाऊराव पाटील यांच्या शिक्षण योजनेची चांगली माहिती दिली. त्याचप्रमाणे एक शिक्षण प्रेमी आणि भारतरत्न कर्मवीर भाऊराव पाटील यांचे एकनिष्ठ शिष्य माननीय **अ. आ. पाटील** हे बारामती कॉलेजमध्ये प्राचार्य म्हणून आले आहेत, हेहि सांगण्यास ते विसरले नाही. त्यांनी स्वतः शिवाजी महाविद्यालय सातारा आणि बारामती महाविद्यालय, बारामती या ठिकाणी कार्डे पाठवून चौकशी केली. त्यांनी असेहि सांगितले की " जरी तूं बारामतीला गेला तरी तेथील प्राचार्यांनी सातारा कॉलेजप्रमाणे कांहींतरी सोय नक्कींच केली असणार " त्यांनी पाठविलेल्या दोन्हीहि पत्रांची उत्तरे तावडतोब आली हे सांगायला नकोच. नुसत्या तोंड ओळखीत माझ्या शिक्षणाबद्दल अत्यंत अस्थेने आणि कळकळीने प्रयत्न करणारी ही व्यक्ति म्हणजे एस्. डी. काळे ही होय. हे सर्व होईपर्यंन्त कॉलेजचे १५ दिवस निघून गेले. बारामतीहून पत्राचे उत्तर आल्याबरोबर ते माझ्याकडे आले, व त्यांनी मला लागलीच बारामतीस पाठवून दिले. माझ्या शिक्षणाची अशी उत्तम व्यवस्था झाल्यामुळे घरच्या लोकांनीहि मला तावडतोब परावनगी दिली. बारामती हा प्रदेश मला अगदीच नवीन होता. तेथील सारे कांही नवीनच. मी कसातरी एकदाचा बारामतीस येवून पोहोचलो. बारामतीस आल्याबरोबर प्रथम मी कॉलेजवर गेलो. तेथें प्राचार्यसाहेब होतेच. मी ऑफिसमध्ये गेल्याबरोबर पहिलाच प्रश्न विचारला की 'कोठून आलास?' मी उत्तर देण्यापूर्वी त्यांनीच म्हटले कीं 'खेडहून आलास काय?' 'होय' मी म्हणालो. मी जेव्हा होय म्हणालो तेव्हा त्यांच्या चेहऱ्यावर आनंदाचे आणि समाधानाचे तेज चमकले. आणि ह्याच त्यांच्या पहिल्याच दर्शनाने माझ्या हृदयाची खोल आणि घट्ट पकड घेतली. त्यानंतर दुसऱ्याच दिवशी मी स्वावलंबी शिक्षण योजनेत समाविष्ट झालो.

साधारणतः पहिला एक महिना आम्हाला फारसे काम नव्हते. नंतर गांवातील विद्यार्थ्यांसाठीं गावांत अभ्यासिका सुरू करण्यांत आली. आणि कॉलेजसाठी वनस्पतीशास्त्र विभागासाठीं बाग तयार करावयाची होती. हीच दोन महत्त्वाची कामे आमच्यावर सोपविण्यांत आली. आमच्या कामाच्या पाळ्या ठरविण्यांत आल्या. स्वावलंबी शिक्षण योजनेंत आल्यामुळे सर्व प्राध्यापकांचा अगदी जवळून संबंध आला. प्राध्यापकांना स्वावलंबी शिक्षण शिक्षण योजनेविषयी असलेला आदर आणि त्यातील विद्यार्थ्यांविषयी असलेली ममता अवर्णनीय होती. आणि अजूनहि आहे. त्यांनी वेळोवेळी घरी बोलावून अभ्यासाविषयीच्या अडचणी दूरु केल्या, तसेच कधी कंधी मनात येणाऱ्या विचित्र विचारापासून परावृत्त केले. दुसरी एक अत्यंत महत्त्वाची गोष्ट म्हणजे आमचे स्वावलंबी शिक्षण योजना प्रमुख प्रा. अक्कोळे हे स्वतःसुद्धा कित्येक वेळा आमच्या कामात सहभागी होत आणि हे काम करणे कमी दर्जाचे नाही हे पटवून देत.

महाविद्यालयाच्या ग्रंथपालांनी इतर विद्यार्थ्यांप्रमाणे आम्हाला ग्रंथालयाचे नियम न लावता पाहिजे असलेली पुस्तके कधीहि आणि कितीहि स्वतःच्या हाताने घेण्यास परवानगी दिली. यावरून त्यांचा आमचे विषयीचा जिव्हाळा दिसून आला. कांही विद्यार्थ्यांकडून प्रारंभी आम्हाला अपमान सहन करावा लागला, परंतु हळूहळू त्यांनाहि स्वावलंबी शिक्षणाचे महत्त्व पटले.

भारतरत्न कर्मवीर भाऊराव पाटील यांनी ही योजना अस्तित्वात आणून अत्यन्त खर्चाचे असे समजले जाणारे महाविद्यालयीन शिक्षण स्वल्पखर्चात शिकण्याची जी सोय केली. त्यामुळें जे विद्यार्थी ह्या प्रकारे शिक्षण घेतात त्यांच्यावर डोंगराएवढे उपकार करून ठेवले आहेत. " स्वावलंबी शिक्षण हेच आमचें ध्येय " असे जे त्यांनी म्हटले आहे ते प्रत्यक्षांत उतरले आहे. ह्या त्यांच्या वाक्याकडे प्रत्येकाने नजर ठेवून आपला जीवनोद्धार करणे हेच आजच्या विद्यार्थ्यांचे मी आद्य कर्तव्य समजतो. बौद्धिक विकासाबरोबरच मानसिक आणि शारिरीक विकास होणे अत्यन्त आवश्यक आहे. हल्लीचे विद्यार्थी कष्ट न करता विद्या साध्य करायला पहातात. त्यामुळे त्यांची बुद्धि विकसत चालते परन्तु शरिरयष्टी खालावते. व शेवटी सर्वनाश होतो. Sound mind in a sound body असे म्हटले आहे. प्राश्चात्य लोक आपणापेक्षा श्रेष्ठ का? तर ते स्वतः बौद्धिक विकासाबरोबर शरिरहि कमवतात ते कष्टाची कामे करण्यांत आनंद आणि अभिमान मानतात तर हल्लीचे भारताचे भावी आणि असलेले नागरिक कष्टाची कामे नकोत म्हणून शहराकडे धाव घेतात.

राव असो किंवा रंक असो त्याने स्वावलंबन ह्या दृष्टिकोनांतून ह्या योजनेकडे पाहिले पाहिजे.

बारामती कॉलेजला ही योजना नवीनच आहे. परंतु हळूहळू या योजनेचा विकास होऊन आमच्यासारख्या अनेक विद्यार्थ्यांची सोय व्हावी एवढीच माझी इच्छा आहे.

———

फोन नं. ८९

**बारामती हार्डवेअर स्टोअर्स**

*

**मशिनरी, इलेक्ट्रिक गुडस् आणि हार्डवेअर मर्चंट.**

**बारामती**

(जि. पुणे)

SAMSON DRESESS

व
युनायटेड होजिअरीचे
अधिकृत विक्रेते

* सॉक्स • हँकरचिफ्स् • ब्रेसियर्स यांचे पायोनियर सेन्टर *

वर्धमान रेडिमेड स्टोअर्स
बारामती (जि. पुणें)

पूना स्वीट हाऊस

स्टेट बँकेसमोर, स्टेशनरोड,

बारामती

अद्यावत पद्धतीने सुरू झालेले

उत्तम प्रकारची

स्वीट्स् • फरसाण

सोडालेमन • सरबत

ऑर्डरप्रमाणें स्वीट्स् आणि फरसाण
स्पेशल बनवून मिळेल.



आंतरमहाविद्यालयीन बेस बॉल व
थ्रो बॉल विजयी संघ





पुणे जिल्ह्याचे ग्रामीण विभागाचे डी. एस्. पी. एस्. एस्. भोसले, प्राचार्य, एन्. सी. सी. अधिकारी व एन्. सी. सी. कॅडेटस्

# ' हद्दपार 'चा मुकुटमणि

ए. एस्. ललगुणकर
प्रथम वर्ष, वाणिज्य.

श्री. ना. पेंडसे यांच्या, ' हद्दपार ' या प्रादेशिक, कादंबरीमध्ये राजेमास्तरांचे ' आदर्शवादी शब्दचित्रण ' हा, त्या कादंबरीचा प्रधान–हेतु, अथवा ' कादंबरीचा गाभा ' आहे असे म्हटले तर ते–वावगं ठरणार नाही !

राजेमास्तरांचे जीवंत प्रखर शब्दचित्रण समंजस माणसाला अगदी वेगळ्या जगतांत नेते, रसिकांवर मोहिनी पाडेत.

' हद्दपार ' या कादंबरीमध्ये, राजेमास्तरांनी अन्याया-जुलुमाविरुद्ध ठोकलेली क्रांतिकारक आरोळी या क्षुद्र जगाला समजत नाहीं; तर उलट त्या आव्हानाची हेटाळणीं होत आहे, धिक्कार होत. आहे तर मग त्या आरोळीला प्रतिसाद मिळणे दूरच !

राजेमास्तरांचे उदात्त, ध्येयनिष्ठ, आदर्शवादी जीवन म्हणजे, जुलुमी-अन्यायी मानवजातीवर केलेली मात आहे; अघोर असा प्रहार आहे. राजेमास्तरांचे आकर्षक व्यक्तिमत्त्व म्हणजेच, जुलुमी-अन्यायी सत्तेविरुद्ध फेकलेले अमर असे ज्वलंत आव्हानच म्हटलें पाहिजे !

शिक्षकी पेशाच्या लहान तळ्यांत, कर्तव्यरूपी प्रदीर्घ वलयें निर्माण करणारी प्रखर व्यक्तिरेखा म्हणजेच राजेमास्तर ! त्याप्रमाणे, उदात्त-ध्येयवादी-थोर मूल-तत्त्वांच्या रथांत बसून अन्यायी-जुलुमी मार्ग भरधावपणें तुडवून यशाचा तळपता कळस गांठणारा कलावान् सारथी म्हणजेच हद्दपारमधील राजेमास्तर !

पुंगीच्या नादानं नाग डुलावा; दिव्यांच्या प्रकाशामुळे पतंगाने देहभान विसरावं आणि प्रकाशाच्या ज्योतीकडे झेप घ्यावी; आणि फुलपाखरानं फुलांतील मधासाठी फुलाकडे आकृष्ट व्हावं, असाच कांहीसा प्रकार राजे-मास्तरांच्या व्यक्तिमत्त्वाबद्दल म्हटला पाहिजे !

राजेमास्तरांच्या आदर्शवादी आकर्षक व प्रतिभावान् प्रभावी व्यक्तिमत्त्वांकडे सामान्य वाचक, रसिक आकर्षिला जाईल, यांत नवल कसले ?

देशाभिमानासाठी प्रेम बाजूला सारलेल्या वीर पुरुषांच्या कथा आपल्याला जास्त परिचित आहेत. वात्सल्यबुद्धीने देशाभिमानावर ताण केल्याचे राणा प्रतापसिंहाचें ज्वलंत उदाहरण इतिहास-रसिक कदापिहि विसरणार नाहीत. धर्मासाठीं गुरु गोविंदसिंगाने अनार्थ छळ मुकाट्याने गिळला, तर छत्रपति शिवाजी-महाराजांनी खऱ्या राज्यप्राप्तीसाठीं स्वतःचे जीवन वेचले. कर्तव्यतत्पर राहाणारा व कर्तव्यासाठींच मरणाऱ्या बाजीप्रभू देशपांड्याचे उदाहरण आज बालकापासून तें थेट थोर लोकापर्यंत विशेष परिचयाचे आहे. अखेरची गोळी लागली असतांनासुद्धां शत्रूला-मारेकऱ्याला क्षमा करणारे अमर बापूजी विशाल ध्येयासाठीच या जगतांतून अदृश्य झाले तर स्वातंत्र्य समराचे तेज धगधगीत ठेवणाऱ्या सुभाषचंद्र बोस यांना विसरणारा भारतीय विरळाच !

अशी एक कीं दोन पण कित्येक उदाहरणें इतिहासांत दाट गर्दी करतात कीं ज्या थोर विभूतींनी विशिष्ट ध्येयप्राप्तीसाठीच आपली जीवनयात्रा संपविलीं. कितीहि उच्च ध्येयें आणि हा महान् स्वार्थत्याग विशिष्ट ध्येय-मूलतत्त्वें प्राप्तीचाच ध्यास या महान् पुरुषांच्या जीवनांत असून त्या ध्येयासाठीच त्यांनीं जगाचा अखेरचा निरोप घेतला.

नेमकी हीच गोष्ट राजेमास्तरांची आहे, असे म्हटले तर ते रास्तच ठरेल !

जुलुमी-अन्यायी संकटाशी प्रखर झगडा खेळून, त्यावर मात करणारा आणि ध्येयाने उदात्त मूलतत्त्वांच्या

आधारावर जीवन वेचणारा राजेमास्तर आगळा आणि विरळाच ! जी गोष्ट इतर नेत्यांची तीच राजेमास्तरांची होय. अन्यायी जुलमी वादळांत ध्येयनिष्ठ प्रयत्नाची ज्योत प्रज्वलित करणारे उदात्त ध्येयवादी राजेमास्तर, विशिष्ट ध्येयप्राप्तीसाठीच झगडले असे म्हटले तर ते रास्तच ठरेल !

राजेमास्तर म्हणजे सर्वगुणसंपन्न साक्षात् मूर्तीच ! ( A man of many sided personality ). राजेमास्तरांच्या जीवनांतील गुणराशीकडे पाहिल्यानंतर, खरोखरच ' हद्‌पार 'मधील खरा मास्तर डोळ्यापुढे उभारतो; आणि वाचकाला नव्या युगांत आणून, त्याला विचार करावयास चालना देतो; आणि वाचकांच्या हृदयांत खोल असा ठसा ठसवितो.

मानवतेच्या भक्कम पायावर आधारलेले हे आदर्शवादी प्रभावी जीवनचरित्र सत्वपरीक्षेत जीवनभर यशस्वीच ठरले.

" पैशासाठी स्त्रीने शरीरविक्रय करणे अन् पैसे घेऊन मी खोटी साक्ष देणे, " या दोन्ही गोष्टी तुल्यबल मानणाऱ्या मास्तरांना सत्यप्रेमीच म्हटले पाहिजे.

जुन्या पोकळ कल्पनाना कडवा विरोध करून, आधुनिक खऱ्या तत्वांचा स्वीकार करणारे राजेमास्तर आधुनिक जगताचा प्रतिनिधीच म्हटला पाहिजे.

निःस्वार्थी वृत्तीने कर्तव्यबद्ध होऊन, अन्यायासाठी मरणारा व सत्यासाठी जगणारा–झगडणारा राजेमास्तर ' थोरच म्हटला पाहिजे. '

गांवांतील प्रत्येक सणासमारंभामध्ये; कर्तव्याची बाजू पूर्णपणे सांभाळून, कळकळीने तसेच उत्साहाने भाग घेणारे राजेमास्तर ' सर्वज्ञ 'च आहेत.

गावांतील लहानापासून ते थेट थोरापर्यंत–म्हाताऱ्या माणसापर्यंत प्रत्येकाची चौकशी करून, त्यांना मदत–मार्गदर्शन करणाऱ्या या मास्तरांना ' परभावरत ' म्हणणेंच उचित ठरेल !

सातवीचा निकाल प्रसिद्ध झाल्यानंतर सातवीला शिकविणारे शिक्षक दुसरेच असतांना; पास झालेल्या विद्यार्थ्यांचे पेढे प्रथम राजेवाड्यावर येत असत; तसेच मास्तरांच्या त्यागपत्रामुळे उभ्या दुर्गेश्वरावर पसरलेली दुःखाची दाट छाया, मास्तरांच्या लोकप्रियतेची आणि योग्यतेची समक्ष साक्षच होती !

राजेमास्तर पुढाऱ्यांचे पुढारी होते. उदात्त व्यक्तिमत्वाच्या निर्मितीची ती एक तालीमच होती; खाण होती; आणि म्हणूनच लंब्या जोशी सारखा कर्तबगार व हुशार डॉक्टर की ज्याने इंग्लंडसारख्या परकीय देशांत यश मिळविले; दिगू शिंत्र्यासारखे प्रतिभावान् प्रोफेसर आणि निर्मल तेंडुलकर सारखे निस्पृह व कळकळीचें कार्यकर्ते राजेमास्तरांच्या कारकीर्दीत मोठ्या दिमाखाने विजयाच्या शिखरावर तळपत राहिले.

प्राथमिक शिक्षण ही भावीजीवनाची पाठशाळा आहे हा सिद्धान्त मास्तरांनी सिद्ध करून दाखविला. त्या पाठशाळेंत, विद्यामंदिराच्या गाभाऱ्यांत पुजाऱ्याचे किंवा बालरूपी नंदनवनामध्ये खत-पाणी घालण्याचे माळीकाम मास्तरांनी यशस्वीरित्या पार पाडले, आणि म्हणूनच उभ्या आयुष्यांत मास्तरांनी दुसऱ्यांच्या जीवनांत उदात्त अन् आदर्श व्यक्तिमत्वाचा विकास घडवून आणला.

' मोडेल पण वाकणार नाही ' आणि ' हरेल पण–नमणार नाही ' ही तर मास्तरांच्या खानदानी घराण्याची तळपती शीर्षकें होती. मान आणि अभिमान यासारख्या मौल्यवान् गोष्टी मास्तरांनी आयुष्यांत एखाद्या काचेच्या भांड्याप्रमाणे वागविल्या.

"बदली ? दुर्गेश्वराचें शाळेमधून माझी बदली ? नाना ! त्या साहेबांना म्हणावं हिंमत असेल तर आपलें शब्द खरे करून दाखव ! " अचानकपणें शाळेंत उतरणाऱ्या शाळाधिकाऱ्याला राजेमास्तरांनी दिलेलें हे रास्त प्रतिउत्तर मास्तरांच्या स्वाभिमानाचा पिळदारपणा स्पष्ट करते.

' करीन ती पूर्व ' हा तर मास्तरांचा बाणा ! कडवा विरोध असतांना स्वतःला आवडलेली सुशील सुंदर वाटणाऱ्या कुणब्याच्या मुलीशीं जीवनाचे अमर नाते जोडणाऱ्या मास्तरांनी जीवनांत एक उच्चांक गांठला तो आगळा आणि विरळाच !

सदाचारात किंवा साधेपणांतच मोठेपणा मानणारी मास्तरांची व्यक्तिरेखा वेगळ्या प्रकारची होती.

" त्यागपत्र परत घेणं जमणार नाहीं; विटंबना व्यायला मी जन्मलों नाहीं. " हे मास्तरांचे बोल त्यांच्या 'स्वाभिमानाची ' तितकीच 'ताठरवृत्तीची' प्रत्यक्ष साक्षच होती !

विद्यापूजनांत संपूर्ण जीवन वेचणाऱ्या मास्तरांनी प्रतिभेच्या बळावर फुलासमान बालकांचे स्वर्गतुल्य जग निर्माण केलेलं होतं.

सत्वपरीक्षेत; जीवनसंघर्षांत विजयी होऊन; अन्यायासाठीं मान न तुकवणारा स्वाभिमानी मास्तर म्हणजे आदर्शवादी. ज्वलंत व्यक्तिरेखाच होय.

बंडो आबाजीने कोयतीनं वाघ चिरला अन् मास्तरांच्या क्षत्रिय वंशाने शूरतेचा कळस गांठला; तर त्याच खानदानी घराण्यांत राजेमास्तरांनीं कोयतीच्या जागीं ' खड्ड ' हे आपलें अस्त्र परजून, खडतर कर्तव्याचें पायाडांवर विजयाचा तळपता हिमालय पादाक्रांत केला.

शाळेंतील विद्यार्थ्याला अपघात झाला असतांना; स्वतःच्या घरीं आपला मुलगा आजारी असतां, पत्नीची नाराजी सहन करून, विद्यार्थ्यांची काळजी वहाणारा राजेमास्तर अगदी वेगळ्या स्वभावाचा होता, असंच म्हणावं लागेल !

राजेमास्तरानीं कर्तव्यासाठी, निस्पृह वृत्तीने वेचलेले उभे आयुष्य, नंदादीपाप्रमाणेच दुसऱ्यासाठीं तेवत ठेवले.

खऱ्या अन् उदात्त जीवनमूल्यासाठी, जुलुमी अन्यायाविरुद्ध झगडणारा प्रयत्नवादी राजेमास्तर थोर पुढारी किंवा नेत्यांच्या मालिकेंतील एक थोर नेता आहे, असें म्हटलें तर ते योग्यच ठरेल !

' हद्दपार ' करतांना राजेमास्तरांनी उभ्या दुर्गेश्वराला दिलेला मोलाचा संदेश विशेष महत्वाचा वाटेल.

" मी आज पगारी शिक्षक म्हणून निवृत्त होत आहे. हे शाळागृह माझे देवघर आहे. त्यागपत्राची भाषा देवतेजवळ करायची नसते. त्यागपत्र दिलं; म्हणून माझ्या हृदयांत जे स्थान त्याला आहे, ते कोणीच हिरावूं शकणार नाही. तुम्ही माझ्यावर प्रेम केलंत हेच प्रेम घेऊन राजेवाड्यावर येत चला. तुमचे दर्शनाकरिता आंसुसलेला एक दुबळा जीव तुम्हांस दिसेल. त्या जीवाला तुमचें प्रेम, तुमचा सहवास हाच एक आसरा आहे." स्वतःच्या बलिदानाने सुखी आणि मंगल जीवनाचा शोध घेण्यासाठीं धडपडणारी ही मानवता, राजेमास्तरांची व्यथित हांक कदापीहि विसरू शकणार नाहीं. दैवाचें कानांवर न पडलेले हे मास्तरांचे स्वर मानवतेच्या कानात जगाचे अंतापर्यंत घुमत रहातील ! कारण अशा बलिदानांतूनच मानवतेचा खडतर मार्ग आजवर प्रकाशानें उजळला नाही कां ?

या जगांत भल्या बुऱ्यांचा सनातन संघर्ष नेहमी बलिदानानेंच सुटत आलेला आहे. राजेमास्तरांच्या या हाकेनें खडबडून जागी होणारी ही मानवता, आपलं बळ एकवटून मांगल्याकडील ध्येयाचा प्रवास अधिक निर्धाराने पुढे चालू ठेवील; यांत शंका ती कसली ?

स्वामी विवेकानंद म्हणतात कीं:—

" As I grow older, I find that I look more and more for greatnessin little things. Anyone will be great in a great Position. More and more the true greatness seems to me; that of the worm doing its duty Silently, steadily from moment to moment and hour to hour. "

अगदी अशाच प्रकारचा संदेश मास्तरांनी आपल्या बांधवांना देवून त्यांनी फार मोलाचे कार्य पार पाडलेले आहे, असेच म्हणावे लागेल !

राजेमास्तर सांगतात कीं,:—

" जग पुढं पहात असतं, मागं पहात राह्यला त्याला सवड नसते. जगाची ही रहाटी आहे; पण म्हणून मोठी माणसं आपल्या कर्तव्याचा पाठलाग सोडीत नाहीत. तुम्ही पण तुमचं मन काय म्हणतं इकडे अधिक लक्ष द्या. निर्मल राहून मनाला विचारा, मन तुम्हाला खरं काय ते सांगेल; तेच प्रामाणिकपणें करीत राहा. सभोंवतालच्या जगांवर प्रेम करा. हृदयाला-हृदय भिडूं द्या. जे जग आपल्या कार्याकरिता निवडाल त्या जगाशीं एकरूप व्हा; आणि—"

* * *

# पाषाणांतला झरा

बी. एन्. जगताप
पदवीपूर्व विज्ञान.

माझे आजोळ आमच्या डाळज गांवापासून दहा मैलावर आहे. मी अकरावींत होतों त्यावेळची गोष्ट. चैत्र महिना होता. आईने मला कांही कामानिमित्त आजोळी पाठविले होते. निघतांना तिने बजावले " रात्री मुक्कामाला परत ये. "

मी दुपारी आजोळी पोहोचलों. मामा रानांत गेले होते म्हणून थांबावे लागले. संध्याकाळी सातला मामा घरीं आले, त्यांना जे कांहीं सांगावयाचे होते ते सांगितले. परत निघायला आठ वाजले. मामांनीं मुक्काम करण्यास सांगितले. मी त्यांना कांहीं तरी सबब सांगून वाड्याच्या बाहेर सायकल काढली. मामांनीं मला परत बोलावून घेतले. " आतां कांहीं निघू नकोस. परवाच सदा माळ्यांचा सहाव्या मैलावर भिकू रामोशाने खून पाडला. पुन्हा आज ' पुनव ' आहे. तेव्हा आपले सकाळीं जा. "

पण तेवढ्यांत मामांना कोणी तरी हांक मारली. ते आंत गेले. मी तसाच निघालों. वाटले ' आपल्याला का म्हणून मारील? आपल्याजवळ काय आहे त्याला लुटून नेण्यासारखे? ' पण लगेच आठवले ' सदा माळ्याचा खून ' ' भिकू रामोशी खुनी. ' भिकू रामोशी दहा बारा मैलाच्या परिसरांत दरोडेखोरीबद्दल चांगलाच कुप्रसिद्ध होता. आजपर्यंत त्याने दहा खून केले होते. इतका तो निढांवला होता. त्याला खून करणे क्षुल्लक गोष्ट वाटे. पोलीस त्याच्या तपासावर होते. तरीपण पोलीसांना तो सांपडत नव्हता. मनातून मी घाबरलों. परत जाणे अपमानाचे वाटले म्हणून मी तसाच धीर धरून निघालों.

पौर्णिमा होती. चांदणे स्वच्छ पडले होते. दूरवरची झुडपें भेसूर दिसत होती. सर्वत्र भयाण शांतता पसरली होती. गांव पुरता एक मैल सुद्धा पाठीमागे पडला नव्हता, तोच मला भीती वाटू लागली. रस्ता उघड्या पठारावरून जात होता. बाजूला झाडी नव्हती कुठे तरी एखादे झुडुप दृष्टीस पडायचे. त्यालाच मी भ्यायचो. काळीभोर जमीन चोहोंकडे पसरली होती. रस्ता फार चांगला नव्हता पण बरा होता.

चौथा मैल मागे पडला मी बळेच उसन्या अवसानांत सायकल मारीत होतो. मनांत भयंकर भीती वाटत होती, कधी सायकलचा एकदम ' खट् ' असा आवाज होई. त्या आवाजालाच मी दचकत असे. मला पश्चात्ताप होऊ लागला. वाटले ' मामांचा आग्रह उगीच मोडला, ' त्यांनी सांगितलेली वाक्ये पुन्हा पुन्हा कानावर आपटू लागली. " खून....सदा माळ्याचा रामोशाने खून केला...त्यांत पौर्णिमा—भयानक दिवस "

माझी नजर लांबपर्यंत जात होती. सायकल चालूच होती. मनांत नसून पाय फिरत होते. रस्त्याच्या कडेला माणूस उभा असल्याचा भास झाला. भेदरलेल्या नजरेने नीट निरखून पाहिले. भास नव्हता. ठेंगणी आकृति अगदी स्पष्ट दिसत होती. अंगाचा घाम घाम झाला. सायकल लटपटू लागली. त्या आकृतीकडे पहाण्याचा धीर होत नव्हता. सायकल वेगांत होती. आकृति जवळ जवळ येत होती...मागे गेली. ती आकृती माणसाची नव्हती पांचव्या मैलाचा दगड होता. जरा जीवांत जीव आला पण लगेच घाबरलो. हा पांचवाच मैल होता अजून सहावा मैल यायचा होता. खरी भीति पुढे होती.

सायकलचा वेग वाढवला. रस्ता पाठीमागे वेगाने सरकू लागला. आता सहावा मैल येणार होता—सहावा मैल! सहाव्या मैलावर खून!! सदा माळ्याचा खून!! —मला डोळ्यासमोर सदामाळ्याचे प्रेत दिसू लागले. रक्ताच्या चिळकांड्या दिसू लागल्या, घेरी आल्यासारखे होऊ लागले......दीड फर्लांगावर कोणीतरी उभे असल्यासारखे दिसले. मनांत रामाचा जप सुरू केला. खरेच कुणीतरी रस्त्याच्या मधोमध उभे होते. माझ्या अंगातले त्राण नाहीसे झाले. सायकल मारणे बंद पडले. तरीपण सायकल पहिल्या वेगामुळे हळू हळू पुढे चालली होती.

भिकु रामोशीच उभा होता. हातातली फरशी कुऱ्हाड चांदण्यांत लक्ख्खन चमकली. माझे हात पाय गळाले. आणि त्याच्या पुढ्यातच माझी सायकल घसरून पडली. काळा कभिन्न चेहरा, दाढीच्या विखुरलेल्या लांब लांब व राकट केसामुळे भयानक दिसत होता. त्याने माझ्या मानगुटीला पकडून उभे केले. आणि भसाड्या आवाजात विचारले.

" मागनं आनीक कोन कोन येतंय? "

" कोण नाही. मी एकटाच चाललो आहे " मला घाबरल्यामुळें बोलता येत नव्हते पण बळें बळें सांगितले. तो थोडासा भयानक व क्रूरपणे हासला आणि एकदम स्तब्ध झाला. अनिमिष भावाने त्याचे डोळे लकाकले. त्याच्या चेहऱ्याकडे पाहण्याचे धैर्य गळाले. त्याने माझी मानगुट सोडली. डाव्या हातातली कुऱ्हाड उजव्या हातात घेतली. पण माझे हात पाय लुळे पडले. मट्कन खाली बसलो. पण त्याने लगेच मला उभे केले.

" पळून जायला बघशील तर आर्धा घंटा जगायच्या ऐवजी दोन मिनटं बी जगायचा नाह्य. "

ह्या दमाने मी पुरता भेदरलो. माझे संपूर्ण शरीर घामाने डबडबले. त्याने माझी मान घट्ट पकडून खिसे चांपसायाला सुरुवात केली. ' दरोडेखोरांना कांही मिळाले तर ठीक. जर कांहीच मिळाले नाहीतर ते अतिशय चिडतात ' आजीने कधीकाळी सांगितलेले वाक्य आठवले. झडती संपली कांहीच मिळाले नाही. त्याने माझी मान जास्तच आवळली व चिडून म्हणाला.

" कुणाचा तूं? "

माझा जीव कासावीत होत होता. श्वास घेणे जड वाटू लागले. तोंडातून शब्दच फुटेना. भिकु रामोशी जास्तीच चिडला. माझ्या मानेला जोराचा हिसका मारून त्याने पुन्हां प्रश्न केला.

" कुठला हाइस? "

" डाळजच्या जगताप मास्तरचा " एवढे मोठे वाक्य मी मोठ्या कसोशीने उद्गारले आणि—

आणि त्या वाक्यासरशी मानेवरची पकड सैल झाली.

" जगताप मास्तरचा? मास्तरचा? "

" होय " मला थोडा धीर आला.

" मग अजिबात घाबरू नगस. तुझ्या केसालाबी धका लावायचो न्हाय. तुज्या सारख्याला—-मास्तरच्या पोराला —मारून त्याच पाप कुठं फेडू? मास्तर! माजा सखा— तुझ्याचशीणचा हाय—शाना हाय. माज्या सख्याला मास्तरानी शिकवून शानं केलं–अजून शिकावतुय. सखा म्हनतु " मला बॅलीस्टर हुयाचय—-" मास्तर लोकं पोरान्ला शिकावत्यात—-शान करत्यात मास्तर म्हंजी देव मानसं. असाच योक देव, माज्या सखाला—- बिनवारशी सखाला,—त्याला कोन हाय? आय लहानपनी वारली आन् बाप रानोमाळ हिंडतुय—- अशा बिनवारशी पोराला बॅलिस्टर करणार हाय—-असल्या देव मानसांच्या पोराला मारून त्याचं पाप कुठं फेडू? "

मी काय ऐकले यावर माझा विश्वास बसेना. त्याने माझ्याकडे तोंड केले.

" तूं मास्तरचा म्हणून सुटलास ह्या भिक्याच्या हातनं अजून कुनी जीवंत सुटला न्हाय. "

असे म्हणून तो अभिमानाने हसला. त्याने माझी सायकल उभी केली. सायकलवर बसून निघालो. सहज मागे वळून पाहिले. अजून तो माझ्याकडे पहात उभा होता. हातातली कुऱ्हाड चमकत होती अंगावर कांटा येवून गेला मी त्याच्या तावडीतून सुटलो म्हणून मला आश्चर्यहि वाटत होते आनंदहि होत होता.

ज्याच्या तावडीतून कोणीही जीवंत सुटूं शकत नव्हता, असा क्रूर पाषाण पण त्याच पाषणाच्या काळजांत कुठेतरी रुतलेला उदारतेचा प्रेमाचा कांटा सलला आणि त्याच्यातूनच गोड झरा वाहू लागला. किती उदात्त प्रेम शिक्षकाबद्दल!

* * *

# समाधान

साधना गुजर,
पदवीपूर्व साहित्य.

"शुभ मंगल सावधान" चंदुलाल शेठच्या मुलीचे लग्न लागले "वाजवारे वाजवा" म्हणून सुरेशने वाजंत्र्यास सांगितले. शेवटचे मंगलाष्टक झाले नि लग्नसमारंभ संपला. पानसुपारी वाटण्यास सुरुवात झाली. जिकडे तिकडे एकच गडबड उडाली होती. प्रतिष्ठित गणले गेलेले लोक वधुवरांस आशीर्वाद देऊन शेटजींचा निरोप घेऊ लागले. विकासने पण घाईघाईतच पानसुपारी घेतली व, तो जाण्यास निघाला. इतक्यांत सुदेशने त्यास आडवले.

"काय विकास, कसं काय कॉलेज ! बाकी तूं कधीहि बाहेर दिसत नाहीस. हुशार विद्यार्थ्यांची लक्षणेच तशी असतात. निव्वळ पुस्तकातला किडा आहेस." "इंटर सायन्सचे वर्ष आहे आयुष्याला योग्यायोग्य वळण लावणारे वर्ष आहे. अभ्यास जोरात करावयासच पाहिजे. माझ्या आईवडलांची माझ्याविषयीची अपेक्षा कितीतरी मोठी आहे. मी चांगला डॉक्टर व्हावे अशी त्यांची फारच इच्छा आहे. बिचारे कितीतरी कष्ट सोसतात. केवळ माझ्यासाठींच ना ?" विकास सुदेशला सौम्य स्वरांत म्हणाला. "तूं हुषार विद्यार्थी आहेस. तुझा क्लास ठरलेलाच" सुदेश म्हणाला.

'ठीक ! अच्छा ! आतां मी जातों' असे म्हणून विकास जाण्यांस निघाला. 'चल, मीही येतो तुझ्याबरोबर दिवसभर काम करून कंटाळा आला आहे.' असें म्हणतच सुदेश विकासबरोबर जाण्यास निघाला. इतक्यांत वीज कडाडावी त्याप्रमाणें एकदम आवाज आला. "थांब सुदेश ! कुठे चाललास ? भलत्या सलत्याच्या नादी लागू नकोस म्हणून कितीवेळा बजावले आहे ना ? चंदुलालशेट कडाडले. हे बोलणे ऐकून विकासला विजेचा धक्का बसल्यासारखे झाले. तो आश्चर्याने शेटजीकडे पहातच राहिला. "ही वांगीकर माणसें कामापुरते मामा आहेत त्यांच्या नादी लागून जमणार नाहीं आपला." शेटजींचे भाऊ गोविंदभाई सुदेशजवळ जाऊन करड्या स्वरांत म्हणाले.

"त्याला पूर्वीपासून हेंच सांगत आलो आहे. परंतु मोठ्या माणसाचें ऐकावयाचेंच नाहीं." शेटजींची बायको लटक्या स्वरात म्हणाली.

इजा बिजा नि तिजा झाले. विकास फारच बावरला. काय उत्तर द्यावे हेंच त्याला कळेना. तो खाली मान घालून जाऊ लागला. तसा सुदेशही त्याच्याबरोबर निघाला. ते दोघे मांडवाच्या बाहेर पडली.

बाहेर आल्यावर विकासने सुदेशला विचारले, "का रे शेटजी माझ्यावर इतके रागावले ? मी तर त्यांचा कांहीं एक अपराध केलेला नव्हता. त्यांच्या स्वभावामुळे मी तुझ्या घरींसुद्धा येत नाहीं." "असेल कांही तरी ! तूं एवढें मनाला लावून घेऊ नकोस" सुदेश म्हणाला. त्यावर विकास म्हणाला, "मला या सर्व गोष्टी कळतात, माझ्या बाबांचे नि तुझ्या वडिलांचे व्यवहारांत वांकडे आले, म्हणून केवळ त्याचा राग त्यांनीं माझ्यावर काढला. त्यांची ही जवळजवळ चौथी पांचवी वेळ असेल. केवळ व्यवहारांतील कारणाने एकाचा राग दुसऱ्यावर काढणे बरोबर आहे कां ? समाज पैशास मान देतो. आमच्यासारख्या गरीबांचे कांहींच चालत नाहीं. गरीबांचा साधा अपराध त्याच्या आयुष्याचें वाटोळे करतो. त्यांच्या या बोलण्याने माझ्या आयुष्यावर वाईट परिणाम होणार नाही कां !

सुदेश सर्व बोलणे लक्षपूर्वक ऐकत होता. परंतु काय उत्तर द्यावे हे त्यास समजेना. नंतर दोघांनी चहा घेतला. आणि विकास सुदेशचा निरोप घेऊन निघाला.

विकासच्या मनांत अजून तेच विचार चालू होते. त्याच्या आईने भोगीलाल शेटविषयी सांगितलेली गोष्ट आठवली. ते पूर्वी अत्यंत गरीब होते. आणि या स्थितींतून ते वरच्या पातळीपर्यंत येऊन पोहोंचले होते. तेहि विकासच्या वडलांच्या सल्ल्यानेच....पण माणूस पैशाच्या धुंदींत सर्व विसरतो. विकासचें मन विचारांच्या काहुरानें भरून गेले. या गोष्टीचा आपण केव्हा तरी बदला घेऊं या विचारांतच तो खोलीवर आला.

दुसऱ्या दिवशी विकासची परीक्षा सुरू होणार होती. विकासला केमिस्ट्री प्रॅक्टीकलची तयारी करणे अवश्य होते. परंतु त्याचे मनच अभ्यासांत लागेना. पुनः पुनः त्याच्या मनांत तेच विचार येत होते. 'गरीब झालो म्हणून अपमान सहन करावा काय ?' विकासने स्वतःलाच प्रश्न टाकला. श्रीमंतीच्या डौलात हे लोक गरीबांची मान मुरगळतात. यावरून पैसाच माणसाला प्रतिष्ठा निर्माण करून देतो, असे दिसते. पैसा !....पैसा !.... पैसा !....त्याचीच कमतरता आम्हास भासते. नाहीतर मी आज शेटजीला त्या भाषेंतच उत्तर देऊं शकलों असतो. परंतु वयाने मोठ्या असलेल्या माणसाशी नम्रतेनें वागावें, हेच आईचे शिकविलेले वाक्य मी कधीहि विसरणार नाहीं. अशा विचाराच्या मालिकेतच विकासला झोप केव्हा लागली हे कळले नाहीं.

परीक्षा झाली व निकाल थोड्याच दिवसांत लागला. विकासचे वडील रिझल्ट पहाण्यास आतुर झाले होते. ११ वाजतां विकासच्या मित्राचे पत्र मिळाले. विकास उत्तम मार्कांने उत्तीर्ण झाला हे पाहून त्यांना अत्यानंद झाला. त्यांनीं सत्यनारायणची पूजा करायचे ठरविले. गावांतील लोकांना निमंत्रण दिले गेले. कार्यक्रमास आरंभ झाला. समारंभ व लोक पाहून विकासला सुदेशच्या बहिणीचे लग्न आठवले. व तो बेचैन झाला परत त्याच्या मनांत गरीबी श्रीमंतीचे तुंबळ युद्ध सुरू झाले. पूजा संपवून विकासची आई बाहेर आली. विकासला विचारमग्न पाहून ती माऊली म्हणाली, 'बाळ आता कसला विचार चाललाय.' आईच्या बोलण्याने विकास भानावर आला. व "काही नाही आई" असे उत्तर देऊन पुढच्या उद्योगाला लागला.

काळ झरझर उलटत होता. विकासचा सायन्स हा आवडता मार्ग असल्यामुळे तो अभ्यासाच्या नादांत जगाला विसरण्याचा प्रयत्न करत असे. शुद्ध प्रतिपदेपासून चंद्र ज्याप्रमाणे आपले खरे वैभव दाखवूं लागतो त्याप्रमाणे विकासही आपली चमक दाखवूं लागला. पौर्णिमेचा चंद्र जसा स्वप्रकाशाने लोकांना रमवून टाकतो त्याप्रमाणे विकासने डॉक्टरकीच्या शेवटच्या परीक्षेत प्रथम येऊन आई वडलांना आनंदित केले.

आता विकास हॉस्पीटलमध्ये सर्व्हीस करीत होता. तो अधून मधून घरी येई. वडिल आता म्हतारे झाले होते. आई थकली होती. मुलगा डॉक्टर झालेला पाहून त्यांना आनंद होत होता. एके दिवशी ते विकासला म्हणाले. विकास दोहोचे चार हात कर ना. आता तुझ्या आईला सुद्धा काम होत नाही.

परंतु "बाबा, अजून माझे शिक्षण कोठे पूर्ण झाले आहे. मी कॅन्सर रोगावर संशोधन सुरू केले आहे. लग्नाच्या भानगडीत आताच पडणे योग्य नाही. असे मला तरी वाटते.'

आपल्या शब्दाप्रमाणे विकासचे कॅन्सर रोगावरचे संशोधन चालू होते. विकासचा वर्तमानपत्रात फोटो आला. इकडे अंथरुणावर अजारी असलेल्या वडलाना उद्देशून सुदेश म्हणाला. "दादा विकासचा वर्तमानपत्रात फोटो आला आहे.

'कोण विकास ?' 'मला नाही आठवत.' असे चंदुलालशेठ गुर्मीत म्हणाले. त्यावर सुदेश म्हणाला. 'तो विकास ज्याची संगत धरू नकोस, असे तुम्ही सांगत होता.' सुदेशने दादाना आठवण करून दिली. 'हो ! आठवला तो विकस्या होय ! कशाबद्दल फोटो आला आहे ? कां कोठे चोरी केली नाही ना ? बेट्याने !' शेटजींनी मुलास प्रश्न केला, 'नाही दादा, त्याने कॅन्सर रोगावर संशोधन केले आहे,' सुदेश म्हणाला. 'अस होय' असे म्हणत असतानाच त्यांना खोकल्याची जोरात उबळ आली.

दिवसेंदिवस शेटजींचा आजार वाढत होता पूर्व कृत्याबद्दल त्यांना आता पश्चाताप होऊं लागला.

गोविंदभाईनी मुंबईच्या डॉक्टरांना बोलाविले व सुदेशच्या वडिलांची तब्येत दाखविली. डॉक्टरांनी "ह्यांना कॅन्सर झाला आहे. योग्य रीतीने काळजी घ्यावयास पाहिजे" असे सांगितले.

डॉक्टरांचे बोलणे सुदेशने ऐकले. त्यांने काकांना सांगितले की विकासने नुकतेच कॅन्सरवर औषध शोधून काढले आहे. त्याला तार करून बोलवू कां? विचार करण्याची ती वेळ नसल्यामुळें काकांनी परवानगी दिली. सुदेशने ताबडतोब विकासला तार केली. तार हातात मिळताच विकास सुदेशच्या घरी हजर झाला. सुदेशला बरेच दिवसांनी पाहिल्यामुळें त्याला अत्यानंद झाला. सुदेश म्हणाला ' विकास आज कित्येक दिवस झाले दादा आजारी आहेत त्यांची तब्येत बघ.'

विकासने योग्य ते उपचार केले. तो स्वत: जातीने त्यांची तब्येत पहात होता. दोन तीन महिन्यांनी ते चांगले हिंडू फिरू लागले. तो त्यांचा पुनर्जन्मच झाला होता. सगळ्यांना आनंद झाला.

विकास आईवडलांसह सुखाने रहात होता. गरीबांना तो मदत करीत असे. एके दिवशी विकासची आई म्हणाली 'बाळ विकास आता तरी लग्न करण्यास कुठली हरकत नाही ना? गोविंदभाईची वंदना मुलगी तू पाहिलीच आहेस. देखणी आहे. तुला पसंत असेल तर उरकून टाकू.'

यावर विकास म्हणाला. ' आई आतापर्यंत मी तुझा कोणता शब्द मोडला आहे का?'

लग्नवेळ जवळ येत चालली होती. बाहेर चौघडा वाजत होता. लोकांचा थवाच्या थवा मंडपाकडे येत होता. सर्व मंडप चिक्कार भरला होता.

'शुभ मंगल सावधान!' पहिले मंगलाष्टक सुरू झाले. तसा विकासला सुदेशच्या बहिणीचे लग्न आठवले. पण ह्यावेळेस त्याचे मन पूर्वीच्यासारखे चंचल झाले नाही. उदास झाले नाही. पूर्वीच्या प्रसंगाचे उट्टे काढण्यास हीच चांगली संधि आहे. असा मनाने इशारा दिला.

मंडपात चंदुलालशेठ, गोविंदभाई वगैरे सर्व मंडळी बसली होती. सगळ्यांच्या तोंडावर आनंद उसळत होता. इतक्यांत विकास आपल्या मित्राला म्हणाला 'अरे, आम्ही वांगीकर माणसे, आमच्या नादी लागून तुझें नुकसान होईल,' असें सर्वांना ऐकू जाईल एवढ्या उच्च स्वरांत विकास म्हणाला. आज खरे त्याला मानसिक समाधान लाभलें होतें. त्याचे ते शब्द ऐकून गोविंदभाईंना आपले कान फुटत आहेत असा भास झाला. त्यांच्या डोळ्यापुढे अंधाऱ्या आल्या. चंदुलालशेठ आश्चर्याने विकासकडे पाहात राहिले.

* * *


**अरुण**

**क्लॉथ सेंटर**

◆

**बारामती**

◆

**सर्व प्रकारचें**

**कापड**

**योग्य दरांत**

**मिळण्याचें ठिकाण**






## शिष्यवृत्त्यांचे मानकरी १९६३-६४



बसलेले : कु. पुरंदरे, श्री. चांवेर, प्रा. पाटील, प्राचार्य पाटील, प्रा. दोशी, श्री. बाळगुडे, कु. रोंघे
उभे : श्री. बोराटे, श्री. दंडवते, श्री. भामे, श्री. लडकत, श्री. जगताप, श्री. मारवाडी, श्री. बोडके, श्री. कळंत्रे

आंतरमहाविद्यालयीन खो खो उपविजयी संघ



# ताई

कु. पुष्पा रोंघे
प्रथम वर्ष साहित्य

वसंत, ए वसंता ऽऽऽ

आई आतून हांक मारीत होती. तसा मी तंद्रीतून जागा झालो. पहातो तो मी आलो तसाच झोपलो होतो कॉटवर. बूटसुद्धा पायात तसेच होते. मी कॉलेज-मधून केव्हां झालो ? का आलो ? कसा आलो ? माझी सायकल कुठय् ? मी इतक्या लवकर कसा आलो ? असे अनेक प्रश्न मला भंडावू लागले. आणि मला काही सुचेनासे झाले. मी परत तसाच लवंडलो.

पण माझ्या कपाळावर गरम स्पर्श कोणीतरी केला. मी एकदम दचकलो. डोळे उघडून पाहू लागलो तर आई माझ्या उशाला बसली होती. ती मला विचारीत होती.

‘आज तू कॉलेजमधून इतक्या लवकर का आलास ? तुला बर नाही वाटते ? तुझे अंग गरम झालय्. थांब तुला कॉफी करून आणते.’

पण मी आईच्या मांडीवर डोक ठेवलं. त्यामुळे माझे बोलण्याचे शब्द वाचले आणि ती तशीच बसून राहिली. पण मग माझ्याकडून बोलवण्याचा ती प्रयत्न करूं लागली. तिने परत विचारले. “ तुला काय होतय ? डोके दुखतय् का ? ” मी मानेनच नाही म्हटले. पण आई माझ्या अगदी खनपटीलाच बसली. मी बोलल्या-शिवाय हलायच नाही असा जणु तिने निश्चयच केला होता. आई मला बोलविण्याचा प्रयत्न करीत होती तरं मी तिच्यापासून कांहीतरी लपविण्याचा प्रयत्न करीत होतो.

मी मनात म्हटले कशाला तुम्ही माझ्यावर इतके प्रेम करता, प्रेम आंधळे असते. तुमच्या प्रेमाने मला दुबळं करून ठेवलय्. साधे साधे प्रसंग सहन करण्याची मला ताकद राहिली नाही. खरंच हा प्रसंग मला इतका साधा वाटतो. तो खरच साधा असेल का ? पण मला जरी तो साधा वाटला तरी तो आईला साधा वाटेल? आईला माझा संशय येईल का ? छे, छे, ती काय आमच्या क्लार्कसारखी नाही. जगाला काय ? अहो भाऊ बहीण फिरायला चालली असली तरी म्हणतात चालले जोडपे. पण या १५० रुपयांची गोष्ट तर साऱ्या कॉलेजला कळली असेल, मग मला याच्यापासून त्रास होणार आहे का ? पण हा सारा विचार आपण आगोदरच केला असता तर ? लोक काय म्हणतील ? आईवडिलांचा लाडका एकुलता एक मुलगा पण अगदी विरुद्ध निघाला हा पोरगा. लाडकी पोरं ही अशीच निघायची. ना कोणाचा धाक ना कोणाचा दरारा. या विचारांनी अंगा-वर काटे यायला लागले. माझ्या अंगावरचे काटे आईला स्पष्ट दिसले असावेत. कारण ती मला म्हणाली. “ वसु, तुला थंडी वाजतीय् का ? अरे तुला अस एकाएकीच काय झालय्?” तिचा चेहरा घाबरल्यासारखा दिसत होता.

सहाजिकच आहे. आईला, आपला मुलगा कितीहि मोठा असला तरी तो लहानच असतो आणि जरी तो थोडा आजारी असला तरी तिला तो फार आजारी आहे असा वाटतो. शिवाय मी तर एकुलता एक. शिवाय खूप हुशार असल्यामुळे वडिलांची माझ्यासाठी सर्व कांही करण्याची तयारी. त्यांत म्हणजे मी आई वडिलांना विचारल्याशिवाय कोणतीच गोष्ट करीत नाही. हा माझा पहिलाच प्रसंग होता.

त्यामुळे चुका कमी असल्यामुळे त्या कबूल करण्यास मला प्रसंगच पडला नाही. हा सगळा पहिलाच प्रसंग होता त्यामुळे मी कचरत होतो. आई सारखी विचारीत होती. तेव्हा मी निश्चय केला कीं, आज नाही उद्या आपणाला ही गोष्ट सांगावीच लागणार शिवाय कॉलेजचे

फी न भरल्याबद्दल पत्र आले तर मग आपणाला बाबांची बोलणी खावी लागणार. कारण जरी बाबांचा मी खूप लाडका असलो तरी पैसे गेल्यावर शिवाय ते थोडे थोडके नाही, चांगले १५० रुपये गेल्यावर त्यांच्या तापट स्वभावाचा प्रयोग माझ्यावर नक्कीच होणार तेव्हा आपला अगोदर आईकडून वशिला लावून ठेवला म्हणजे आपल्यावरचे हे सर्व प्रसंग टळतील म्हणून मी एकदाचें तोंड उघडले. पण माझ्या जिभेमध्ये जीवच राहिला नव्हता. ती खूप जड झालीय अस मला वाटत होते. म्हणून मी अडखळत बोललो.

" आई......माझ्या हातून.......एक चूक झालीय ग...... " पुढे माझ्याच्याने बोलवेना माझा आवाज रडल्यासारखा झाला होता. पण मी चोरट्या नजरेने आईकडे पाहिले तो भयचकित नजर माझ्यावर टाकली. मी खाली पहायला सुरुवात केली मी अगदी गंभीर होत चाललो होतो. ते आईने ओळखले आणि धीर देत मला म्हणाली, ' वसु तूं इतका का आडखळतोस काय झाले ते मला व्यवस्थित सांग.'

आईचे मन स्वच्छ होते पण माझे मन मात्र प्रसंग झाल्यापासून कसल्यातरी विचाराने हेलकावे खात होते. मनातल्या मनांत आईला सर्व सांगण्याबद्दल मी खूप निश्चय करीत होतो. पण माझ्या शब्दात धैर्य नव्हते. तेवढ्यात मी कांहीतरी बोललो पण मला त्यापैकी एवढेच शब्द आठवतात.

'आई, मला दिलेले पैसे फीचे......'

' काय झाले ? हरवले, का कोणी पळवून नेले.' आई एकदम घाबरून जोरात बोलली.

साहाजिकच आहे. मनुष्य कितीहि श्रीमंत असला तरी १५० रुपये गेले म्हणजे धक्का बसल्याशिवाय कोणाला राहील ? मला वाटले आता आई मला नक्कीच रागावणार. त्यामुळे माझा चेहरा फारच भयभीत झाला. पण माझा माझ्या कानावर मुळीच विश्वास बसेना. कारण आई मला म्हणत होती, "वसंत मला खात्री आहे की, तू तुझे पैसे मुद्दाम जाणून बुजून जाऊ देणार नाहीस. पण कोणी चोरूनच घेतले असले तर तुझा कांही इलाजच नाही त्यात. आणि जर हरवले असले तर तुला रागावून ते आपणाला मिळणार आहेत का! तेव्हां आतां मला तू न भिता सांग काय झाले ते पैसे ?"

मला एकदम हायसे वाटले. पण माझ्या मनांत शंका येऊन गेली कीं, आईला ' तिच्या ' विषयी कांही संशय आला तर.......

म्हणून मी आईकडून गैरसमजाविषयी कबूल करून घेण्याचे ठरविले आणि म्हटले,

'आई ग मी तुला सारे कांही सांगतो पण ते एका अटीवर तूं माझ्याविषयी गैरसमज करून घेऊ नकोस.'

' गैरसमज ' आई अगदी त्रासिक चेहरा करून म्हणाली.

बरोबर आहे. आईला आतांपर्यंत मी इतक्या गोंधळांत पाडण्याचा प्रयत्न कधीच केला नाही. त्यामुळे आईला आज माझ्या प्रत्येक वाक्यात नाविन्य वाटत होते. तिच्या चेहऱ्याकडे पाहून मला असे वाटले कीं, आता हिला अधिक गोंधळांत ठेवण्यांत अर्थ नाही, असे मला वाटू लागले. म्हणून मी तिला माझे हृदय उघडून दाखविण्याचा प्रयत्न करू लागलो. " आई ऐक, आमच्या वर्गांत दोन तीन दिवसापूर्वी एक मुलगी आली आहे. दिसायला चारचौघींसारखीच आहे. ती खेडवळ असावी. कारण ती थोडी भित्रीच वाटत होती परंतु पहिल्या दिवशी जेव्हां ती वर्गात आली तेव्हा सर्व मुले तिच्याकडे पाहून तिच्याविषयी चर्चा करू लागली. पण तिने वर्गातील एकाहि आशाळभूत नजरेला दुजोरा दिला नाही. "

मी हे सांगत असतां आईच्या चेहऱ्याकडे पहात होतो. तेव्हा मला असे आढळून आले की, आईला या वर्णनामध्ये रस नाही. म्हणून मी तिच्याविषयी पुढे सांगावे की नको असा विचार करू लागलो. पण तेवढ्यांत आई म्हणाली, "वसंता, एखाद्या मुलीचे वर्णन तुझ्या तोंडून मी आजच प्रथम ऐकते आहे. पण मला याबद्दल काय कळतं? तेव्हा मला फक्त पैश्याबद्दल सांग."





आईच्या या वाक्यामुळे मी चांगलाच भानावर आलो आणि ही गोष्ट आपण आईला सांगत आहोत हे माझ्या लक्षांत आले. आणि मला असे वाटले कीं, आईला आपला नक्कीच संशय आला असावा म्हणून त्याचे निरसन करण्यासाठी तिला म्हटले.

" आई तुला मी मघाशी जे विचारले होते की, तूं माझ्याविषयी गैरसमज करून घेशील असं, पण तूं कांही बोलली नाहीस. पण आता मला वाटते की, तुला कांही तरी माझ्याबद्दल संशय आला आहे. "

तेव्हां आईने माझ्या वाक्याला उत्तर द्यायचे टाळून मला पुढे सांगायला सांगितले. तेव्हां मी पुढे सांगायला सुरुवात केली.

" तिने अजून फी भरली नव्हती असे मला वाटते. कारण तिला सरांनी ऑफिसमध्ये बोलावले होते. मी मधल्या सुट्टीत आज फी भरावयाचे ठरविले होते. म्हणून आज मधल्या सुट्टीत मी फी घेऊन ऑफीसमध्ये जाऊ लागलो तेव्हां मला कांही संभाषण ऐकू येऊ लागले. म्हणून मी ते ऐकू लागलो. कारण आमचा क्लार्क जरा मोठ्याने बोलत होता. क्लार्कशी बोलणारी मुलगी होती. आमचा क्लार्क हा मुलींशी जरा जादा शिष्टपणाने बोलतो. किंवा मुली पाहिल्या कीं, त्याच्या आवाजाची पट्टीहि उंचावते

ती मुलगी विचारत होती, 'फी ची शेवटची तारीख केव्हा ?' तेव्हां क्लार्क चरा शिष्टपणाने उत्तरे देत होता, ' बाई तुम्हाला तर प्रिन्सीपॉलने आजच शेवटची मुदत दिली होती. ' ' ते सांगण्यासाठीच मी आले होते. पण प्रिन्सीपॉल घरी गेले आहेत आणि आता ते पुण्याला जाणार आहेत. तेव्हां त्यांची गाठ पडणार नाही. मग मी काय करू ? माझे इथे कोणी ओळखीचे नाही हो. शिवाय माझ्या पगाराला अजून १५ दिवस अवकाश आहे. मला आता प्रवेश मिळणार नाहीच का?'

नवीन माणसाला घाबरवून सोडणारा असा क्लार्कचा स्वभाव आहे तेव्हा तो म्हणाला " अहो ॲडमिशन फॉर्म पाठविण्याची तारीख आज शेवटचीच आहे. कॉलेज म्हणजे काय पोरखेळ आहे का ? कॉलेजमध्ये प्रवेश करण्याचे धैर्य म्हणजे श्रीमंताचेच. गरीबांचे पैसे पासंगाला सुद्धा पुरत नाहीत. तुमच्याजवळ जर पैसे नाहीत तर मग कशाला आलांत कॉलेजमध्यें ? "

त्याची ती अवास्तव बडबड ऐकून ती घाबरली होती. घाबरलेल्या माणसाला इतर गोष्टीची लवकर जाणीव होत नाही. त्यामुळे तिच्या मनावर क्लार्कच्या बोलण्याचा परिणाम झाला नव्हता. पण ती मुळातच घाबरली होती. वास्तविक तिने पैसे नंतर भरून टाकले असते तरी चालले असते. ती खूपच हताश झालेली दिसत होती. आणि तिच्या डोळ्यांतून अश्रू ओघळत होते. ती तशीच ऑफीसपासून जरा बाजूला जाऊ लागली.

इतक्यांत मी तिथे गेलो आणि ऑफीसजवळ उभ्या असलेल्या रागिणी परांजपेला हांक मारायला प्यूनला सांगितले. आणि क्लार्कला हे पैसे तिच्या नांवावर मी भरणार आहे असे सांगितले. क्लार्क पेन्सील वगैरे घेऊन तयारच होता. तो फक्त माझ्या येण्याचीच जणू वाट पहात होता. मी हे पैसे तिच्या फीसाठी दिले आहेत असे पाहिल्यावर त्याला फारच आश्चर्य वाटले आणि तो खोचकपणे मला विचारू लागला.

" काय गोखले, त्यांचे पैसे आपण भरता. बराच लवकर वशिला लावलात कीं, कांही तरी भानगड दिसतीय्. "

मी त्याचे बोलणे उडवून लावले आणि तेवढ्यांत ती ऑफीसमध्ये आली.

मी सांगायच्या अगोदरच क्लार्कने तिला सांगितले, " तुमचे पैसे यांनीं भरले आहेत. "

तिच्या डोळ्यांतून आनंदाश्रू वाहू लागले. आणि ती माझे सारखे आभार मानूं लागली. पण मला तिथे फार वेळ थांबता आले नाही. कारण तेवढ्यांत बेल झाली आणि वर्ग सुरू झाला.

प्रथम हे केलेलं कृत्य चांगले आहे असे मी मनांत म्हणत होतो पण जेव्हां मला क्लार्कची वाक्ये आठवत तेव्हां मात्र अंगावर काटा येई.

आई, त्यामुळे मी तास सोडून निघून आलो. ही बातमी सबंध कॉलेजभर झाली आहे. पण मी त्याला जुमानीत नाही. आई आता याबद्दल मत सांग. ”

आईला खूप आनंद झाला होता. ती मला म्हणाली, ‘वसंता, त्या मुलीला आपल्या घरीं का आणलं नाहीस, मी तुझे पैसे सत्कारणी लागले असे म्हणते आणि तिला तूं परत पैसे मागू नकोस.’ मला खूप आनंद झाला.

दुसऱ्या दिवशीं कॉलेज सुटल्यावर मी तिला आमच्या घरी आणले. आईला पहातांच ती आईच्या गळ्यात पडून रडूं लागली. आईला, बाबांना व मला खूप वाईट वाटले. तिनें आईला सर्व परिस्थिति सांगितली. आणि आईने तिला तिची मुलगी म्हणून ठेवून घेतली. मलाहि बहीण नव्हती. या दिवाळीला मला माझी सत्तेची बहीण झाली, मी तिला हांक मारली ‘ताई....’


मे. शहा मेडिकल स्टोअर्स

औषधाचे व्यापारी

बारामती

• टाटा फाहिसन प्रा. लि. मुंबई
( रॅलिज् पेस्टिसाईडस् इंडिया लि. )

डिस्ट्रिब्यूटर्स

• शालिमार बिस्किटस्

• न्यू ट्रिन् स्वीटस्

• हिंदुस्थान लिव्हर लि. सोप डिव्हिजन,
टॉयलेट डिव्हिजन,
कॅटलफीड डिव्हिजन.

• मधु कॅनिंग्ज ॲण्ड फूड प्रॉडक्टस्




# बाळ गेला दूर देशा


कु. मनोरमा कृष्णराव काळे
प्रथम वर्ष साहित्य


भिंतीवरील घड्याळाने एव्हाना बाराचे टोल दिले. राजू पलंगावर तापाने फणफणतच होता. उमा त्याच्या शेजारी बसली होती. दहाबारा दिवसाचा ताण पडल्यामुळे उमा थकली होती. तिने राजूचे टेंप्रेचर पाहिले तर ते १०३° होते. तिच्या तोंडून नकळत ‘अरे देवा !’ असें दुखोद्गार निघालें. राजू म्हणजे तिचा जीव कीं प्राण.

राजूला तापामुळे ग्लानी आली होती व तो झोपी गेला. उमा मात्र चिंतातुर नजरेने कोठे तरी पहात होती. तिची नजर बाजूच्या एका लहानपणच्या फोटो-वर स्थिरावली. तिचें मन गतकालीन आठवणींच्या हिंदोळ्यावर झोके घेत होते.

लग्न होऊन उमाने गृहलक्ष्मी म्हणून सासरदारात पदार्पण केले होते. तेव्हा शेजारच्या बायका म्हणाल्यां होत्या की, “ कसा लक्ष्मी–नारायणासारखा जोडा दिसतोय. ” तेव्हा नकळत ती हंसली. उमा ही सालस, गोंडस, सुंदर कर्पूर कामिनी होती. अशी कर्पूरकामिनी मिळणाऱ्याचे भाग्यच ! उमेशही तिला साजेसा असा पति लाभला होता. सुशिक्षित प्रेमळ आणि सुदृढ-बांध्याचा पुरुष होता तो !

उमाचे लग्न होऊन बरेच दिवस झाले होते. आपत्यासाठी तिचे मन आसुसले होते. सहाजिकच आहे. स्त्री-प्रवृत्ति आहे ती ! घरात हसरे तारे असल्याशिवाय घर सुशोभित दिसूं शकत नाहीं. आणि कांही दिवसांनी उमाच्या मनांत डोलणारा पाळणा घरांत हलूं लागला.

राजूचे बारशे फार थाटांत घालण्यांत आले होते. तिच्याच आवडीने राजीव हे नांव ठेवण्यांत आले. त्या दिवशीं तर तिच्या सासूबाईची धांदल न्यारीच ! इतर बायका राजूला ‘नक्षत्रासारखा पोर लाभला आहे.’ म्हटलें कीं, सासूबाई लिंबू, मीठ, मिरच्या, नारळ राजूवरून उतरून टाकीत. कारण दृष्ट लागेल ना ! भोळा भाबडा जीव तो !

उमा आपल्या सोनुल्याला प्राजक्ताच्या फुलाप्रमाणे जपे. राजूला खेळवितांना ती भूक, तहान सर्व कांही विसरून जाई. बोबड्या बोलाने ती राजूला खेळवीत असे. “ लाजू बघू तुझे डोळे बघू तुझे नाक, कोणा-सालखे ले ? आणि हे तोंऽऽड तुझ्या बाबा सालखे कां ? अले चोला बाबांचे नांव काढले कीं, हसतोस ! लबाड कुठला !”

राजू लहान असतांना आजोबांशी गप्पा–गोष्टी करे तो आजोबांना घोडा करे व आपण घोड्यावर स्वार होई व म्हणे, “ चल घोले घोले टिक् टिक्, टिऽऽक ” साठ–सत्तर वर्षांचे आजोबा आपल्या नातवाला कधिही दुखवत नसत.

तितक्यात उमा येई व म्हणे, अरे राजू ते तुझे आजोबा आहेत. ” म्हाताऱ्या माणसाला कां कोणी त्रास देतो ? ” मग आजोबा म्हणत ‘ अग सूनबाई लहान पोर आहे ते, पोराचीच जात ती ! चालयचंच ! ”

राजू शाळेत जाऊ लागला. तो शाळेतून आला की गप्पा करे, एकदा त्यांच्या गुरुजींनीं आईविषयी माहिती सांगितली. राजू घरी आला व तो उमाला विचारू लागला “ आऽऽई द् आईला देवबाप्पा कां म्हणावयाचें ? आईचें प्लेम म्हणजे द् काय ? तूं माझी बाप्पा आहेस ? ” असें तो एक ना दोन अनेक प्रश्न विचारून उमाला भांबवून सोडी तें ऐकून उमाला अत्यानंद होई राजचें ते बोलणें ऐकून उमेला तिच्या

आईची आठवण होई व तिच्या डोळ्यात पाणी उभे राही. मग तिला राजू विचारे, ‘ आई तूं का ललतेस ? मग ती म्हणे मला की नाही माझ्या बाप्पाची आठवण झाली रे राजा. राजू विचारी, आई म्हणदे तुला ही बाप्पा आहे ? आई तूं लदू नको ? मला छमा तल. मी नाही तुला लदू देणार, तूं ललिस तल आम्ही नाहीं बोलनाल’ हें त्याचें बोबडे बोल कोणाचें मन आनंदी करणार नाही बरें ?

राजू हा गोंडस तसा सालसहि होता. एकेदिवशी शाळेत एका मुलाला ठेंच लागली राजूने त्याला धरलें व म्हणाला की “आपण की नाही आतां डॉक्तलांच्याकले जायचें डॉक्तल तुला औषध लावतील ह ललायच मुलीच नाही ? ”

असा हा गोंडस व सालस मुलगा आज दहा दिवस झाले अंथरूणाला खिळून राहिलेला होता.

“ आईऽऽऽग अशी हांक उमाच्या कानीं आली व उमा एकदम आपल्या तंद्रीतून जागी झाली तिने पाहिले तर टेंपेचर १०४ होते. डॉक्टर त्या दिवशीं घरीच होते कारण डॉक्टरानी दहा तासाचा अवधि दिला होता.

रात्रीचे नऊ वाजले. उमेश ऑफिसमधून आला होता. त्याने राजूची चौकशी केली. राजूला शांत झोप लागली होती. डॉक्टरांचे प्रयत्न चालूच होते. दहा दिवसाच्या त्रासामुळे उमाखेरीज सर्वजण झोपले होते. राजूने आणखीन एक ‘आ ऽऽऽ ई ऽऽ ग’ अशी आर्त हांक मारली. त्यावेळीं त्याचें टेंप्रेचर १०५ होते. डॉक्टरांनीं त्याची नाडी तपासली व दुःखाचा निःश्वास सोडला. राजूने केव्हांच जगाचा निरोप घेतला होता. उमा एकदम किंचाळली. राजूचे डोके तिच्याच मांडीवर होते. सर्वजण त्या खोलीत आले. ती खोली दुःख-सागरांत बुडून गेली. त्याचवेळीं शेजारची एक मुलगी गडकऱ्यांची कविता पाठ करीत होती.

“ राजहंस माझा निजला ” ते शब्द उमाला पुनः पुन्हा ऐकूं येत होते.

डॉक्टर उमेशला म्हणाले, “ I am sorry very much. ” ते निघून गेले. उमेश तर मटकन खालीच बसला. रंगत चाललेला उमा–उमेशच्या संसाराच सारिपाट उलथून देत राजू निघून गेला होता.

उमाचे इकडे वेड्यासारखे झाले होते ती वेडी झाली होती. केवळ मातृवात्सल्यामुळे. राजूला नेतांना ती ओरडत होती. राजू माझा बाळ आहे; मी नाही कोणाला देणार असे म्हणून ती आक्रोश करीत होती. कितीही तिने आक्रोश केला तरी गेलेला जीव परत येणार होता काय ?

तिला दवाखान्यांत नेण्यात आले. परंतु उमेशच्या पदरीं निराशाच. दैव तरी किती दुष्ट असते पहा. एकदां हात धुवून पाठी लागले कीं लागतेच. तसेच उमेशचे झाले होते. ती डॉक्टरांना म्हणे ‘डॉक्टर तुम्हीच माझ्या बाळाला माझ्या सोन्याला नेलेत. राजू माझा बाळ आहे. तो मला कधींहि सोडून जाणार नाहीं. द्या माझा बाळ मला. राजू ये ना मी तुझी आई हांका मारते आहे मी रडत नाहीं. तूं म्हणत होतास ना कीं, तूं रडत जाऊं नकोस ?’ असे ती बडबडे व एका हातांत बाहुलें घेऊन ती त्याला कवटाळे. व त्याला थोपटे. ती म्हणे माझा राजू दूर गांवीं शिकण्यासाठीं गेला आहे. येईल परत आज ना उद्या. आणि ती गाऊ लागे.

‘बाळ गेला दूर देशा
झाल्या आतां तिन्ही सांजा ऽऽऽ’

उमा बालक मंदिराच्या कोपऱ्यावर लहान मुलांचे कौतुक करीत त्यांना खाऊ देत असतांना दिसते. मुलांनीं तिला ‘ आई ’ म्हणून हांक मांरली कीं तिचे अंग शहारून जाते आणि ती आपल्या दूर देशी गेलेल्या राजूला त्या असंख्य भोळ्या निरागस नेत्रांत शोधूं लागते.

---





# प्रे. जॉन केनेडी

श्री. र. गो. निबंधे
पदवीपूर्व विज्ञान.

१९६३ सालांतील नोव्हेंबर महिन्याची २२ तारीख. तो दिवस शुक्रवार होता. आज हवाहि सुरेख होती. आकाशांतून सूर्यदेव आपल्या लाडक्या कन्येची–पृथ्वीची चौकशी करित होते. दुपारी १२॥ चा सुमार होता.

दक्षिण अमेरिकेतील टेक्सास संस्थानांतील डल्लस शहराच्या विमानतळावरून शहरांतील डेमॉक्रॅटिक पक्षाच्या सभेत भाषण करण्यासाठीं अमेरिकेचे लाडके अध्यक्ष प्रे. जॉन रस्त्यावरिल गुबगुबीत कुत्र्याकडे पहात आपल्या सौंदर्य साम्राज्ञी पत्नी जॅकेलिनसह मोटारीतून जांत होते. रस्त्याच्या दुतर्फा उभे असलेले हजारो अमेरिकन हात उंचावून त्यांना आभिवादन करित होते.

छायाचित्रकार आणि चलच्चित्रकार आपले कॅमेरे सुसज्ज ठेवून फोटो घेण्याच्या तयारीत होते. कॅमेऱ्याची कळ दाबली जाते न जाते तोच धाड्–धाड्–धाड् तीन प्रचंड आवाज झाले आणि ‘ ओ ! नो ! ’ एवढेच जॅकेलिनचे करूण शद्ब वातावरणात घुमले. काय झाले कोणालाच समजले नाही. जॅकी मागील बाजूस रक्ताच्या थारोळ्यात पडलेल्या पतिचे डोके मांडीवर घेऊन रडूं लागली. थोड्याच अवधीत गुप्तचरांनी केनेडींना मोटारींत घातले आणि कांहीं क्षणांतच त्यांची उघडी मोटार सभास्थानाऐवजीं पार्कलॅंडच्या इस्पितळाच्या आवारांत येऊन राहिली. चलच्चित्रकारानें लोकांच्या धांवपळीचे खुनाचे आणि इस्पितळाकडे वेगाने जाणाऱ्या मोटारींचें दृश्य टिपले होते.

पार्कलॅंड इस्पितळांतील आठ तज्ञ प्रे. केनेडींची प्राण-ज्योति विझू न देण्याचा प्रयत्न आटोकाट प्रयत्न करीत होते. दोन धर्मगुरु ( पाद्री ) केनेडीसाठीं प्रार्थना करीत होते. दुपारी १ वाजून ४ मिनिटे ३२ सेकंदानी केनेडींचा आत्मा शरिराविन्मुक्त होऊन अजरामर होण्यासाठीं स्वर्गाच्या दिशेने वाटचाल करूं लागला आणि प्रेसिडेंट केनेडींच्या मृत्यूची दुर्दैवी वार्ता जगाला सागण्याचे त्या पाद्रयांच्या नशिबी आले.

जगावर दुःखाची कळा पसरली. हजारो लाखो नव्हे कोट्यावधि लोकांना अध्यक्ष केनेडी यांच्या विचा-रांत आपल्या आकांक्षांचे प्रतिबिंब दिसत होते ते पार धुळीस मिळालें. कांहीं बाबतींत लोकांचे त्याच्याशीं मतभेद असले तरी आदर्श मनुष्य आणि आदर्श अध्यक्ष असें स्थान त्यांनी लोकांच्या मनांत मिळविले होते. सामान्य लोकांबद्दल त्यांच्या मनांत जिव्हाळा होता. साऱ्या जगावर दुःखाची व निराशेची जी गडद छाया दिसून आली त्यांतच केनेडींबद्दल लोकांच्या मनांत केवढा आदर होता हे दिसून येते. रस्त्यारस्त्यांतून लोक अक्षरशः रडत होते.

**प्रे. केनेडींच्या तेजस्वी जीवनपटाचे धावते समालोचन**—१९१७ सालच्या मे महिन्यांतील २९ तारखेस ब्रुकेलिन शहरीं मानवतेची अल्प कालांत महान् कार्य करण्यासाठीं जॉनच्या [ पवित्र ] पावन पदांनीं वसुंधरेला स्पर्श केला. जॉनचें बालपण श्रीमंतींत परंतु राजकीय मुत्सद्यांची चर्चा ऐकण्यांत गेले. त्यांचे प्राथ-मिक शिक्षण खाजगी शाळेत झाल्यावर वयाच्या १८ व्या वर्षीं लंडन स्कूल इकॉनॉमिक्समध्ये दाखल झाले. प्रा. लास्कींच्या हातीं शिक्षण घेऊन २३ व्या वर्षीं पदवी घेऊन ते अमेरिकेस परत आले.

**उत्तरार्ध**—१९४१ मध्यें जॉन बोट कमांडर म्हणून अमेरिकन नाविक दलात दाखल झाले, त्याच वर्षीं ते लेफ्टनंट झाले. दुसऱ्या महायुद्धाच्या काळांत सालोमन

बटाजवळील यांची कामगिरी जगाच्या इतिहासात अमर गणली गेली. १९४५ पर्यंत लेफ्टनंट म्हणून काम केल्यावर ते पत्रव्यवसायांत शिरले. इंटरनॅशनल न्यूज सर्व्हिसचे बातमीदार म्हणून १९४५ साली यूनोच्या स्थापनेच्या वेळी ते हजर होते. त्याच साली ब्रिटिश सार्वत्रिक निवडणुकची बातमीदारी त्यांनीं केली.

१९४६ सालीं वयाच्या २९ व्या वर्षी त्यांनीं राजकारणांत प्रवेश करून ज्यूनिअर चेंबर कॉमर्सतर्फे त्यां सालच्या उत्कृष्ट कार्यकर्त्यांपैकीं एक म्हणून प्रशस्ति मिळविली. १९५२ सालीं सर हेन्री लॉज यांचा पराभव करून ते सिनेटमध्ये निवडून आले. १९५३ साली त्यांचा सौंदर्यसम्राज्ञी जॅकेलीनबरोबर विवाह झाला. १९५६ पर्यंत डेमोक्रॅटिक पक्षाचे आघाडीचे कार्यकर्ते म्हणून त्यांनीं मान्यता मिळविली. १९६१ सालीं झालेल्या अध्यक्षपदाच्या निवडणुकीसाठीं डेमॉक्रेटिक पक्षाचे उमेदवार म्हणून त्यांची निवड झाली आणि रिपब्लिकन पक्षाचे उमेदवार निक्सन यांचा पराभव करून त्यांनीं २० जानेवारी १९६१ साली अमेरिकेच्या अध्यक्षपदाची सूत्रे हातीं घेतली.

**जॉन केनेडींची अध्यक्षीय कारकीर्द**—अध्यक्ष केनेडी यांच्या निवडीने ८ वर्षांनंतर डेमॉक्रेटिक पक्षाला नेतृत्व मिळाले. जॉन अमेरिकेने सर्वांत तरुण ( ४३ वर्षे ) अध्यक्ष होते. इतक्या तरुणपणी केनेडींना अमेरिकेसारख्या जगांतील एका महान राष्ट्राची राज्यसूत्रे कशी सांभाळता येतील अशी शंका सर्वत्र व्यक्त केली जात होती. परंतु लवकरच त्यांनी तिचे निरसन केले. खिस्तवासी रुझवेल्ट हे केनेडीचे आदर्श असावेत. त्यांच्या 'न्यू डील'प्रमाणें केनेडीनींहि राष्ट्राला ' न्यू फ्रॉंटियर्स 'चे ( नवीं क्षितिजे ) घोषवाक्य दिले. अध्यक्षपदावर असतांना त्यांनीं भारताला पाठिंबा देण्याचे, युरोपांत कम्युनिझमचा प्रचार थोपविण्याचे आणि बर्लिन व माल्सुकेमाय बेटांचे संरक्षणाचें धोरण स्वीकारलें. अमेरिकेने विज्ञानादि क्षेत्रांत आघाडीवर असावे असा त्यांचा कटाक्ष होता. परंतु आपल्या राष्ट्राच्या शक्तिसामर्थ्याचा उपयोग जगांत शांतता व समृद्धि निर्माण करण्यासाठी व्हावा अशी त्यांची धारणा होती. कम्युनिझमचे ते कडवे पण डोळस विरोधक होते. रशियाने क्यूबांत पुंडावा माजवितांच त्यांनी अणुयुद्धाचा गंभीर धोका पत्करून त्याला वठणीवर आणले. परंतु शांतता पुरस्काराचे धोरण सोडले नाहीं. याच धोरणांतून अण्वस्त्रबंदीचा ' मास्को करार ' जन्मला.

चीनविरोधी लढ्यात त्यांनी ताबडतोब शस्त्रपुरवठा करून भारताला ऋणी केले आहे. अध्यक्ष लिंकननंतर निग्रोविषयी सहानुभूति बाळगणारे तेच एक अध्यक्ष होते. अध्यक्ष केनेडींच्या कारकीर्दीतच अमेरिकेने अंतराळ प्रवेश केला आणि मास्को ते वॉशिंग्टन ही ऐतिहासिक ' हॉट लाईन ' सुरूं केली.

**प्रे. केनेडींची वैशिष्ट्ये**—( १ ) अमेरिकन अध्यक्षांपैकी सर्वांत तरुण अध्यक्ष. ( २ ) व्हाईट हाऊसमध्यें जाणारे पहिलेच रोमन कॅथलिक. ( ३ ) निर्भेळ आयरिश रक्तांचे अध्यक्ष. ( ४ ) उत्तम वक्ते, लेखक, सैनिक आणि अभिनयपटू. ( ५ ) निग्रोचा कैवार घेण्यात ' दुसरे लिंकन ' तर तरुणपणांत व तडफेत ' दुसरे रुझवेल्ट '

**कां मरणिं अमरता ही न खरी ?** :—विश्वाच्या या महान् शांतिदूताचा अवेळी अंत झाला. अंत कसला ! मानवांतील क्रौर्याने त्याचा बळी घेतला. पण केनेडीने ' कां मरणिं अमरता ही न खरी ! ' हे सिद्ध केले यांत संशय नाही.

---

# आश्विनी

**कु. पुष्पा जगन्नाथ जवळेकर**
पदवीपूर्व साहित्य.

**मं**द व शीतल असा वारा वहात होता. भूमातेने रुपेरी शेला पांघरला होता. दुग्धामृताने सर्व पृथ्वी न्हाऊन निघाली होती व अशा शांत वातावरणात राधाकाकू खिन्न होऊन चंद्राकडे आपली दृष्टि रोखून

चंद्राची ग शीतल छाया ।
तापविते मम काया ॥

असे गुणगुणत दूध निववीत बसल्या होत्या.

राधाकाकूंच्या या गुणगुणण्यावरून त्यांना किती व कसले दुःख झाले होते हे कोणालाच कळले नाही. प्रत्येकाच्या मनात किती गूढ अधिष्ठान पावलेले असतात हे प्रत्यक्ष त्याच्या मनाशी एकरूप झाल्याखेरीज कळत नाही. ते एक मातृहृदय होते. त्यांच्या हृदयातून वात्सल्यप्रेमाची लाट उचंबळून आली व त्यांच्या नेत्रांतून अश्रूंची धार वाहू लागली. तो प्रत्येक अश्रूबिंदू चंद्राच्या प्रकाशात मोत्याप्रमाणे चमचम करीत होता व त्या बिंदूत किती दुःखाचे डोंगर भरलेले आहेत त्याचीहि जाणीव होत होती. राधाकाकूंच्या चक्षूंसमोर गतस्मृतींचे पट उभे राहिले व त्या स्मृतींचा एक एक पट त्यांच्या लोचनासमोरून झरझर जाऊ लागला.

निशादेवीने आपला काळा बुरखा बाजूला केला होता. सूर्यनारायण पूर्वेकडून गुलाल उधळत आपल्या सोनेरी रथातून आगमन करीत होता. पुढे पुढे त्याच्या किरणांची प्रखरता वाढू लागली. साडेसातचा सुमार होता. राधाकाकूंचे दररोज पहाटे पांचला उठणारे कुटुंब अद्याप उठले नव्हते. त्यांच्यावरील निद्रादेवीचा अंमल पुरता संपला नव्हता. बरोबर ! काल क्षमाचे कार्यक्रम दोन वाजेपर्यंत होते. ते बघण्यास राधाकाकू व माधवराव गेले होते. खरेच काल क्षमा कमालीची सुंदर दिसत होती. तिचे ते डौलात मान हलवणे, ठेक्यात पाय वाजविणे व हातवारे, हावभावानुसार हालून तिला साथ देणारे तिचे ते कानातील डूल, तिच्या गोऱ्या रंगावर उठून दिसणारा तिच्या हनुवटीवरील तो काळा तीळ, हात पुढे केल्यावर तिच्या गोऱ्या हातावरील " क्षमा " असे ते हिरवेगार गोंदण, असे अलौकिक सौंदर्य पाहून राधाकाकूंना तिला कोठे ठेवू व कोठे नाही असे झाले होते. त्यांचे ते लाडके एकुलते एक माणिक होते. क्षमा इतकी गोड होती. ती अवघी ५ वर्षांची होती. राधाकाकू तिला म्हणत ' क्षमा तू खरोखरच ह्या भूमातेप्रमाणे क्षमाशील आहेस. तुझे नाव तू सार्थक करशील. ' त्यावेळी आपल्या बालिशवृत्तीला साजेसे हावभाव करून क्षमा ' मी माझे नाव सार्थक, करीन हं !' असे ठसकेबाजपणाने म्हणे त्यावेळी तिच्या त्या मोहक डोळ्यातील चमक पाहून कोणालाहि मोह पडला असता. त्याना आपला सर्व आनंद क्षमेत दिसे. त्या चिमुकल्या क्षमेपुढे त्याना सर्व जग तुच्छ वाटे व क्षणभर त्या तिच्यातच रमून जात. ती जरा दृष्टिआड झाली किंवा शाळेत गेली की त्याना करमत नसे. सर्व जग त्याना शून्यवत् भासे.

माधवराव क्षमेला नेहमी आपल्याबरोबर बाहेर नेत. त्यांनी आज क्षमेला मंडईत नेले. ते आज ऑफिसला सुट्टी असल्याने उशिरा उठले होते. सर्व आटोपून क्षमेसह मंडईत गेले पण हाय !.........

त्यांच्या दैवातले सुख संपले. कर्म दीर्घकाल कधी सुखाचा उपभोग घेऊं देते का ? ' दैव देते पण कर्म नेते. ' इतक्या नवसाने झालेली मुलगी कशी कोण जाणे, एक सुंदर पक्षी दिसला व त्या पक्षाला पकडण्यासाठी, माधवराव भाजी घेण्यात गुंग असताना ती निघून

गेली. त्यांनी आसपास तिचा बराच शोध केला पण व्यर्थ !..........

राधाकाकूंना तर ही बातमी ऐकून त्यांच्या मातृहृदयाला धक्काच बसला. त्या आकांत करण्याऐवजी काल क्षमेचा जो गोड चेहरा दिसत होता तोच त्यांच्या चक्षूंसमोर तरळूं लागला. क्षमा ही मला आतां कोठेहि दृष्टिस पडणार नाही. क्षमा मला क्षमा कर असें बडबडूं लागल्या. माधवरावांनी पोलिसात वर्दी दिली. सगळीकडे चौकशी केली तरी देखील ती सापडली नाही. माधवरावांना व राधाकाकूंना कांही सुचेना. ते हृदय एका मातेचे होते. मातृहृदयाची साथ कोणीहि करूं शकणार नाहीं. असे हे राधाकाकूंचे मातृहृदय क्षमेसाठी वेडेपिसे झाले. त्यांना काम सुचेना, त्यांनी जेवण वर्ज्य केले. फक्त क्षमेच्या स्मृतींची समाधी लावणे एवढेच एकमेव कार्य त्या दिवसरात्र करीत. नेहमी शीतल चांदण्यांत गप्पा मारणाऱ्या क्वचित्प्रसंगी चांदणी भोजन करणाऱ्या त्या कुटुंबाला चंद्राची शीतलता तापदायक वाटून ती असहाय्य होऊ लागली. त्यांच्या कुटुंबातील सुखाचा ठेवा संपला. त्यांचे मनोरथांचे मनोरे ढासळले. राधाकाकू तिला फार सुंदर नवरा करून द्यायचा, खूप शिकवायचे अशा आकांक्षा करीत असत. त्या सर्व फोल ठरल्या.

क्षमा आपले वडिल दिसेनासे झाले म्हणून रडत चाललेली असतांना त्या रस्त्यावरून जाणाऱ्या शेतकऱ्याने तिला पाहिले व त्याने तिला तिचे नांव विचारले. तिने गोड व मृदु: आवाजात आपले नाव ' क्षमा ' असल्याचे सांगितले. त्या शेतकऱ्याला मूलबाळ नव्हते. आपल्याला वाने हे गोड कन्यारत्न हवाली केले म्हणून आनंदाने तो तिचा सांभाळ करू लागला. ती सुखाने वाढत होती. पण राधाकाकू व माधवराव दिवसेदिवस अत्यंत कष्टी होऊ लागले होते. ती नदीत तर पडली नसेल, चोरांनी तर पळवली नसेल. अशा नानाविध विचारांचे कल्लोळ राधाकाकूंच्या डोक्यात माजत असे. त्या शेतकऱ्याने क्षमेला आपल्या खेड्याजवळील शहरात खेडेगावी शिक्षणाची सोय नसल्याने शिक्षणासाठी ठेवायचे ठरविले. त्याने तिला त्या शहराच्या ठिकाणी पाठविले. ती हुशार असल्याने तिला अनेक बक्षिसे मिळत व ती त्या बक्षिसांची रक्कम खेडेगावी आपल्या सांभाळ केलेल्या वडिलाना पाठवीत असे. शेतकऱ्याला तिची ती हुशारी पाहून फार आनंद होई व कौतुक वाटे.

क्षमाचे आईवडिल तिच्या स्मृतींचे स्मरण करून आपले मन रमवीत. ते कंठायचे म्हणून आपले जीवन कंठीत. राधाकाकूंच्या शेजारी एक बिऱ्हाड रहात होते त्या बिऱ्हाडांतील एक मुलगी क्षमा ज्या शाळेत जात असे त्याच शाळेत जात असे. तिचे नांव क्षितिजा होते. क्षितिजा व क्षमा यांची फारच मैत्री होती. क्षितिजा ही स्वभावानें फार चांगली होती. राधाकाकूंना जेव्हा क्षमेची आठवण होई तेव्हा त्या क्षितिजाला आपल्या घरीं बोलावीत. तिला खाऊं देत. क्षितिजा क्षमेप्रमाणेच फार गोड मुलगी होती. क्षितिजाला क्षमा फार आवडे.

क्षितिजाची खूप दिवसांची अशी इच्छा होती कीं क्षमाला बोर्डिंगच्या बाईंना विचारून आपल्या घरी दोन दिवस सुट्टींत राहावयास न्यावे. ह्या तिच्या आशावृक्षाला आज फळ आले. आज " कोजागिरी पौर्णिमा " होती. क्षितिजा घरांत सर्वांत मोठी होती. तिची आज " आश्विनी " होती. ही आश्विनी ज्या कुटुंबांतील पहिले अपत्य असते ते मुलगा असो वा मुलगी असो, त्याची आश्विनी साजरी करतात. चंद्र ज्याप्रमाणे कले-कलेने वाढत जातो त्याप्रमाणे आपले अपत्यहि दीर्घायुष्यी होऊन त्याचा विकास होत जावा असा उद्देश असतो. पूर्वीं कोजागिरी पौर्णिमेला ओवाळतांना कापूस दूर्वा घेत असत. याचा हेतु असा कीं आपले जे अपत्य असेल ते कापसाप्रमाणे दीर्घायुष्यी व्हावे व दुर्वांप्रमाणेच त्याचाही वंशविस्तार वाढावा. परंतु आजकाल ओवाळतांना सोन्यामोत्याचे दागिने वापरतात. अशा या आश्विनीच्या दिवशी क्षितिजाच्या आईने क्षमेला आपल्या घरी जेवावयास बोलावण्याची परवानगी दिली. क्षितिजाने क्षमेला आपल्या घरीं बोलाविले व त्या दोघी मैत्रिणींनी दूधखिरीचे भोजन केले. क्षितिजाच्या आईने प्रथम चंद्राला औक्षण केले. नंतर दोघींना आटविलेले दूध प्यावयास दिले. ज्याप्रमाणे अथांग निळ्या सागरांतून पांढरी शिडे असलेली नाव विहार करावी तद्वत् निळ्या आकाशात आपल्या तेजाने विलसत असलेले चंद्रबिंब पाहून क्षमाला कमालीचा आनंद झाला. शेतकऱ्याच्या घरी तिने हा सोहळा कधीच अनुभवलेला नव्हता म्हणून तिचा आनंद द्विगुणितच झाला.

अशा या आनंददायक प्रसंगी राधाकाकूंना आपल्या क्षमेची आठवण तीव्रतेने जाणवत होती. त्या अशा गतस्मृतींचा पट आपल्या नजरेसमोरून चालवीत असतांना त्यांच्या कानी 'मावशी !' 'मावशी !' अशी प्रेमळ हांक पडली. ती हांक क्षितिजाची होती. मावशी या तीन अक्षरांच्या उच्चराने राधाकाकू आपल्या विचारतंद्रीतून जाग्या झाल्या. त्यांनी क्षितिजाला वर येण्यास सांगितले. क्षितिज व क्षमा दोघी बालिका आनंदाने उड्या मारीत राधाकाकूंकडे गेल्या. ह्या आनंदी बालिकांना पाहून राधाकाकूंना आपली क्षमाच ठुमकत आल्याचा भास झाला. त्यांनी त्या दोघीना आनंदानें कुरवाळले. नंतर क्षितिजाबरोबर असलेली मुलगी कोण आहे म्हणून त्यांनी विचारले. क्षितीजाने आपली मैत्रीण असल्याचें सांगितले. नंतर राधाकाकूंनी त्यांना बसण्यास सतरंजी दिली व तुम्ही माझ्या मुलीप्रमाणेच आहात. आज कोजगिरी पौर्णिमा आहे. तर मी तुम्हाला ओवाळते असें सांगितले, नंतर राधाकाकूंनी निरांजन लावले. चंद्राला औक्षण केले. क्षणभर त्यांना आपली क्षमाच आल्याचा आनंद झाला. त्यांनी त्या दोन बालिकांना ओवाळले. नंतर त्या दोघींना त्यांनी आटविलेले दूध दिले व चंद्राच्या प्रकाशांत बसून सेवन करण्यास सांगितले. त्यांना ती मुलगी, तिच्या हनुवटीवरील तीळ पाहून आपली क्षमा असेल कीं काय असे वाटले. पण त्यांनी विचार केला. बायकांचे मन फार वेडे असते. आपल्या क्षमेप्रमाणे अनेक मुली असतील.

पण दूध पितांना क्षमेच्या हातावरील " क्षमा " असे हिरवेगार गोंदण, तसेच तिच्या हनुवटीवरील तो काळा तीळ व तिचे सर्व हावभाव पाहून ती क्षमाच असल्याचे त्यांना पटले. त्यांनी तिला ' क्षमा ' म्हणून सद्गदित कंठानें हांक मारली व तिला घट्ट मिठी मारली. राधाकाकूंचे गमावलेले पाडस त्यांना सापडले.

———


**श्रीकृष्ण रेस्टॉरंट,** बारामती

**स्थापना : १९३९**

**उपहारगृहाच्या धंद्यांतील २५ वर्षे पूर्ण**

**उपहाराची व राहण्याची उत्तम सोय.**

# प्रेमकवि तांबे

कु. रत्नप्रभा बेलसरे
प्रथम वर्ष साहित्य.

तांबे हे सौंदर्यवादी कवि होते. अखेरपर्यंत ते सौंदर्योपासकच राहिले. त्यांचे प्रेमाचे तत्वज्ञान म्हणजे आधी प्रेम व नंतर सौंदर्यावलोकन असे होते. तांबे यांच्या प्रेमगीतांचे स्फूर्तिस्थान त्यांची पत्नी होती. वैवाहिक जीवनांत प्रेमाच्या बाबतीत त्यांना सफलता प्राप्त झालेली होती. विवाहोत्तर जीवनात ते पूर्णपणे सुखी होते. हे त्यांच्या पत्नीविषयी लिहिलेल्या प्रेमगीतांवरून दिसून येईल. त्यांच्या सफल प्रेमाच्या आयुष्यांत त्यांना जे अनुभव आले त्याचेच पडसाद त्यांच्या प्रेमगीतांत उमटले आहेत. पत्नीबद्दल नितांत प्रेम, आदर त्यांना वाटत असे. पत्नीच्या गुणांवर लुब्ध झालेले तांबे

" कान्तेने पहिल्या रसेंचि हृदया या टाकिलें व्यापुनि " म्हणतात. पत्नीमुळेच जीवन सुफलित झाले, जीवनाचे सार्थक झाले असे ते मोठ्या समाधानाने म्हणतांना दिसतात.

" जन्मजन्मिचे क्षुधा व्यथित मन .
लाभुनि तुज आकंठचि धाले ।
गे सखि जीवन सुफलित झाले "

या ओळीवरून हेच दिसून येते.

विवाहापूर्वीं लिहिलेल्या प्रेमगीतांत आतिउत्तान शृंगार प्रणयाचा खळखळाट होता. म्हणून ती रचना त्यांनी स्वहस्तेच नष्ट करून टाकली. विवाहापूर्वींहि त्यांनी लिहिलेल्या प्रेमकविता ह्या सफल प्रीतीच रंगविणाऱ्या असतील हें त्या काळांतील उपलब्ध असलेल्या या एका कवितेवरून वाटते;

" वेळूंत नादसम नित्य सखे हृदयांत ।
प्राणशी विहरशी उगम सुखाचा आंत । "

या त्यांच्या प्रेमगीतांचे वैशिष्ट्य म्हणजे त्यांत प्रणयाचा धबाधबा असूनहि शृंगारिकतेचा किंवा अश्लीलतेचा लवलेशहि आढळत नाहीं. ओतप्रोत प्रणय असूनहि वासनेचा गंध दिसत नाही. त्यांचे काव्य सौंदर्याने कांठोकांठ भरलेले असले तरी त्यांत शरीरनिष्ठता नाही. अलंकारांचा हव्यास त्यांना नव्हता. त्यांच्या प्रेमाचे स्वरूप सोज्वळ आहे. या शुद्ध प्रेमाची उत्पत्ति अंतःकरणांत होऊन अंतःकरणालाच त्याची ओळख पटते. या मंगल प्रेमांतच त्यांना सौंदर्य दिसते. पत्नीवरील ह्या शुद्ध प्रेमामुळेच ते,

" जन म्हणती सांवळी तुज सगळे
करुणाई बिचारे ते अंधळे ! "

म्हणतात. त्यांच्या जीवनांत त्यांच्या पत्नीला एक उच्च स्थान होते. त्यांच्या प्रेमगीतांचे स्फूर्तिस्थान त्यांची पत्नीच होती, या प्रेमळ पत्नीच्या सहवासांत त्यांचे मन म्हातारपणीही तरुणच राहिल्यास नवल नाही. शरीराने वृद्धत्व आले असले तरी मनाने ते चिरतरुण होते याचा प्रत्यय प्रौढवयातहि त्यांनी लिहिलेल्या प्रणयगीतांवरून दिसून येतो.

प्रेमाच्या सूक्ष्म भावना, विविध छटा त्यात योग्य रंग भरून तांब्यांनी कवितेत बोलक्या केलेल्या आहेत.

प्रेमाच्या बाबतींत ते तृप्त असल्याने त्यांच्या प्रेमकाव्याची शोकान्त परिणिति, गडकरी किंवा माधव ज्यूलियनाप्रमाणे झाली नाही. निराशेचा, पराजयाचा किंवा असमाधानाचा सूर त्यांच्या काव्यांत दिसत नाही. जो कवि, चित्रकार किंवा कोणताहि कलाकार स्वतःच्या जीवनात प्रेमपूर्ति प्राप्त झालेला असतो तोच इतरांच्या प्रेमाचे प्रणयप्रसंग, प्रेमाच्या नाजूक भावना, सूक्ष्म छटा जीवंतपणे, यशस्वितेने काव्यात अगर चित्रांत रेखाटू शकतो. स्वतःच्या जीवनांत तो सफल असल्याने इतरांच्या जीवनांत येणाऱ्या सफल व विफल प्रीतीचे भावनोत्कट चित्र सारख्याच तन्मयतेने काव्यांत तो काढू शकतो. या उलट जीवनांत प्रेमाच्या बाबतीत अपयश पदरी पडलेल्या कवींच्या प्रज्ञेतून सफल प्रेमाच्या कविता लिहिल्या जात नाहीत. त्यांचा स्वानुभव विफल प्रेमाचा असल्याने इतर जनांच्या सफल प्रीतीचा त्यांना हेवा वाटतो. प्रेमाची ती सफलता त्यांना बोचक होते. त्यामुळे प्रेमांतील विविध प्रसंगांचे समतोल चित्रण त्यांना करता येत नाही. सफल प्रीतीतील नाजुक छटा, सूक्ष्म भावाविष्कार असलेले प्रसंग टिपण्यास त्यांची दृष्टि असमर्थ ठरते. गडकरी किंवा माधव ज्यूलियन यांच्या कवितांवरून हे आपणास दिसून येईल.

तांबे यांच्या काव्यात सफल व विफल प्रीतीचा समतोलपणा आढळून येतो. दुसऱ्याच्या प्रेमभावनेचे चित्रण अगदी समर्पक शब्दांत, हुबेहूब त्यांनी केलेले आहे. त्यांच्या प्रेमविषयक गीतांच्या नायिका ह्या वेगवेगळ्या परिस्थितींतील, भिन्न वयांच्या भिन्न मनोवृत्ती असलेल्या आहेत. त्यात ७–८ वर्षांच्या अबोध कुमारिकेपासून तर अगदी वृद्धावस्थेपर्यंत पोहोचलेले स्त्री-पुरुष आहेत. अगदी अर्भकावस्थेत असलेल्या मुलीला ते; " कुणि असेल ग, असेल बोबडकांदा,

खुदूखुदू हंसत एखादा "

म्हणून लाडिकपणे म्हणतात, तर ८–१० वर्षांच्या निष्पाप मुलीला " तर मग गट्टी कोणाशी ?", असे भावाच्या रूपाने खट्याळपणे विचारतात. समज प्राप्त झाल्यानंतर यौवनांत पदार्पण करणाऱ्या तरुणींची प्रेमचित्रे त्यांनी पुष्कळच रेखाटली आहेत. त्यांच्या काव्यांत " घट ", ह्या वस्तूला एक अलौकिक स्थान आहे. प्रणयोत्सुक नायिका व घट यांत फार निकटचा संबंध आहे. घट रिकामा ठेवून वेळूच्या जाळींतून निघालेल्या शीळेसरली अदृश्य होणारी तरुणी, घट भरताना प्रियकराची चाहूल घेणारी युवती; साईहून मऊ बोटांनी घटांत झुरुमरू धार काढणारी यौवना; यावरून त्यांच्या प्रेमकाव्यांतील अनेक नायिकांचे घटांशी सख्य असलेले दिसते.

प्रणयाने व्याकुळ झालेल्या तरुणीला ते " दृष्ट हिला लागली ' म्हणतात. तिची ही प्रेमाकुल अवस्था लक्षात न येऊन तिच्या प्रकृतिस्वास्थ्यासाठीं दुसरेच भलभलते उपाय योजणाऱ्या प्रौढ बायकांना ते ' अनुभव घेऊन सारे वाया ' असा मार्मिक टोमणाही मारतात. प्रियकराच्या कटाक्षामुळे बेचैन होऊन काम नीट होत नाही म्हणून लटक्या रागाचा अविर्भाव करणारी तरुणी " डोळे हे जुल्मी गडे रोखुनि मज पाहूं नका ।' अशी तक्रार करताना त्यांनी रंगविली आहे. तर प्रणयाच्या साम्राज्यांत प्रथमच पाऊल टाकणाऱ्या रजपूत रमणीच्या हृदयाची धडधड त्यानी ' राजकन्या व तिची दासी यांच्या संवादातून रसिकांना ऐकविली आहे. त्यांची रजपूत कंवराणी रात्री पहारा चुकवून फेरीवाल्याचा वेष धारण केलेल्या राजपुत्रासाठी बाहेर पडण्याचा प्रयत्न करते. प्रियकराच्या सहवासासाठी राजवैभवाचा त्याग करण्यास तयार झालेली रजपूत बाला " मुशफिर आम्ही " ह्या कवितेत त्यानी उत्कृष्टपणे रंगविली आहे. याप्रमाणे तरुण-मनांतील यौवनसुलभ प्रेमभावना समर्पक शब्दांत, कौशल्याने त्यांनी रेखाटल्या आहेत.

तरुणांच्या प्रमाणेच प्रौढांच्याही मनातील प्रेमभावना त्यानी तितक्याच उत्कटतेने, तितक्याच हळुवारपणे उलगडलेल्या आहेत. पतीचा रणांगणावरील पराक्रम पाहून हर्षित झालेली स्त्री, " बिजली जशी चमके स्वारी " ह्या शब्दांत प्रेम व्यक्त करतांना आढळते. तर लहानपणींचा प्रियकर कालांतराने ' वाटेचा वाटसरू ' होऊन घरी आला असतांना त्याला पूर्वस्मृति उजळून आता माझ्या भरल्या संसारात माती कालवूं नको असे एक मध्यमवयीन नारी म्हणते, तर पूर्वी प्रेमाचा अव्हेर करून निघून गेलेला प्रियकर कांहीं वर्षांनीं पुन्हां दारी आला असतांना त्या स्त्रीच्या मनांत उठणाऱ्या भावना तरंगाचे यथार्थ चित्रण त्यांनी " आज फिरुनि कां दारि उगवला, केली न कां दुजी नारी ?" ह्या रोखठोक शब्दात केले आहे.

तरुण विधवाच्या प्रेमभावनेला त्यानी कोमल हस्तस्पर्शाने आपल्या काव्यात जीवंत स्वरूप दिलेले आहे. विधवाबद्दल त्यांना वाटणारी सहानुभूति, कळकळ शब्दाशब्दातून प्रतीत करण्यास त्यांची लेखणी समर्थ ठरली आहे.

पतीच्या मृत्यूनंतर स्वप्नात त्याचा सहवास लाभून आनंदित होणारी; झोपेंत हसणारी आणि जागृति-अवस्था नको म्हणणारी विधवा ' विधवेचे स्वप्न ' ह्या आपल्या कवितेंत त्यांनी चित्रित केली आहे. पतित, दीन अशा विधवेला पाहून कळवळा येणारा सुधारक व त्याजवर प्रेम करणारी ती विधवा, तो लग्नास तयार असतानाही आपल्यामुळे त्याच्या संसाराला कलंक नको म्हणून त्याचे पत्नीपण स्वीकारण्याऐवजी दासीपण स्वीकारण्यात धन्यता मानते. ह्या विधवेचे हे विचार " हिंदु विधवेचे मन " ह्या कवितेत त्यांनी अत्यंत मार्मिक शब्दांत ध्यक्त केले आहेत. समाजांतील छळास अन्यायाच्या वागणुकीस व मानहानीच्या जीवनांस कंटाळलेली विधवा तळमळून——

" मी न मनुज कां ? काय न मज मन ?
नच विकार कां ? "

म्हणून समाजाला विचारीत आहे. ( चरणाखालील हाय मीच रज. ) पतीच्या मृत्यूची विस्मृति झाल्यानंतर परपुरुषाबद्दल मनांत प्रेमवासना निर्माण झाली असता, आपल्या मनांतील ही वासना पापी आहे म्हणून त्या पुरुषाचा विचार मनातून झटकून काढण्याचा प्रयत्न करणारी विधवा व तिच्या अंतरातले भाव अत्यंत हृदयस्पर्शी शब्दात तांब्यानी कवितेत रेखाटले आहेत. मनातल्या मनांत झुरणारी, निशब्दतेने प्रेमभावनेला बंध घालण्यास धडपड करणारी व अखेर झिजून झिजून मृत्यूला जवळ करणारी ही विधवा स्वतः जरी निःशब्द असली तरी रसिकांच्या मनाला बोलके करायास लावते. समाजांतील परंपरागत रुढि, संकेत यामुळे दोन प्रेमी जीवांची निशब्दतेनें चाललेली तळमळ वाचकांना जाणवल्याशिवाय राहात नाही. विधवांबद्दल तांब्यांना वाटणाऱ्या सहानभूतितूनच पुढे त्यांनी समाजाची बंधने झुगारून; रुढी, रीतिरिवाजांना तिलांजली देणारी बंडखोर, धैर्यशील वृत्तीची विधवा निर्माण केली आणि तिने सरळ छातीठोकपणे

"कुणि काही म्हणा; कुणि करा हवे तें आतां;
ते कांत यापुढे मी तयांची कांता "

म्हणून बजाबले आहे. या विविध विधवा गीतांवरून तांबे विधवांच्या भावनांशी किती समरस झाले होते हे दिसून येते.

तांब्यांनी स्त्रियांच्या प्रेमभावनेप्रमाणेच पुरुषांच्याहि प्रेमभावनांना आपल्या काव्यांत स्थान दिले आहे. ' पन्नास वर्षांनंतर ' आपल्या प्रेयसीची हुबेहूब प्रतिकृति अशी तिची नात पाहून त्या प्रियकराच्या मनात पूर्वीच्या प्रेमस्मृति इतक्या उचंबळल्या की त्या मुलीला तो, " जाई निदर्ये ! जाईल जीव हा माझा " म्हणतो. ( पन्नास वर्षांनंतर ) मूकपणे विधवेवर प्रेम करणारा तो सुधारक, ती आजारी असतांना समाचाराला जाई व कवि म्हणतो की, " नयनि त्याच्या काळजीचा कधी भास मला झाला ।"

यानंतर त्या विधवेच्या मरणानंतर तो एकाएकी अदृश्य झाला. इ. प्रसंग टिपून कवीने त्याच्या भावनाचे योग्य वर्णन केलेले आहे. त्या सुधारकाच्या मनांतील भावना कवीने इतक्या उत्कृष्टपणे चितारल्या आहेत कीं, कोणाहि सहृदय रसिकाचे चित्त त्या सहज वेधून घेतील. रसिक ही कविता वाचतांना साहजिकच तद्रूप झाल्यास नवल नाही. ( निःशब्द आत्मयज्ञ. ) प्रेयसीच्या दारावरून थबकत जातांना त्या प्रौढ प्रियकराच्या मनांत येणारे विचार तांब्यांनी ' वायों, खुणव तीस ' ह्या कवितेत सुंदर रीतीने प्रगट केले आहेत. पूर्वीच्या प्रेयसीला बघण्यास आतुर होऊन तिच्या दाराशी घोटाळणारा, आशाळभूतपणे ती बाहेर येऊन डोकावण्याची वाट बघणारा तो प्रियकर वाऱ्याला तिला खुणावण्यास विनवीत आहे. दोन मने पूर्णपणे जुळल्यावर प्रेमाचे अद्वैत निर्माण होऊन एका व्यक्तीला





काही दुःख झाले तर दुसऱ्या व्यक्तीवर त्याचा परिणाम होतो व हे कसे होते होते हे न कळल्यामुळे गोंधळलेला प्रियकर, " कुणि कोडे माझे उकलिल कां ? " म्हणून विचारतो. तांब्यांच्या ह्या प्रेमाचे अद्वैत

" मद्याचा मी प्यालों प्याला
सखे तयाचा मद तुज आला "

ह्या त्यांच्या रचनेवरून स्पष्ट दिसते.

याप्रमाणे तांब्याच्या काव्यांतील विविध प्रेमप्रकारांचे हे ओझरते दर्शन आहे. त्यांच्या वेळची परिस्थिति लक्षांत घेतली असतां विवाहपूर्व प्रेमाला अवसर नव्हता. सारे प्रेम विवाहोत्तर असे होते. प्रेमभावना व्यक्त करण्यास तत्कालीन समाजस्थिति अनुकूल नव्हती. तरीहि सामाजिक रीतीरिवाज, परंपरागत रुढी, संकेत, बंधने झुगारून त्यांनी आपल्या काव्यात काठोकाठ प्रेम भरले. उघडपणे मनातील प्रेमभावना शब्दांनी मूर्त करून जनांपुढे मांडल्या. त्यांचे हे धैर्य खरोखर वाखाणण्यासारखेच आहे. ' प्रेमाचे शाहीर ' म्हणून ओळखल्या जाणाऱ्या गडकऱ्यांच्या प्रेमकाव्यापेक्षा तांबे यांची प्रेमकाव्ये त्यातील विविधता, नाविन्य, नादपूर्णता यामुळे सरस वाटतात. ' प्रेम ' ह्या विषयालाच त्यांच्या जीवनात एक अनन्यसाधारण स्थान होते. रा. अ. काळेले ह्यांच्या शब्दांत सांगावयाचे झाल्यास " प्रिया हेच सर्वस्व " त्यांचे होते. तांबे स्वतःच प्रेमाबद्दल म्हणतात " I have succeeded in delivering consistent message of love......all the poems have something to tell you about the message. "

" मला आळशा पुरे प्रिया
आणि ओठावरली मुरली ।"

——

स्वस्त आणि खात्रीशीर

तयार कपडे

मच्छरदाण्या

होजिअरीसाठी

.... मोता स्टोअर्स ....

बारामती. (पुणें)

# मी मॅट्रिक नापास होतो

रामलिंग बोराटे,
प्रथमवर्ष विज्ञान.

"अरे शाम्या ! पेपर कसे काय गेलेत ?" मी.

कसे काय गेले म्हणजे काय ? जसे आले तसे गेले" श्याम.

"अहो शहाणे ? इकडे या बघूं ! त्या गणिताचे उत्तर काय आलय ?"

अरे ! ती मोकळी जागा फारच अवघड होती नाही काय ?"

"अग मालती ! तो त्रिकोण काढण्याचे कृत्य मला जमलंच नाही" शीला.

"ते जाऊं दे ग ! तो त्रिकोण काढण्यांत तर तुझा हातखंडा आहे ना !" मालती.

"अग वासंती ! तो इंग्लिशचा प्रश्न काय ग सोपा होता. मी तर बाई सरांनी सांगितल्याप्रमाणे त्याचं उत्तर लिहीलंय !"

काय या कार्ट्यांना म्हणावं, त्यांना अक्कलच नाही असे मला वाटते. काय त्यांच बोलणे, कूपांतील मडुंकाप्रमाणे हे हे बृहस्पतीचे अवतार अजूनहि परीक्षेच्या कूपांत परत परत बुचकळ्या मारीत आहेत. शिमगा गेला तरी कवित्व मागे राहतं त्या म्हणीप्रमाणे. मी मात्र जू काढल्यावर बैल जसा मोकाट सुटतो किंवा लग्नकार्य उरकून गेल्यावर घरांतील माणसे जशी सुस्कारे टाकतात तसा हुश् हुश् करीत होतो. १-२ दिवसांत जसा मांडव काढून टाकून सामान सुमान पोचविले जाते अगदी त्याप्रमाणे मी पुस्तकांची विल्हेवाट लावली.

नवीन लग्न होऊन घरी परत आलेल्या वधूवरांना पाहण्यासाठीं शेजारीपाजारी जशी आतुरतेने वाट पाहतात किंवा आपलं प्रिय माणूस रेल्वेने येणार असल्यावर जसे आतुरतेने आपण रेल्वेचे एकूण एक डबे न्याहाळतो. अगदी त्याप्रमाणे २५ मेला मी प्रत्येक वर्तमान पत्र न्याहाळत होतो. पण "मराठ्यांत" काय निकाल नव्हता, मग 'समाचार' चाळला. त्यांत निकाल होता परंतु आमचा निकाल नव्हता. जणु काही "समाचाराने" आमचाच निकाल लावून अप्रत्यक्ष रीतीने समाचार घेतला होता. झालं. गुजराचा बन्न, मारवाड्याचा हिरालाल, सोनाराचा छगन, देशपांड्याची आशा, आणि माझी जिवलग मैत्रिण हेमा पास झाल्या आणि आम्ही मात्र आपटी खाल्ली.

काय मुद्रक तरी असतात, कारण अंकगणिताचा आणि त्यांचा छत्तीसचा आकडा असावा असे वाटते. माझ्या वरचे पांच आणि खालचे पांच एवढे नंबर मात्र ओळीने छापले होते. फक्त माझा नंबर तेवढा नव्हता. त्यामुळे माझा खरोखर हिरमोड झाला. येणार ! येणार !! येणार !!! म्हणून गाजलेल्या चित्रपटाचे जसें तीन तेरा उडतात तसे आमचे नऊ बारा उडाले होते.

"पिंजऱ्यामध्ये व्याघ्र सांपडे, बायका मुले मारती खडे !" अशी आमची अवस्था. पोलिसांनी चालविलेल्या आरोपीवर जशा सर्वांच्या नजरा खिळतात आणि मग त्यांची बेबंद जीभ लगाम नसलेल्या घोड्याप्रमाणे धावू लागते. अगदी त्याचप्रमाणे आमचे घर, वाडा, आळी या सर्वांच्या नजरा नापास झालेल्या आरोपीवर खिळून गेल्या होत्या. पण प्रेमाने नव्हे बरं का ?

ती लिंबाच्या झाडाखालची शाळू अद्यापपर्यंत माझ्याशी कधी बोलली नव्हती. पण त्या दिवशी मुद्दाम तिने मला हाक मारून परीक्षेच्या निकालाबद्दल विचारून माझ्या अंतःकरणाला चिमटा घेतला. शंभुराव आणि सहस्त्रबुद्धे यांनीसुद्धा वरकरणी चौकशी केली. त्यादिवशी माझा चेहरा मात्र रविवार सकाळसारखा (परगोलॅक्स डे) झाला. मनाला वाटले ही परीक्षा म्हणजे साडेसाती आहे.आम्ही मरमरेतो अभ्यास करावा आणि त्याचे फळ आम्हास न मिळावे पण बाकीच्या





बाजारबुणग्यांनी मात्र रिझल्टबद्दल जिव्हाळा दाखवावा याचे कोडे मला काही केल्या उलगडेना.

शेजारच्या बगाराम शिंप्याने तर अगदी यावर कळसच केला. तो 'इनफंडी'त ३ वेळा नापास झाला होता. पण जात शिंप्याची. टाक्यागणीस बुद्धी. सर्वांच्या चौकशीने माझ्या डोक्यावरील केस न्हाव्याच्या मशीनच्या सहाय्याशिवाय निघाले.

शेवटी जीव द्यावयाचा ठरवून मी बाहेर पडलो. नाना तऱ्हेच्या 'प्रेमभंगी' तरुणतरुणींची उदाहरणे माझ्या डोळ्यापुढे होती. प्रथम रेल्वे रूळ, नदीतील डोह, गळफास, पुलावरून उडी, एनड्रीन इ. गोष्टी चित्रपटाप्रमाणे माझ्या डोळ्यासमोरून सरकू लागल्या आणि त्या त्वेषाच्या भरात मी पुलावर देखील जाऊन उभा राहिलो. परंतु दुर्दैव एवढंच की त्यावेळी नदीला पाणीच नव्हते. मग रेल्वेखाली जीव द्यावा म्हणून रुळावर आडवा पडलो. गाडीची वेळ होऊन गेली तरी गाडी येईना. पोटात कावळे कोकू लागले. २ तास झाले तरी गाडी येईना. शेवटी उठलो व चौकशी केली. तेव्हा कळलं की गाडी ७-४५ तास लेट आहे. एकदम लॉर्ड क्लाइव्हची आठवण झाली. त्याने दोनदा आत्महत्येचा प्रयत्न केला पण फसला. आपल्याही आयुष्यात असे काही होणार आहे असे मनाला उगीचच वाटले !!!

उपवर वधूचे बाप जसे मुली घेवून लोकाचे उंबरे झिजवितात त्याप्रमाणे आम्ही बोर्डाचे उंबरठे झिजवूं लागलो. परीक्षा आली आणि गेली. पेपर्स लिहिले. गळाला मासा लागण्याची वाट पहात बसल्याप्रमाणे मी निकालाची वाट पहात बसलो. पण न पटणाऱ्या वधूसारखी माझी अवस्था झाली. संपादक आणि मुद्रकांनी आमच्याविरुद्ध संप पुकारला. आता तर आमच्या हितशत्रूंना चेव चढला.

"काय रामभाऊ ! रामाने चौदा वर्षे वनवास काढला, तुमच्याहि तितक्याच वाऱ्या होऊ देत !"

"रामभाऊ ! पायां अगदी पक्का होऊ द्या, नाहीं तर पानशेत व्हावयाचं !"

"रामभाऊ अरे तू तर आता बोर्डाचा लाईफ मेंबर होणार आहे !" असे मी ऐकतो.

"हे पहा ! आम्ही पाठच्या भावाप्रमाणे तुम्हाला सांगतो. तुमच्या मागील ४२ पिढ्यांत एकहि जण मॅट्रिक पास झाला नाही. तेव्हा तुम्ही आता हे सोडून द्या."

"अग बाई ! आपल्या रामभाऊंची ही आषाढी कार्तिकी केव्हां संपणार ग ?"

असे शेलके शेलके वाग्बाण माझ्या हृदयाला छेदून जात होते. या प्रत्येकाची अंडीपिल्ली मला माहित होती. गोविंदरावांच्या चिरंजीवांना ९ वीतून परत ८ वीत बसविण्यांत आले होते. चिमणरावाची चंपी चवथीच्या पुढची पायरी चढूं शकत नव्हती आणि तो सोनाराचा छगन, त्याला तर पाचवीच्या परीक्षेत एक पत्र देवून घरी पाठविण्यांत आले होते. कां तर, बेट्याने चक्क सुपरवायझरच्या डोळ्यात धूळ फेकली होती. पुस्तक समोर ठेवूनच पेपर लिहिण्याला सुरुवात केली होती. पण काय करतां ! आपलंच धड नव्हतं !

शेवटी जीवाचे नांव ठेवून पुनः एकदा 'चान्स' घेतला. निसर्गनियमाप्रमाणे परीक्षेचा दिवस दत्त म्हणून पुढे उभा राहिला. आम्ही स्टेशनवर गेलो. "भोंगा" घेतला. आणि आश्चर्य असे की भोंग्यामध्ये आमची पिपाणी वाजली होती. आम्ही पास झालो होतो. १२४३९ नंबर अगदी डौलाने चमकत होता. आम्ही वाटेतच "सातारी कंदा पेढे" घेतले. शेजारपाजाऱ्यांना आणि हितशत्रूंना नेवून दिले. आणि मग त्याना सुनवायला सुरुवात केली.

इतक्यांत झाडबुक्याची कैकेयी तेथे हजर झाली. तिने मला माझा नंबर तांबड्या शाईने अधोरेखित करून दाखविला. मी तिला यावर पेढे देऊ लागलो. तेव्हां ती कसे म्हणते कीं पुढच्या वर्षीचे पेढे घेण्यास माझी तयारी आहे. आणि मग फिदी फिदी हांसत निघून गेली. मी ते वर्तमानपत्र उचलून परत चाळूं लागलो.

तो माझ्या डोळ्यापुढे काजवे चमकूं लागले. मला घेरी आली. त्यांत लिहिले होते, स्थलाभावी आणि शेकडा ९० टक्के निकाल लागल्यामुळे राष्ट्रीय बचत योजनेच्या नांवाखाली आम्ही यावर्षी फक्त नापासांचे नंबर्स देत आहोत.

# अखेरचे बोल

संकलक- नरेंद्रकुमार चंदूलाल व्यास
पदवीपूर्व विज्ञान

**भगवान बुद्ध** : " तुम्हा सर्वांनो निर्वाण प्राप्त होओ "

**येशू ख्रिस्त** : " देवा ! त्यांना माफ कर. त्यांना माहीत नाही की ते काय करीत आहेत "

**उमर खय्याम** : " हे खुदा ! मी माझ्या शक्ती-प्रमाणे तुला ओळखण्याचा प्रयत्न केला आहे, माफ कर."

**नामदेव** : " माझ्या कर्मांमुळे मला पुन्हा जन्म घ्यावे लागतील याचे मला दुःख नाही परंतु आपलं स्मरण कधी विसरू देऊ नका, एवढी प्रार्थना."

**कवि गटे** : " प्रकाश ! जास्त प्रकाश ! "

**कवि जॉन कीट्स्** : " मला असे वाटते जणू माझ्यावर डेझीची फुलेच फुले, उमलू लागली आहेत."

**कवि जॉन बायरन** : " आता मला निद्राधीन झाले झाले पाहिजे."

**नेपोलियन** : " माझा देव ! माझा देश ! माझे सैन्य ! ! "

**जॉर्ज वॉशिंग्टन** : " तुम्ही गेला, आता मी पण तुमच्या मागे येत आहे. डॉक्टर मी अत्यंत अडचणीत मरत आहे. तरी मला काही संकोच वाटत नाही."

**विल्यम पिट** : " अरे ! माझा देश ! ज्याला मी सोडून जात आहे. "

**कवि वर्डस्वर्थ** : " ईश्वर तुझे चांगले करो डोरा तू आहेस !"

**कवि विल्यम ब्लॅक** : " जशी तूं बसलेली आहे तशीच बसून रहा, प्रिय केट मी तुझा फोटो काढतो कारण तू नेहमी मला देवीसारखी वाटत राहिली आहेस."

**रॉबर्ट लुई स्टीव्हन्सन** : " घाबरू नका. जर याचे नांव मृत्यु असेल तर ते खूप चांगले आहे."

**एडीसन** : " पहा ! एक खरा खिश्चन (वैज्ञानिक) स्वतःच्या मृत्यूचा सामना करीत आहेत."

**सर होल्टस** : " आता मी माझी अंतिम यात्रा सुरू करीत आहे "

**विल्यम हॅझलिट** : " मी खरोखर एक सुखी जीवन जगलो आहे."

**स्वामी दयानंद** : " हे दयामय ! तुझी इच्छा पूर्ण होओ ! आहा ! परमेश्वर तुझी लीला अगाध आहे. "

**गोपाल कृष्ण गोखले** : " आजपर्यंत या जगाचा तमाशा पाहिला, आता दुसऱ्या जगाचा तमाशा पहावयाचा आहे, की तेथं काय काय चालत आहे. "

**सरदार भगतसिंह** : " वंदे मातरम् ! "

**रवीन्द्रनाथ टागोर** : " मला कल्पना नाही की काय घडेल ! काय घडेल !"



**महात्मा गांधी** : " हे राम ! "

**जॉर्ज बर्नार्ड शॉ** : " मी दमून गेलो आहे, आता मला झोपावसं वाटतं ? "

**श्रीमती सरोजिनी नायडू** : " मी काही ऐकावयास तयार नाही. मला कोणीहि स्पर्श करू नका. "

**वॉल्टेर** : " मला स्वस्थपणे मरू द्या. "

**सर कोट** : " ईश्वर तुमचे सर्वांचे रक्षण करो. मी पुन्हा माझ्यात येत आहे. "

**डॉ. विलियम हंटर** : " यावेळी जर माझ्यात लेखणी धरण्याची शक्ति असती तर मरण किती उल्हासपूर्ण आहे हे लिहून दाखविले असते."

**वीर ब्रिगेडियर उस्मान** : " मी आता दोन घडीचा सोबती आहे पण आपण ज्यासाठी आपलं रक्त सांडाल तो प्रांत शत्रूच्या ताब्यात जाऊ नये एवढीच माझी शेवटची इच्छा. "

**श्री. एम्. एस्. [ दादासाहेब ] कन्नमवार** : " मी दिल्लीला जाऊं शकेन असे वाटत नाही. सावंतांना जाण्यास सांगा. कृष्णा–गोदा पाणी वाटपाचे कागद त्यांचेकडे द्या आणि महाराष्ट्राचे प्रतिनिधित्व चांगले करण्यास सांगा. "

———



विश्वास ऑईल इंजिनिअर्सचे
पुणें जिल्ह्याचे
अधिकृत विक्रेते

□

**बारामती मशिनरी स्टोअर्स**

□

( पंदारकर )

बारामती
( जिल्हा पुणें )

इलेक्ट्रिकल मोटर्स, इलेक्ट्रिकलचें सर्व प्रकारचें सामान, सेंट्रिफ्युगल पंप्स, वगैरे माल किफायतशीर मिळण्याचें एकमेव ठिकाण

## स्मरण तुझे होते—

एकांती या खिन्न मनाने ही वेडी बसते
राजसा याद तुझी येते
कुसुमचुंबना विसरून गेला
भ्रमर दूर सावळा
कलिका वेडी झुरते तुजविण
असा कसा हा लळा
निराश काटे बोचत उठती, नयनी अश्रू येती
अश्रूच्या ह्या श्रवण सरींना
तूच आता सावरी
तव स्पर्शाची फुलव पालवी
ध्यास दुजा ना उरी.
कातर वेळी म्हणून असल्या स्मरण तुझे होते

—कु. शीला कुलकर्णी

◆ ◆ ◆

## अंतरीची ओढ--

पहात होतो रोज तुला अन्
तूही मजला पहात होतिस
परंतु माझ्या मनीहि नसता
आज अचानक कशी भेटलिस ?
किती बोललो नंतर आपण
सारें होतें गोड मधापरी
अधुनी मधुनी कारण नसता
उगाच हसलों गोड फुलापरी ॥
घेऊन बसलों परि न उमजलें
कां घेतलें हातीं हात
अधीरतेने उगाच बसलों
परस्परांची मनें न्याहाळित ॥
आणि अखेरिस जाता जाता
परस्परांना पुसले आपण
दोन जीवांच्या मधुर प्रीतिची
कधींतरी होईल का गुंफण ? ॥

भोसले एस्. एन्.

## येता आठवण तुझी—

येता आठवण तुझी, सांचे दंव पापणीत
स्मृति-पराग हळवे, भिजतात वेदनात
उंच तुझी अंगलट, उभी राहते लोचनी
तव हास्याची लकेर, झंकारते माझ्या मनी
काळ्या करारी भुंवया, देती साक्ष पौरुषाची
धुंद डोळ्यांना किनार, शोभे लांब पापण्यांची
स्पर्श ओझरता तुझा, जागा आहे कायेवरी
बोल अबोल तुझे, हिंदोळती श्वासावरी
येते अंतर दाटुनि. सुन्न होय सारे सारे
पाठ नीतिअनीतींचा, निळ्या आसमंती विरे
पहा, कळते का माझ्या हळव्या जीवाची
मूक हृदयी पूजिते, मूक राधिकेची

—कु. वसुधा लंके

◆ ◆ ◆

## कसे कळावे सांग तुला?—

कसे कळावे सांग तुला
गुंतले रेशमी धागे
सोडविता गुंतून गेले
एकाच ओढीने माझे
सर्वस्व ओढुनी नेले
स्वप्नांना आली जाग
सुगंध साठे गाली
गुलाब फुलवून गेले
जे नको व्हायला झाले
वाटले सहज विसरावे
पण सारा डाव उलटला
कणाकणात झुरते आशा
बापडा जीव तळमळला

—कु. शीला कुलकर्णी

◆ ◆ ◆

हिन्दी विभाग :—

# उमडकर आंखोंसे चुपचाप

कु. कृष्णा गौड़,
प्रथम वर्ष साहित्य

श्यामको मुझे अक्सर छतपर अकेले टहलनें की आदत है। जो सुख मुझे छतपर टहलनें में मिलता है वह कहीं भी और किसीके साथ नहीं मिलता। पुरानी याददास्तोंके प्यालेमें डूब जाती हूँ। बीते हुए सुख और दुःखके भी प्रसंग फिर एक बार अनुभव करती हूँ। और मन जरा हलका हो जाता है।

ऐसेही एकबार मैं छतपर टहल रही थी छतकी मुंडेरसे संटकर एक नीमका पेड था। उसकी घिरकी पतियोंमेंसे चाँदकी धीमी धीमी रोशनी छन रही थी। पासही एक अंजीरका पेड था। जीनेकी दीवारपर उसकी परछाई किसी कलाकार के बनाये हुए चित्रसे कहीं ज्यादा सुन्दर दिखाई दे रही थी। मैं भी न जाने उस अंजुरियामें कहाँ खो गई। संवेदनाकी झरती सरिता बडी व्याकुलतासे फूट पडनेके लिए छटपटा रही थी। अचानक मेरे पाँव ठहर गये, दिल कुछ और ही तरीकेसे धडकने लगा, विचारोंका झरना रुका और मूडगया। उसनें अपनी दिशा बदल ली। कहींपर दूर कोई गा रही थी।

" ऐ री मैं तो प्रेम दिवानी
मोरा दरद न जाने कोय......
घायल की गत घायल जानें
जो कोई घायल होय "......

मीराका दर्द मेरे सीनेंमें उभरनें लगा। कुछ देर बाद मुझे न अपनी खबर रही न और किसीकी। बस मीरा का दीवाना दर्द......

मैं सोचनें लगी कि आखिर ऐसा क्या है काव्य में? जो कि पत्थरको पिघला देता है, मुरदोंको जिलाता है और होता किसीका है पर सबके मन में उनका अपना बनकर मचलने लगता है। ऐसा कुछ क्या है वह बडे बडे विद्वानोंने काव्यकी अलग अलग प्रकारसे भिन्न भिन्न भाषाओं में व्याख्यायें करी हैं। अग्निपुराणमें काव्य की परिभाषा इस प्रकार की है—" काव्यं स्फुरदलंकारं गुणवद्दोष वार्जितम् ॥" इसका मतलब है संक्षेप मे इष्ट यानि योग्य बताने वाला गुणसंपन्न, दोषरहित और अलंकारोसे सज्ज वाक्य ' काव्य ' है। इसमे पाच बाते काव्यके लिये आवश्यक है इष्ट अर्थ, संक्षिप्त वाक्य, अलंकार, गुण, और दोष। काव्यमें इष्टार्थ व्यक्त होना चाहिये। संक्षिप्त वाक्य स्मरणीयताका द्योतक है। अलंकारकी आभासे युक्त होना अलंकार संप्रदाय का प्रभाव प्रगट करने जैसा है। इसमे निःपक्षपाती धोरण लुप्त हो जाता है। गुणोंसे युक्त होना काव्य गुणोंकी ओर संकेत करता है। पंरतु ' गुण ' अनेक प्रकारसे प्रयुक्त किये जा सकते है। उसके कई अर्थ निकलते है। गुण और दोषमें फरक करना मुश्किलसा है। क्यों कि जिन बातोंको हम लोग दोष मानते है। उन्हीं को दूसरे लोग गुण मान सकते है। जैसे कि एक अंग्रेजी लेखकने कहा है।

" Nothing is good and bad in this world;
thinking makes it so."

